म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र.

# आहे आणि नाही

## वि.वा.शिरवाडकर

REFBK-0009299

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रमांक
अनुक्रम ७१८६२ दि: १।८।८९
क्रमांक ९८८८ नों दि: २०।६।८०

पी. ई. सोसायटीचें न्यू गर्ल्स स्कूल ठाणें

~~कुमार~~
कुमारी ललिता वैद्य

१९६५ च्या वार्षिक परीक्षेंत १० इयत्तेंत

~~क्रमांकानें उत्तीर्ण झाल्याबद्दल~~
इंग्रजी विषयांतील प्राविण्याबद्दल पारितोषिक

Shmolhe
~~मुख्याध्यापक~~
मुख्याध्यापिका

दिनांक ३०·३·६६.

७१७६२ निबंध
९१।५।७०। १९४९

# आहे आणि नाहीं

लघुनिबंधांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७१७६२ वि: निबंध
क्रमांक ... नों. दि. ... 

लेखक

वि. वा. शिरवाडकर

REFBK-0009299

★ ★ ★

सहकार प्रकाशन, नाशिक

मुद्रक :
द. शं. पोतनीस
गांवकरी प्रेस, नाशिक

पहिली आवृत्ति, ऍप्रिल १९५७
सर्वाधिकार लेखकाच्या स्वाधीन

प्रकाशक :
सहकार प्रकाशन
शिवाजी रस्ता, नाशिक.

मूल्य
दोन रुपये, पन्नास न. पैसे

श्री. प्रभाकर पाध्ये यांस,

...त्रिभुवन रोडवरील संपादकीय गुहेंत अेक वाघ राहतो अशी अफवा अैकली होती. पण प्रत्यक्ष तेथें गेल्यावर, विशुद्ध, निष्कपट व स्नेहशील अशा ‘माणूसपणा’चें दर्शन मला झालें. सध्यां आंतरराष्ट्रीय शतपावली करणाऱ्या त्या दुर्मिळ माणसास, म्हणजे तुम्हालाच हें भलेंबुरें पुस्तक अर्पण करीत आहे...

वि. वा. शिरवाडकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक ......... दि: .........
क्रमांक ......... नों. दि. .........

# लेखकाचीं इतर पुस्तकें

**काव्य :**

विशाखा
जीवनलहरी
किनारा
समिधा
मेघदूत

**नाट्य :**

दूरचे दिवे
दुसरा पेशवा
वैजयंती
कौन्तेय
राजमुकुट
देवाचें घर
दिवाणी दावा

**कथा :**

फुलवाली

**कादंबरी :**

वैष्णव
जान्हवी
कल्पनेच्या तीरावर

लघुनिबंधलेखन ही वृत्तपत्रव्यवसायांतील माझी विशेष महत्वाची (अर्थात् माझ्या दृष्टीनें) कमाई होय. सारथी आणि धनुर्धारी या पत्रांत लघुनिबंध या सदरांत जमा होईल असा बराच मजकूर मी लिहिला. धनुर्धारींत विरामचिन्हें या शीर्षकाखाली अशा लेखांची अेक माला मी सुरू केली होती. त्यामधील निवडक– आणि ज्यांचीं कात्रणें सुरक्षित राहिलीं अशा– कांहीं लेखांत, अलीकडे लिहिलेल्या, व दीपावलि, शिरीष, लोकसत्ता, अमृत इ. नियतकालिकांतून प्रकाशित केलेल्या लेखांची भर घालून हा संग्रह वाचकांना सादर करीत आहे. लघुनिबंधाच्या निश्चित स्वरूपासंबंधीं विविध पक्ष मांडले जातात. परंतु कथाकाव्याप्रमाणें याहि वाङमयप्रकाराचें स्वरूप बरेंच व्यापक होत आहे, आणि तसें तें मानावें असें मला वाटतें. कारण अखेरतः वाङमयप्रकारांचें वर्गीकरण व नामकरण सोयीसाठीं असतें. अशा कांहींशा व्यापक अर्थानेंच मी या संग्रहास लघुनिबंधसंग्रह म्हणत आहे.

— लेखक

## अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| १ | तंबोऱ्याची तार | १ |
| २ | पृथ्वी सूर्याभोंवती फिरत नाहीं | ९ |
| ३ | आरामखुर्ची | १६ |
| ४ | तो कोठें गेला असेल ? | २१ |
| ५ | टिळक आणि सुपारी | २५ |
| ६ | तळहातावरील रेषा | ३१ |
| ७ | कर्जाच्या कमळांत | ३९ |
| ८ | शेजारी | ४३ |
| ९ | सर्कस | ४८ |
| १० | हे लोक | ५४ |
| ११ | पक्षांचा राजा | ६० |
| १२ | अविस्मरणीय | ६४ |
| १३ | निर्वासित नीति | ७० |
| १४ | श्रीयुत आकाश | ७५ |
| १५ | रद्दींतील रत्नें | ८४ |
| १६ | अनंताची ट्रॅजेडी | ८९ |
| १७ | अेक होता राजा | १०२ |
| १८ | वात्सल्य | १०६ |
| १९ | अेखादी बातमी | ११५ |

# आहे आणि नाहीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्वागत.
अनुक्रमांक ५१५५२ दि: १।८।६१
क्रमांक १८०८ नोंद दि: २०।६।८०

५१६०६२ निबंध
९८७८ २०।६।५०

# तंबोऱ्याची तार...

तंबोऱ्याची तार खरेदी करायला तुम्ही कधीं बाजारांत गेलां आहांत काय ? गेलां असलांत तर मी काय म्हणतों तें तुम्हांला लवकर पटेल. आपल्या बाजारपेठेची अवस्था सांप्रतकाळीं फार शोचनीय झालेली आहे असा निश्चित निष्कर्ष मीं या प्रकरणावरून काढला आहे. या अवस्थेचीं कारणें नेमकीं कोणतीं आहेत याचा शोध घेणें हें कार्य माझ्या सामर्थ्या-बाहेर आहे. बाजाराच्या गूढ गुंजनाचा सारा अर्थ माझ्या तर्कशक्तीला कधींच पुरता उमगला नाहीं. बाजारांतील विविध वस्तूंच्या किंमती ठर-वतें कोण, त्या सर्वत्र एकाच पातळीवर रहातात कशा, आणि वारें भरल्या-प्रमाणें बाजार अकस्मात् कडाडतात किंवा पडतात कां, या प्रश्नांचीं उत्तरें शोधायचा मीं फारसा प्रयत्न केलेला नाहीं. परंतु इमारतीच्या बांधकामाची आपल्याला माहिती नसली तरी ती चांगली दिसते का वाईट दिसते, ती वस्तीला सोयीची आहे कीं गैरसोयीची आहे हें आपण जाणूं शकतों.

बाजार ही आजच्या जगांतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे याबद्दल मला वाटतें, दुमत होणार नाहीं. ज्या समाजांतील बाजारपेठ व्यवस्थित असते तो समाजहि व्यवस्थित असतो. जेथली बाजारपेठ समृद्ध तो समाजहि समृद्ध. तुम्ही स्वतः कदाचित् बाजारांत जात नसाल, मीहि कधीं फारसा जात नाहीं. आणि तरीहि तुमचें आमचें जीवन बाजारावरती अवलंबून आहे ही वस्तुस्थिति आहे. ' सारे रस्ते अखेरीं रोमला जाऊन मिळतात ' या इंग्रजी म्हणीप्रमाणें माणसाच्या जीवनाचेहि सारे रस्ते शेवटीं बाजारास जाऊन मिळ-तात. आणि म्हणून ज्यांच्या हातीं सामाजिक व्यवहारांचीं सूत्रें आहेत त्यांनीं

या गोष्टीकडे वेळींच लक्ष पुरविलें पाहिजे. या सामाजिक संस्थेची व्याप्ति दिवसानुदिवस वाढत आहे. बाजारांत दुकान खोलून बसलेले असंख्य लोक पाहिले म्हणजे या दुकानांवर गिऱ्हाईक म्हणून येण्यासाठीं कांहीं लोक जगांत शिल्लक कसे राहूं शकतात याचा अचंबा वाटतो. परंतु एका वस्तूची विक्री करणारा दुकानदार हा दुसऱ्या वस्तूची विक्री करणाऱ्या दुकानदाराचा ग्राहक असतो हें तत्त्व ध्यानांत घेतलें म्हणजे असें आश्चर्य वाटण्याचें कारण राहात नाहीं. अर्थशास्त्रानुसार समाजांतील सारे व्यवहार—पण जाऊं द्या.प्राथमिक शाळेंतील पहिल्या वर्गापासून ज्याचे हिशेब आजपर्यंत सतत चुकत आले अशा माझ्यासारख्या माणसानें अर्थशास्त्रीय सिद्धांतांच्या गहन गुहांकडे पाऊल टाकण्यांत अर्थ नाहीं !

या साऱ्या कहाणीचें मूळ तंबोऱ्याच्या तारेंत आहे. कांहीं कामानिमित्त, मी एकदां मुंबईला जायला निघालों. मुंबई हें शहर असें आहें कीं जेथें अनेकांचीं अनेक कामें सतत गुंतून पडलेलीं असतात. कामें फार, पण जाणारे थोडे. त्यामुळें जे थोडे लोक जाणारे असतात त्यांना आपल्या कामाबरोबर इतरांचींहि कामें बहुधा बरोबर न्यावीं लागतात. मी जायला निघालों तेव्हां माझे एक गायक मित्र घाईगर्दीनें माझ्याकडे आले.

"तुम्ही मुंबईला जाणार आहांत असं ऐकलं," ते म्हणाले.

"होय, खरं आहे !" मी कबुलीजबाब दिला.

"केव्हां जाणार ?"

'आत्तां, जरा वेळानं."

"परत केव्हां येणार ?"

"परवां."

"छान ! आमचं काम झालं !" ते आनंदानें उद्गारले. माझ्या आज जाण्यानें व परवां येण्यानें यांचें काम कोणतें व कसें होऊं शकेल हें माझ्या लक्षांत येईना. माझी ही अडचण ओळखून त्यांनींच तावडतोब खुलासा केला.

"आम्ही तुम्हांला एक काम सांगणार आहोंत !"

"सांगा कीं !"

" माझ्या तंबोऱ्याच्या तारा आणायच्या आहेत, तेवढ्या घेऊन याल तर बरं होईल !"

" अवश्य !"

" म्हणूनच म्हटलं, आमचं काम झालं ! तुम्ही आमचं काम करणार नाहीं असं कधीं होणारच नाहीं !" गवईबुवा आम्हां उभयतांतील सौहार्द सूचित करून म्हणाले. मला त्यांस दुजोरा देणें आवश्यकच होतें.

" वा वा ! तुमचं काम करणार नाहीं असं कधीं होईल काय ?"

" दोन दिवसांनीं आमची बैठक आहे. त्यापूर्वीं तंबोरा तयार हवा—"

' हो तर ! तंबोऱ्याशिवाय काय ?"

" परवां तो हा गेला," गवई म्हणाले, " पण त्याला मीं सांगितलं नाहीं. त्याला कांहीं कळत नाहीं यांत. तंबोरा कशाशीं खातात हें देखील त्याला समजत नाहीं !"

मी उपहासानें हंसलों. तंबोरा ही खाण्याची वस्तु नाहीं याच्याविषयीं तरी मला मुळींच शंका नव्हती.

" शिवाय म्हटलं, तुम्हांला मुंबईची माहिती चांगली आहे. तुम्ही राहिलेले तिथें ! म्हणून अधिक सांगायची कांहींच जरूरी नाहीं !"

" छे छे, मुळींच नाहीं !" माझ्या मुंबईच्या ज्ञानावर त्यांनीं शिक्कामोर्तब केलें हें पाहून मी संतुष्ट झालों. " बरोबर घेऊन येतों. कांहीं काळजी करूं नका !"

तात्पर्य हें कीं, मुंबईला निघतांना तंबोऱ्याच्या तारा आणण्याची एक महान् जबाबदारी शिरावर घेऊन मी निघालों. हळुहळूं या जबाबदारीचें स्वरूप माझ्या ध्यानांत येऊं लागलें. आगगाडींत बसल्यावर तंबोऱ्याच्या तारेचें संगीतच माझ्या डोक्यामध्यें रुणझुणत होतें. या गोष्टीपुढें माझ्या स्वतःच्या कामाचाहि मला विसर पडूं लागला. आणि हें सारें होण्याचें कारण म्हणजे तंबोरा आणि त्याच्या तारा. या विषयासंबंधींचें माझें ज्ञान खरोखरीच फार मर्यादित होतें. तंबोऱ्यांत कुठें तरी भोपळ्याचा संबंध असला तरी तो खात नाहींत एवढीच माझी माहिती निश्चित स्वरूपाची होती. गवईबुवांच्या त्या दुसऱ्या मित्रापेक्षां—ज्यांस त्यांनीं हें काम सांगि-

तलें नाहीं—मी अधिक वरचढ होतों यांत शंकाच नाहीं. इतरहि थोडीशी माहिती मला होती. गाणें कळणाऱ्या भाग्यवंतांतील मी नसलों तरी गाणें आवडणाऱ्या रसिकांत माझी जमा होऊं शकेल असें मी मानतों. त्या दृष्टीनें गाण्याच्या अनेक बैठकी मीं ऐकलेल्या व पाहिलेल्या आहेत. अभिजात गवई पं. जवाहरलाल नेहरूंप्रमाणें बाजाच्या पेटीकडे तिरस्कारानें पाहातात व तंबोऱ्याकडे आदरानें पाहातात, मोठ्या गवयाला साथीसाठीं दोन तंबोरे पाठीशीं लागतात, तंबोरे धरणारे अधूनमधून गात असले तरी खरे गाणारे ते नसतात, तंबोऱ्यावर साती स्वर काढतां येत नाहींत वगैरे स्थूल गोष्टी मीं तर्कानें जाणलेल्या होत्या. परंतु एवढी माहिती तंबोऱ्याच्या तारा आणायला पुरेशी होईल का ?

हें असें नेहमीं होतें. ज्या विषयांत आपली फारशी गति नाहीं त्यांत आपण पारंगत आहोंत असा आविर्भाव इतरांच्या मुर्वतीखातर अनेकदां आपल्याला करावा लागतो. एका गृहस्थाची हकीगत मी ऐकली आहे. हा गृहस्थ एका दैनिकांत उपसंपादक म्हणून काम करीत असे. वृत्तपत्रामध्यें साऱ्याच विषयांचा, विशेषतः राजकीय विषयांचा परामर्श घेतला जातो. पांच पायांच्या बासरापासून सापेक्षतावादाच्या सिद्धान्तांपर्यंत सारेच विषय लांबरुंद मथळे पांघरून वर्तमानपत्रांत मिरवीत असतात. जें वृत्तपत्रांत नाहीं तें जगांत नाहीं अशी आज तरी स्थिति आहे. यामुळें बाहेरच्या लोकांची पुष्कळदां अशी कल्पना होते कीं, वर्तमानपत्रांत काम करणारीं सारींच माणसें सगळ्याच विषयांत माहीतगार व तज्ज्ञ असतात. अशा कांहीं लोकांनीं वरील गृहस्थाला आपल्या गांवीं व्याख्यानासाठीं बोलावलें. येथपर्यंत सर्व ठीक होतें. परंतु विषयहि त्या लोकांनींच सुचवला व त्यांच्या भिडेखातर या गृहस्थासहि तो पत्करावा लागला. विषय होता मार्क्सवादाचीं मूलतत्त्वें...किंवा अशाच आशयाचा अन्य कांहीं. अशा विषयावर बोलायला त्याचें तांत्रिक व निश्चित ज्ञान असायला पाहिजे हें उघड आहे. या गृहस्थांजवळ तें फार थोडें होतें, म्हणजे जवळजवळ अजिबातच नव्हतें. परंतु नाहीं म्हणायला अवघड वाटल्यानें त्यानें होकार दिला होता. गांवांतील शेकडों सज्जन गंभीर चेहरे करून मार्क्सवादाचीं मूलतत्त्वें ऐकायला बसले. वक्ते व्यासपीठावर उभे राहिले, पण

मार्क्सवादाचीं मूलतत्त्वें कांहीं जवळपास फिरकेनात. आकाशांतून उडत येणाऱ्या म्हाताऱ्यांप्रमाणें तीं अचानक वाटेल त्या ठिकाणीं येऊन थोडींच दाखल होणार ? वक्त्यांनीं पांचदहा मिनिटें आभार, आनंद, श्रीमंत, गरीब वगैरे शब्दांची कांहीं तरी कसरत केली व दहाव्या मिनिटाला क्षमा मागून ते खालीं बसले ! माझ्यावरहि एकदां असाच प्रसंग ओढवला होता...परंतु मी सांगत होतों तें तंबोऱ्यांसंबंधीं.

माझ्या मनांत साशंकता निर्माण झाली हें वरती सांगितलेंच. ही साशंकता तंबोऱ्याच्या तारा आपल्याला चांगल्या आणतां येतील कीं नाहीं यासंबंधीं होती. परंतु मुंबईच्या बाजारपेठेंत पाऊल टाकल्यावर, आपल्याला त्या मिळतील कीं नाहीं याच्यासंबंधींच मी साशंक झालों.

मुंबईस पोहोंचल्यावर रात्रीं मीं विश्रांति घेतली व दुसऱ्या दिवशीं प्रात:काळीं तंबोऱ्याच्या तारा आणण्यासाठीं बाहेर पडलों. मी दादरला मुक्कामाला होतों. तेव्हां दूरवर न जातां दादरच्या बाजारांतूनच तारा आणाव्यात, फार तर अर्धा तास त्यासाठीं लागेल, यानंतर आपण आपल्या उद्योगाला लागावें, असें मीं ठरविलें.पण दादर आणि त्यानंतर परळ, लालबाग वगैरे भागांतील रस्त्यांवरती सुमार तीन तास पायपीट केल्यावर तंबोऱ्याच्या तारेसंबंधींचें एक हृदयविदारक सत्य माझ्या ध्यानांत येऊं लागलें. आणि तें म्हणजे ही वस्तु फार दुर्मिळ आहे हें होय. बाजारपेठेच्या शोचनीय अवस्थे-विषयीं मीं जे विचार प्रारंभीं सांगितले त्यांचा उगमहि या प्रवासांत, त्यांत आलेल्या अनुभवांत आहे.

आतां तंबोऱ्यासंबंधीं माझें ज्ञान अल्प असलें तरी ही वस्तु कांहीं सामान्य नव्हे. भारतीय पुराणग्रंथांमध्यें तंबोऱ्यांचा आणि ते वाजविणाऱ्यांचा उल्लेख आहे. पुराणांत नारदाबरोबर तुंबरूचाहि महान् गवई म्हणून गौरव केलेला आहे ! नारद वीणा वाजवीत असले तरी तुंबरू हे तंबोरा वाजवीत असावेत, हें त्यांच्या नांवावरूनहि सिद्ध होतें. आपल्या अभिजात गायन-कलेची सारी इमारत तंबोऱ्याच्या तारेवर उभारली आहे असें जाणकार सांगतात. या क्षणाला भारतामध्यें तंबोऱ्याच्या सहस्रावधी तारा वाजत असतील व तुटतहि असतील. असें असतांहि आमच्या समाजानें, आमच्या

बाजारपेठेनें तंबोऱ्याच्या तारेविषयीं इतकी अनास्था दर्शवावी हें खेदजनक नाहीं काय ?

या अनास्थेचा मला आलेला प्रत्यय फार कष्टदायक होता. अपेक्षा कमी असल्या तर अपेक्षाभंगाचें दुःखहि कमी असतें. उलट अपेक्षा फार वाढलेल्या असल्या तर पुढें येणाऱ्या सुखाचे रंगहि मलूल होतात. ताजमहालासंबंधींची आपली प्रतिक्रिया एका लेखकानें अशीच सांगितली आहे. उत्तुंग अपेक्षांचें एवढें मोठें स्वप्न घेऊन तो ताजमहालासमोर गेला कीं त्या सौन्दर्याच्या दर्शन-सुखापेक्षां त्यानें केलेल्या अपेक्षाभंगाचें दुःखच प्रथमतः त्याला सहन करावें लागलें. मी तंबोऱ्याच्या तारा आणायला बाहेर पडलों तो अशाच मोठ-मोठ्या अपेक्षा बांधून. आणि म्हणूनच तीन तासांनन्तर ही चीज दुर्लभ असल्याचें मला कळलें तेव्हां माझ्या पायांबरोबरच माझें मनहि कष्टी झालें.

माझी अपेक्षा अशी होती कीं, पावलापावलावर नाहीं, तरी सुमारें प्रत्येक एकदोन फर्लांगांत तम्बोऱ्यांचें दुकान असेल. पायतणांच्या दुकानावर बाहेर मोठी थोरली चप्पल अडकवलेली असते त्याप्रमाणें तंबोऱ्याच्या दुकाना-बाहेर एखादा भला मोठा तम्बोरा बाहेर लोंबकळत असेल, गंगावनांप्रमाणें तम्बोऱ्याच्या तारांचे जुडगे हुकाला लावलेले असतील व दारावरती 'तंबो-ऱ्याच्या तारांबाबत येथें सर्व व्यवहार सचोटीनें केले जातील' अशी झळ-झळीत पाटी असेल. जाणत्याच्या आविर्भावानें आपण दुकानदाराशीं बोलणें करूं, तार हातानें चाळवून पाहूं, नुसतीच वाजत असेल तर वाजवूनहि पाहूं आणि ती नापसन्त असल्याचें दर्शवून पुढच्या दुकानांत प्रवेश करूं. अशीं पांचसात दुकानें पाहिल्यावर तार खरेदी करूं. म्हणजे गवई मित्राला, चार ठिकाणीं बरेंवाईट पाहून ही तार आणली असें सांगायला हरकत नाहीं ! आपल्या जाणतेपणासम्बन्धींचा त्यांचा आदर तेवढाच अधिक वाढेल पण कसलें काय ? फर्लांगामागून फर्लांग, मैलांमागून मैल मागें टाकले तरी तम्बोऱ्याचें किंवा तम्बोऱ्याच्या तारांचें एक दुकान म्हणून कुठें आढळलें नाहीं.

तम्बोऱ्याच्या तारेसाठीं दुकानांवरील पाट्या पाहात मी प्रवास करीत होतों आणि प्रत्येक दोनतीन घरांआड मला उपहारगृह किंवा केस कापण्याचें दुकान आढळत होतें. हीं दुकानें इतकीं बहुसंख्य, किंबहुना असंख्य आहेत

याची जाणीव अितक्या तीव्रतेनें मला आतांपर्यंत कधीं झाली नव्हती. हीं दुकानें पाहिल्यावर, खाण्याचा प्रश्न हा मानवी जीवनांतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कसा, हें तावडतोब प्रत्ययास येई. परंतु खाण्याच्या खालोखाल दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे केस कापण्याचा, ही गोष्ट मात्र मनांत विंबायला जरा अवघड आहे. दुकानांवरूनच निष्कर्ष काढायचा तर ही गोष्ट मान्य करण्यावाचून गत्यंतर नाहीं. या दुकानांची संख्या व गर्दी पाहिल्यावर असें वाटतें कीं, शहरांतले बहुतेक लोक प्रथम केस कापून घेतात, नन्तर उपहारगृहांत जाऊन चहाफराळ करतात, चहापाणी घेत असतांना पुन्हां केस वाढतात म्हणून लगेच पुन्हां केस कापायच्या दुकानांतें जातात व तिथें केस कापतांना पुन्हां भूक लागली म्हणजे परत उपहारगृहांत येतात! असा कांहीं तरी हा अखण्ड उद्योग असावा. परन्तु वस्तुस्थिति अशी नाहीं हें आपल्याला ठाऊक आहे. म्हणूनच मी म्हणतों कीं, सामाजिक परिस्थिति आणि आपली बाजारपेठ यांत भयंकर मोठी विसंगति निर्माण झाली आहे. माणसाला उपहार मिळायला पाहिजे हें जितकें खरें, त्याचे डोक्यावरचे केस कोणीं तरी अधूनमधून कापले पाहिजेत हें जितकें खरें, तितकेंच हेंहि खरें कीं त्याला तंबोऱ्याच्या ताराहि विनासायास मिळाल्या पाहिजेत. समाजाच्या सर्व गरजा बाजारपेठेनें भागवल्या पाहिजेत.

तारा मिळत नाहींत असें पाहून मी ईर्षेला पडलों. लालबागला बसमध्यें बसून मी ग्रँण्टरोडला गेलों. ग्रँण्टरोड पाहिला, गिरगांव रस्ता बघितला, नंतर कोटांत जाऊनहि स्वैर संचार केला. पण कोठल्याहि दुकानावर 'येथें तंबोरे मिळतील' अशी अक्षरें मला दिसलीं नाहींत. हा उद्योग मला रात्र होईपर्यंत पुरला. तारेच्या मृगजलामागें लागल्यानें माझें स्वतःचें कामहि तसेंच राहून गेलें. परंतु रात्रीच्या गाडीनें गांवीं परत जाणें भाग असल्यानें, तम्बोऱ्याच्या तारेचा अथवा माझ्या कामाचा अधिक विचार न करतां मी बसमध्यें बसलों व दादरला परत आलों.

जेवतांना मी माझ्या मित्राला म्हणालों, "का रे, मुंबई शहरानं तम्बोऱ्यावर बहिष्कार टाकलेला आहे का?"

" म्हणजे ? " तो उद्गारला.

" आज तंबोऱ्याच्या तारेसाठीं मुंबईंतले निम्मे रस्ते पायाखालीं घातले, पण कुठेंहि दिसली नाहीं ती ! "

"सारी मुंबई पालथी घातली असतीस तरी काय उपयोग ?" माझा मित्र हंसत म्हणाला, "विशिष्ट वस्तूसाठीं विशिष्ट जागींच जायला हवं. सँडर्स्ट रोडला तीनचार दुकानं आहेत. तिथं मिळाली असती ! "

सँडर्स्ट रोड ! माझ्या सर्वंकष फेऱ्यांतून तोच रस्ता नेमका राहिला होता. माझ्या मित्रानें माझ्याप्रमाणें जाणकारपणाचा खोटा आव आणला असेल असें मी मानीत नाहीं. सँडर्स्ट रोडवर तम्बोऱ्याचीं दुकानें असतील. नाहीं असें नाहीं. परन्तु तरी माझी तक्रार कायमच आहे. भारतीय संगीतास आधारभूत असलेली तम्बोऱ्याची तार एकाच रस्त्यावर आणि तीनचार दुकानांतच मिळावी ही परिस्थिति संगीताच्याच नव्हे तर समाजाच्या दृष्टीनेंहि भयावह आहे.

गांवीं गेल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं गवईबुवा दारांत दत्त म्हणून उभे राहिले.

"आमचं काम झालं असेलच ! " ते उत्साहानें म्हणाले.

सारी भीडमुर्वत बाजूला सारून मी वैतागानें उद्गारलों, " तुमचं तर काम झालं नाहींच, पण माझंसुद्धां काम झालं नाहीं ! आणि तें या तम्बोऱ्याच्या तारेपायीं ! "

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७७५६२ वि: निबंध
क्रमांक ९८७८ नों. दि. २०।६।६०

# पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत नाहीं....

पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते ? शाळेमध्यें असं शिकवलं जातं खरं. परंतु शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या कित्येक गोष्टी, शाळेचा अुंबरठा ओलांडून आपण बाहेर आलों म्हणजे खोटया किंवा चुकीच्या आहेत असं आपल्याला आढळून येतं. शाळाकॉलेजांच्या संकुचित अिमारतींबाहेर मानवी व्यवहाराचं जें विशाल विद्यापीठ पसरलेलं आहे त्यांत शालेय सिद्धांताची कोणी पर्वा ठेवीत नाहीं असंच सामान्यत: दिसून येतं. शाळेंत शिकवलं जातं अेक आणि वस्तुस्थितींत असतं कांहींतरी वेगळंच. आपलं चारित्र्य आणि शील पुष्ट होण्यासाठीं कितीतरी नीतिपाठांचीं आसवं आणि आरिष्टं आपल्याला शाळेंत दिलीं जातात! या सोज्ज्वळ तत्त्वांचा हात धरून आपण जगांत वावरलों तर आपल्या अैहिक आणि पारलौकिक कल्याणाविषयीं शंका बाळगायचं कांहींहि कारण नाहीं अशी आपली समजूत करून देण्यांत येते. परंतु अनुभव असा येतो कीं निदान अैहिक कल्याणाच्या बाबतींत हे नीतिपाठ पुरे पडत नाहींत. पुरे पडत नाहींत अितकेंच नव्हे तर त्यांच्या ते आड येतात ! दिवाळींत अंगणामध्यें लावलेल्या पणत्या वाऱ्याची झुळूक आली कीं विझून जातात त्याप्रमाणें या शालेय तत्त्वांची अवस्था होते. जे या तत्त्वांचीं लोढणीं गळयांत घालून घेत नाहींत ते मात्र पृथ्वीवरील शर्यतीमध्यें आघाडीला जातात. अर्थात् पारलौकिक कल्याणासंबंधी मात्र कांहीं सांगतां येत नाहीं. परंतु जें नाणें या पेठेंत चालत नाहीं तें दुसऱ्या पेठेंतहि चालेल हें फारसं संभवनीय नाहीं. तेव्हा शाळेंत शिकवलं जातं तें सारं खरंच असतं असं नाहीं. 'पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते' हा शाळेंतील सिद्धांतहि असाच शंकास्पद आहे असं मला वाटतं. किंबहुना शंकेला देखील

अवसर नाहीं. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत नाहीं हेंच खरें. भूगोलाचीं आणि खगोलाचीं सारीं पुस्तकं पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते असं सांगत असलीं तरी त्यांत फारसा अर्थ नाहीं. कवि, शास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ते ही मंडळी स्वतःच्या कल्पनाचक्रांत सापडलेली असतात. त्यांचे पाय पृथ्वीवरच्या मातींत असले तरी मस्तकं आकाशांतल्या ढगांत असतात. त्यांचीं मतं परमार्थानं घ्यायचं कारण नाहीं. पृथ्वी आणि तिच्यावरील व्यवहार यासंबंधीचीं सत्यं आकाशांतल्या पोकळींत सांपडत नाहींत अथवा हिमालयाच्या निर्जनांतहि आढळत नाहींत. तीं येथील मातींतच शोधायला हवींत. त्यासाठीं नुसते पाय मातींत असून चालायचं नाहीं, डोकेंहि मातींतच असायला हवं. किंबहुना माणसाचं सारं आंतर्बाह्य जीवन छोटया कृमिकीटकांप्रमाणें मातीमधून सरपटत रांगत गेलं तरच सत्याचा शोध लागणं सोपं होतं.

पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत नाहीं तर मग कोणाभोंवतीं फिरते ? ज्याच्या भोंवतीं पृथ्वी फिरते त्यालाच सूर्य म्हणायचं असेल तर मात्र वादाचं कारण नाहीं. मग आपण मान्य करूं कीं पृथ्वी सूर्याभोंवतींच फिरते आहे; परंतु तो सूर्य आकाशांत तळपणारा, सकाळीं पूर्वेला अुगवणारा व संध्याकाळीं पश्चिमेला मावळणारा सूर्य नव्हे. ऋग्वेदांतील अनेक सूक्तांनीं ज्याचं संकीर्तन केलं, प्राचीन अिराणी लोकांनीं ज्याला आपल्या धर्मांत दैवताचं स्थान दिलं, ज्याच्या ठिकाणीं अमाप अुष्णता आहे आणि ज्याचा आकार–विस्तार पृथ्वीच्या शतपटीहून जास्त मोठा आहे तो हा सूर्य नव्हे. ज्या सूर्याभोंवतीं पृथ्वी फिरते तो त्या तेजोगोलासारखाच वर्तुळाकार असला तरी त्याच्यापेक्षा फारच लहान आहे. अगदीं माणसाच्या खिशांत मावेल अितका लहान आहे. मूर्ति छोटी पण कीर्ति मोठी असा याचा पराक्रम आहे. त्या सूर्याची पुष्कळशी अचूक माहिती ज्योतिर्विदांनीं काढली आहे. तो केव्हां अुगवतो, केव्हां मावळतो, आज कोठें आहे, अुद्यां कोठें असणार वगैरे प्रश्नांचीं निश्चित अुत्तरें आपल्याला पंचांगांत मिळूं शकतात. परंतु जगांतील सर्व श्रेष्ठ ज्योतिर्विदांचा ताफा आला तरी तो या छोटया सूर्यापुढें पराभूत होअील. हे राजश्री अुदयास्ताच्या बाबतींत कोठल्याहि मर्यादा जुमानीत नाहींत. ते कोठें कधीं अुगवतील वा मावळतील याचा कांहींच नेम नाहीं. अेखाद्या वेळीं ते कोठें अुगवायला लागले कीं सारखे अुगवत राहतात,

आणि कोठें मावळले कीं कायमचे मावळतात. आकाशांतील सूर्यानं अनेक ग्रह अुपग्रहांना प्रकाशाचं व अुष्णतेचं दान केलं आहे. छोटा सूर्य अितक्या दूरवर प्रकाशदान करीत नाहीं हें खरं, परंतु पृथ्वीवरील लोकांपुरतं त्याचं सामर्थ्य त्या आकाशस्थ सूर्यापेक्षा खचित अधिक आहे. त्यानं तुमच्याकडे पाठ फिरवली म्हणजे तुमची पाअूलवाट प्रकाशित करण्याचं बळ आकाशांतील शंभर सूर्यामध्येंहि असणार नाहीं. खिशांत राहणाऱ्या, तिजोरींत विहार करणाऱ्या या छोट्या सूर्याला माणसानंच जन्माला घातलं आहे. त्या मोठ्या सूर्यासारखा तो अीश्वरनिर्मित नाहीं. परंतु बापसे बेटा सवाअी या न्यायानं माणसानं अिथं जी करामत केली आहे ती अीश्वरालाहि कधीं साधली नसती. या पराक्रमी मानवपुत्रानं केवळ आपल्या जन्मदात्यालाच नव्हे तर साऱ्या पृथ्वीला आपल्या सभोवार प्रदक्षिणा घालण्यास भाग पाडलं आहे.

सोन्या-चांदीसारख्या धातूचा अेक चिमकुला गोलाकार तुकडा ! परंतु महाजाज्वल्य, जागृत आणि सामर्थ्यवान दैवत आहे हें. आपल्या पुराण ग्रंथांत देवांची कांहीं कमतरता नाहीं. अेक नाहीं, दोन नाहीं, तेहतीस कोटि देवांची संख्या पुराणांनीं सांगितलेली आहे. परंतु या कोटचवधि देवांचं अेकत्रित बळदेखील या रुपेरी दैवतापुढे पांगळं पडेल. हें प्रसन्न आहे तर सारं कांहीं आहे. त्याची गैरमर्जी झाली तर तुमचं रक्षण कोण करूं शकणार ? हें जाणूनच सारीं माणसं सूज्ञपणानं त्याच्याभोंवतीं फिरत असतात. शेतांत राबणारीं, कारखान्यांत श्रम करणारीं, कचेऱ्यांत खपणारीं, रस्त्यांत फिरणारीं, देशोदेशीं वाटचाल करणारीं सारीं सारीं माणसं त्या अेकाच्या शोधांत, त्याला प्रसन्न करून घेण्याच्या अुद्योगांत गुंतलेलीं असतात. वेगवेगळचा धर्मांचे ग्रंथ कांहींहि सांगोत, आज जगांतील सर्व लोक अेकेश्वरी पंथाचे आहेत. कोटचवधि मानवांची प्रचंड यात्रा या छोटचा चकचकीत गोलाभोंवती अखंडपणें परिभ्रमण करीत आहे. ही यात्रा करतांना कित्येकजण धापा टाकतात, कित्येक अुरीं फुटतात, कित्येक पडतात, कित्येक मरतात. परंतु यात्रेला खंड पडत नाहीं. ती सतत चालू आहे. बापाच्या कलेवरावर पाय ठेवून मुलगा पुढें जातो, मित्राच्या गळ्याला तात लावून मित्र वाट काढतो, दीनदुबळ्यांचं रक्त पिअून या दैवताचे शेकडों पुजारी त्याच्या प्रदक्षिणेसाठीं ताजेतवाने होतात. या प्रदक्षिणेंत गुंतला नाहीं असा

कोणीच नाहीं. पृथ्वी म्हणजे तिच्यावरील दगड नव्हे कीं तिच्यावरील माती नव्हे. माणसं म्हणजेच तिचं चैतन्य, तिचा आतमा; आणि म्हणूनच पृथ्वी सूर्या-भोंवती फिरत नसून सोन्या-चांदीच्या नाण्या-भोंवतीं फिरते आहे हें सत्य, शास्त्रज्ञांचं मत कांहीं असलं तरी आपल्याला मान्य करायला हवं !

होय, मला कबूल आहे, हें सारं काव्य आहे. परंतु, हवेंत जन्मलेलं आणि हवेंत विसर्जन पावणारं हें काव्य नव्हे. तें वास्तवांतूनच अुदय पावलेलं आहे. परवां मी अेक हकीगत अैकली आणि ती अैकल्यापासून वर सांगितलेला काव्यविचार माझ्याभोंवतीं सारखा घिरट्या घालूं लागला ! ती हकीगत सारांशानं अशी : अेका दरिद्री, चरितार्थाचं साधन अुपलब्ध नसलेल्या माणसानं प्रथम आपल्या पत्नीचा व दोन लहान मुलांचा खून केला आणि नंतर स्वत: आत्महत्या केली. त्यानं आपल्या अखेरच्या पत्रांत लिहिलं होतं, " मी हें सारं करीत आहे याचं कारण अेकच. आणि तें म्हणजे माझ्याजवळ पैसा नाही ! जगणं हें फार भयानक झालं आहे आणि म्हणूनच मी माझ्या मुलांमाणसांसह मृत्यूचा आनंदानं स्वीकार करीत आहे ! " आनन्दानं स्वीकार करीत आहे ! खरोखर अेखाद्या लग्नमुंजीच्या समारंभाला माणसानं सहकुटुंब सहपरिवार आनंदानं, अुत्साहानं जावं त्याप्रमाणें हा गृहस्थ मृत्यूच्या मांडवाची शोभा वाढ-वायला मोठ्या अुल्हसित मनानं गेला असेल. ' दारिद्र्य, मरण यांतुनि मरण बरें बा दरिद्रता खोटी ' हें चारुदत्ताचं सुभाषित त्यानं केवळ बोलून नव्हे तर प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखविलं. ही हकीगत ज्या गृहस्थानं मला सांगितली तो ती सांगितल्यानंतर सात्त्विक संतापानं अुद्‌गारला, " अशा माणसांना तुरुंगांत डांबून ठेवायला पाहिजे ! " मेलेल्या माणसांना तुरुंगांत डांबून ठेवतां येत नाही हें आपल्या शासनसंस्थेचं अेक वैगुण्य आहे. परंतु त्या माणसाची गुन्हेगारी फार मोठी आहे यांत शंका नाही. परसांतली भाजी कापावी त्याप्रमाणें आपल्या मुलांचें, पत्नीचें व स्वत:चें आयुष्य कांहींहि विचार न करतां त्यानें कातरून टाकलं, तोडून टाकलं. पत्नीचा वध करतांना त्यानें तिची संमति तरी घेतली असेल का ? सध्यांच्या लोकशाहींत आपल्याला कोणतं सरकार हवं, कोणतं नको यासंबंधीं मत देण्याचा अधिकार स्त्रियांना प्राप्त झालेला आहे. आपल्याला जीवन हवं कीं नको या संबंधीं मत देण्याचा अधिकार त्या मानानं

फार कमी महत्त्वाचा असेल. परंतु तें सांगायचा त्यांना हक्क आहे हें नाकारतां येणार नाहीं. त्यानं एकाच घावांत व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्त्रीस्वातंत्र्य या दोन्ही तत्त्वांचा खून पाडला. हा अपराध कांहीं लहानसहान नव्हे. मुलांच्या बाबतींतील गुन्हा तर याहूनहि मोठा आहे. ते गोजिरवाणें जीव नुकतेच कुठें अुमलायला लागले असतील. सुंदर सुंदर स्वप्नांच्या परागांनीं त्यांचीं अंतःकरणं सुगंधित झालीं असतील. संसाराच्या सरोवरांत प्रवेश करण्यापूर्वी ते किनाऱ्यावर हर्ष-भरानें अुभे राहिलेले असतील आणि तेथील रेतीवर आपलीं नामाक्षरं गिरवूं लागले असतील. हत्तीनं पाकळ्यांत अडकलेल्या भृंग्यासह कमलाचा स्वाहाकार करावा त्याप्रमाणें त्या बापानं आपल्या मुलांचा त्यांच्या सर्व स्वप्नाकांक्षांसह नाश केला. त्यानं फार मोठा अपराध केला यांत तिळमात्र शंका नाहीं.

त्यानं खरोखर मुलांमाणसांसह जिवंत राहायला हवं होतं. परमेश्वरानं मोठ्या प्रेमानं दिलेलं मानवी देहाचं दान असं अुधळून टाकण्याचा, नष्ट करण्याचा कोणासहि अधिकार नाही. 'प्रयत्नें वाळूचे कण रगडितां' वगैरेसारखीं पौष्टिक वचनं त्यानं कधीं अैकलीं नव्हतीं काय ? अंतःकरणांत महत्त्वाकांक्षा आणि मनगटांत जोर असल्यावर नराचा नारायण, फेरीवाल्याचा गिरणीवाला, मुकादमाचा मक्तेदार किंवा कारकुनाचा पंतप्रधान होअूं शकतो हें त्याला माहीत नव्हतं का ? शिडीच्या पहिल्या पायरीवर आयुष्याची सुरुवात करणाऱ्या महा-पुरुषांचीं चरित्रं त्यानं कधींच चाळलीं नव्हतीं का ? या सर्व गोष्टी ठाअूक असूनहि त्याला असं वाटलं कीं आपल्या हातून असं कांहीं व्हायचं नाही ? तसं असेल तर तो जगण्यापेक्षा मरायलाच अधिक लायक होता असं म्हणावं लागेल. चाळीस चोरांची अैश्वर्यशाली गुहा समोर अुघडी असतांना मनुष्य जर आंत पाअूल टाकायला कचरूं लागला तर कोण काय करणार ?

चरितार्थ साधायचे हे राजरोस मार्ग त्याला दिसले नसतील अथवा परवडले नसतील असं आपण गृहीत धरूं; पण मग आडमार्गाचा तरी त्यानं अवलंब कां केला नाहीं ? पुढचं दार मोकळं नसेल तर मागचं दार शोधावं, प्रकाश मानवत नसेल तर अंधाराचा आश्रय घ्यावा हे सर्वमान्य सिद्धान्त त्यानं अैकले नव्हते का ? तो खुळ्यासारखा बसला असेल भल्याबुऱ्याची, नीति-अनीतीची मीमांसा करीत. प्रारंभीं मीं ज्या नीतिपाठाचा अुल्लेख केला त्यांच्या

आहारीं तो गेलेला असावा. त्याच्या जीवनप्रवासांत तो शाळेपासून फारसा दूर कधीं गेला नसावा. अशा लोकांचं असंच व्हायचं ! लौकिक व्यवहारांतील कार्यकारी तत्त्वांचं प्राथमिक ज्ञान ज्याला मिळवतां येत नाहीं त्याच्या कपाळावर आत्मनाशाचा लेखच लिहिलेला असणार.

अशा कांहीं वेडयावाकडया गोष्टी करण्यापेक्षां त्यानं अुपाशी मरणं अथवा सहकुटुंब सहपरिवार परलोकाची वाट चोखाळणं हेंच अधिक श्रेयस्कर होय असा युक्तिवाद कित्येकजण करतील. दुसऱ्यानें अुपाशी राहून आपलं व समाजाचंहि शील सांभाळावं असा अुपदेश करण्याअितकी सोपी गोष्ट दुसरी क्वचितच असेल. दारिद्र्य येतं तें भणंग भिकाऱ्यासारखं अेकटंदुकटं येत नाहीं. अेखाद्या अैश्वर्यसंपन्न राजाप्रमाणें तें आपल्याबरोबर मोठा थोरला लवाजमा घेअून येतं. त्याच्या या परिवारांत दुःखाबरोबर अनीतिहि असते. "पांच हजारांचं वर्षासन मला असतं तर मला वाटतं, मीं चांगली स्त्री होअू शकलें असतें" हे बेकी शार्पचे सुप्रसिद्ध अुद्‌गार यथार्थ आहेत. धनसंपन्न माणसं दुष्कृत्यं करीत नाहींत असं अर्थात् नाहीं. परंतु सरळ, प्रामाणिक राहण्याची त्यांना संधि असते, शक्यता असते. प्रामाणिकपणा सोडला नाहीं तर चुलींतील विस्तव पेटणार नाहीं, पोटांतली आग विझणार नाहीं अशी कांहीं त्याची अवस्था नसते. शील आणि जीवन यांतून अेकाची निवड करण्याचें भयानक द्वंद्व त्यांच्या-समोर कधी अुभं राहात नाहीं. आणि या माणसाच्या बाबतींत तर त्याच्या अेकटयाच्या जीवनाचा प्रश्न नव्हता. तीन माणसं त्याच्यावर अवलंबून होतीं. आता त्यानं लग्न कां करावं आणि लग्न केलं तरी दोन अपत्यांना जन्म कां द्यावा हा मात्र प्रश्न आहे. या प्रश्नाला खरोखर अुत्तर नाहीं. त्याचं अुत्तर अेवढंच कीं, दोन मुलांना जन्म दिल्याबद्दल ज्या सामाजिक व्यवस्थेंत अितकं दारुण शासन माणसाला भोगावं लागतं तिच्यामध्यें कांहींतरी राक्षसी दोष असला पाहिजे. हा दोष दूर होअीपर्यंत लोकांनीं आत्महत्याच करीत राहावं का ? होय म्हणावं तरी पंचाईत, नाहीं म्हणावं तरी पंचाअीत ! खरोखर, पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत असती तर फार बरं झालं असतं. काळोखांतून निर्माण झालेले आणि काळोखाकडे नेणारे असे विचित्र, क्रूर प्रश्न मग निर्माणच झाले नसते. परंतु, पृथ्वीनें आपला तो स्वभावधर्म सोडला आणि सोन्याचांदीच्या मुद्रांकित वर्तुळा-

भोंवतीं ती आपला मोठेपणा विसरून प्रदक्षिणा घालूं लागली. माणसानं अुत्पन्न केलेल्या या भस्मासुरानं शेवटीं माणसाच्या मस्तकावर हात ठेविला. सर्व पृथ्वी नष्ट करण्यासाठीं त्यानं आपला हात वरती अुचलला आहे. अमृत गिळूं पाहणाऱ्या राहूवर परमेश्वरानं आपलं सुदर्शन सोडून त्याचा कंठ छेदून टाकला. माणसाचं जीवन गिळूं बघणाऱ्या या छोट्या असुरावर जो आपल्या सुदर्शनाचा प्रहार करील, त्याच्या गुलामगिरींतून मानवाची मुक्तता करील, तोहि खचित परमेश्वराच्या पदवीला पोहोचेल.

●●●

# आरामखुर्ची....

आज मला आरामखुर्चीची फार आवश्यकता आहे–

सकाळपासून मी ' आरामखुर्ची ' वरून माझें मन काढण्याचा-उठविण्याचा प्रयत्न करीत आहें. परंतु बालहट्ट, स्त्रीहट्ट आणि राजहट्ट या तीन नामांकित हट्टाहूनहि मनाचा हट्ट फार तापदायक असतो. बालक, स्त्री आणि राजा यांच्याकडे अनुक्रमें रागानें, प्रेमानें आणि आदरानें पाहिलें कीं आपल्या हट्टाचा त्यांना विसर पडण्याची शक्यता असते. मुलाला भीतीनें, स्त्रीला प्रेमानें आणि राजाला स्तुतीनें सहज वश करतां येते. परंतु मनावर यांपैकीं कसलीहि मात्रा चालत नाहीं. मनाच्या ठिकाणीं मूल, स्त्री आणि राजा या तिघांचेंहि संमेलन झालेलें असतें, तिघांचेंहि हट्ट करण्याचें सामर्थ्य मनामध्यें संघटित झालेलें असतें. मुलाप्रमाणें तें आक्रोश करीत असतें, स्त्रीप्रमाणें धुसफुसत असतें आणि राजाप्रमाणें आदेश देत असतें. मनाच्या हट्टावर मात्रा नाहीं.

मी माझ्या मनाची कितीतरी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. रामदास आणि केशवकुमार या कवींप्रमाणें मनाला समोर उभें करून त्याच्याशीं मीं निःसंकोचपणें पुढीलप्रमाणें संभाषणहि केलें.

मी :—मना सज्जना, तूं आज हें भलतेंच काय धरून बसला आहेस ?

मन :—मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :—तुला आरामखुर्ची कशाला हवी ? ही नवी लांकडी खुर्ची आहे, ही दुसरी वेताची खुर्ची आहे, आरामानें लोळायचें असेल तर ही गादी आहे, खालीं बसायचें असेल तर गालिचा आहे.

मन :—मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :—मना सज्जना, रामदासांनीं सांगितलंय, विवेक सोडूं नकोस म्हणून ! आरामखुर्चींतच विशेष काय आहे ? आरामखुर्चीनं आमच्या राजकारणाचं किती नुकसान झालं होतं, आमचं स्वातंत्र्य किती दूर गेलं होतं हें तुला ठाऊक नाहीं काय ? शरीरशास्त्राच्या दृष्टीनंहि आरामखुर्चीवर बसणं मोठं हानिकारक असतं. म्हणून म्हणतों बाबा, —

मन :—मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :—अरे वेड्या, आरामखुर्चीचं कौतुक काय इतकं ? एका मित्राकडून आज हें सुंदर गोष्टींचं पुस्तक आणलं आहे. तें कवितांचं पुस्तक अजून चाळूनहि पाहिलं नाहीं ! जागतिक साहित्यांत अमर ठरलेल्या वाङ्मयासाठीं —

मन :—मला आरामखुर्ची पाहिज !

मी :—तूं चतुर आहेस, सूज्ञ आहेस. मी काय कल्पवृक्षाच्या खालीं बसलों आहे, कीं आरामखुर्ची म्हणतांच समोर आरामखुर्ची उभी राहील ! आज संध्याकाळीं आपण राणीच्या बागेंत जाऊं. तेथल्या कासवाच्या पाठीवर, माकडांच्या लीलांवर, काळ्या वाघाच्या उडीवर, निद्रिस्त सिंहाच्या आयाळीवर तूं किती दिवसांत नजर टाकलेली नाहींस हें तुला आठवतें काय ? लोकांच्या उपद्रवामुळें तो झोपलेला केसरी जेव्हां जागा होऊन त्वेषानें गर्जना करूं लागतो तेव्हां —

मन :—मला आरामखुर्ची पाहिजे !

मी :—राणीचा बाग नको असेल तर आपण सिनेमाला जाऊं. मना, मेट्रोला लॉरेल हार्डीचं पिक्चर लागलं आहे, दोन तास हास्यरसांत न्हाऊन निघशील तूं ! थिएटर एअरकन्डिशन्ड आहे, शिवाय तेथील खुर्च्याहि फार आरामशीर आहेत.

मन :—मला आरामखुर्ची पाहिजे !

याप्रमाणें बराच वेळ मीं मनाची मनधरणी करण्याचा उद्योग केला. परंतु तो यशस्वी झाला नाहीं ! आपल्या अत्यंत तर्कशुद्ध आणि मार्मिक मखवी न ऐकतां सावकारानें सारखी पैशाची मागणी करीत राहावें त्याप्रमाणें 'मला आरामखुर्ची पाहिजे' हें त्याचें पालुपद कांहीं केल्या थांबेना ! किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटांचा एकच एक ध्वनि वातावरणांत सारखा घुमत राहावा त्याप्रमाणें आरामखुर्चीची मागणी माझ्या मनांत सारखी घुमत राहिली.

आणि यांत मनाचा कांहीं दोष आहे असें नाहीं. कारण आरामखुर्ची ही चीज मला अत्यंत प्रिय आहे. सोळा हजार बायका असूनहि श्रीकृष्ण नेहमीं रुक्मिणीच्याच महालांत असायचा, त्याप्रमाणें माझ्या खोलींत जेव्हां आरामखुर्ची असते तेव्हां इतर खुर्च्यांकडे दुर्लक्ष करून मी आरामखुर्चीचाच नेहमीं आश्रय घेत असतों. आरामखुर्चीवरील या गाढ प्रेमामुळेंच आजवर दोनतीन आरामखुर्च्यांचा बळी मीं घेतला आहे. ती नसली म्हणजे मी तिच्यासाठीं दुःख करतों; परंतु ती असली म्हणजे तिच्या सुखदुःखाची पर्वा न करतां, तिचा इतका अतिरिक्त आणि अविरत उपयोग करतों कीं, तिचें कृश शरीर लौकरच गलितगात्र होतें आणि तिच्या निखळलेल्या लांकडांची मोळी अडगळीच्या खोलींत टाकावी लागते, किंवा दारावर आलेल्या सौदागराच्या स्वाधीन करावी लागते. ज्या वस्तूवर आपण प्रेम करतों ती वस्तु वापरण्यास त्या प्रेमामुळेंच आपण खरोखर अपात्र असतों हें सत्य नाहीं काय ? केक खाणें आणि जवळ बाळगणें या दोन्ही गोष्टी एकदम होऊं शकत नाहींत अशी इंग्रजींत म्हण आहे ती या दृष्टीनें फार यथार्थ आहे. भुकेला मनुष्य केकवर प्रेम करतो आणि त्या प्रेमामुळेंच तिचें भक्षण म्हणजे तिचा नाशहि करतों. लहान मुलाला एखादी वस्तू आवडली, तिच्यावर आपलें प्रेम जडल्याचें त्यानें अंगविक्षेप आणि मुद्राभिनय यांच्या द्वारां सिद्ध केलें म्हणजे आपण ( त्या वस्तूविषयीं आपल्यालाहि कांहीं प्रेम असेल तर ) ती चटकन बाजूला उचलून त्याच्या दृष्टीआड करतो. तसें न केल्यास त्या वस्तूची जीवितयात्रा समाप्त झाली असें आपण समजतों. उदाहरणार्थ, तुमच्या अंतःकरणांतील वात्सल्यरस ओसंडूं लागल्यानें तुम्ही आपल्या अपत्याला टेबलावर बसविलें. ( वात्सल्याच्या आवेगांत नेहमीं होणाऱ्या अपराधांपैकीं एक अपराध ) आपल्या त्या कुलदीपकाची दृष्टि सहजच टेबलावर असलेल्या कांचेच्या रंगीत, नक्षीदार दौतीकडे जाते. दुष्यन्ताचें शकुंतलेवर प्रथमदर्शनीं प्रेम जडतें त्याप्रमाणें त्या दौतीच्या दर्शनानें तो चिमकुला दुष्यन्त घायाळ होऊन जातो. 'भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि' या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें त्याच्या अंतःकरणांतील कांहीं पूर्वजन्मीचे सुप्त स्नेहसंबंध जागृत होतात. त्याचे डोळे विस्फारतात, त्याच्या ओंठावरती हास्यलहरी नाचूं लागतात, त्याच्या तोंडांतून कांहीं अमानुष चित्कार बाहेर पडतात, त्याचे बाहुपाश वरती जातात आणि ( तुम्ही झटपट

केली नाहीं तर ) दुसऱ्या क्षणीं ती दौत आंतल्या शाईसह त्याच्या हातांत जातें ! होऊं नये ती गोष्ट होऊन गेली आहे, आतां तिची पूर्तता पाहण्यावाचून तुम्हाला गन्यंतर नाहीं. दौतीच्या चारी बाजूंचें तें बालक कसोशीनें कौतुक आणि निरीक्षण करतें, तिच्यांतील शाईचा शेवटचा थेंब बाहेर काढतें आणि शेवटीं तिचें सामर्थ्य अजमावून पाहण्यासाठीं खालच्या फर्शीवर जोरानें भिरकावून देतें. बालकाच्या प्रेमामुळें दौतीच्या कांचा होतात ! मोठीं माणसें हीं सुद्धां आकारानें वाढलेलीं मुलेंच असतात. तींहि आपल्या गाढ प्रेमानें कोणत्या तरी वस्तूचा, कोणत्या तरी व्यक्तीचा नाश करीत असतात ! पुष्कळसे प्रेमविवाह अयशस्वी होतात याचें कारण विवाहाइतकेंच प्रेम हें सुद्धां असतें यांत संशय नाहीं.

परंतु या साऱ्या शहाणपणाचा काडीमात्र उपयोग नाहीं याची मला जाणीव आहे. माझ्या दारावर आरामखुर्च्या विकणारा तो मनुष्य आला आणि माझी सांपत्तिक परिस्थिति अनुकूल असली तर मी तिसरी आरामखुर्ची ताबडतोब खरेदी करीन यांत मुळींच शंका नाहीं. त्यावेळेस मोंगल बादशहाचें मयूरासन कोणी घेऊन आला तरी मला त्याचें कौतुक वाटणार नाहीं. किंबहुना मी प्रथम आरामखुर्ची खरेदी करीन, तिच्यांत स्थानापन्न होईन आणि नंतरच त्या मयूरासनाकडे नजर टाकीन, त्याचें कौतुक करीन. आरामखुर्चीवर बसल्यावर कोणत्याहि गोष्टीचें कौतुक करणें हा केवळ हातचा मळ होतो. साध्या खुर्चीवर बसून न आवडलेलीं पुस्तकें आरामखुर्चीत बसून मीं आनंदानें वाचलीं आहेत. एरव्ही ज्या माणसाशीं पांच मिनिटेंहि संवाद करणें मला जड गेलें असतें त्यांच्याशी आरामखुर्चीत बसून मी तासन्‌तास गप्पा मारलेल्या आहेत. आरामखुर्चीत बसल्यावर माणसाचें अंतःकरण उदार होतें, स्नेहमय होतें, सहानुभूतिपूर्ण होतें. आरामखुर्चीतून कोणाला कांहीं नाकारतां येणें शक्य नाहीं. स्वतःसंबंधींचा आत्मविश्वासहि आरामखुर्चीत बसल्यावर बलवत्तर होतो. आपण आरामखुर्चीत बसलेलों असतांना चोर, शेजारी, पिशाच्च, घेणेदार, कोणीहि आले तरी आपण डगमगत नाहीं. सज्जन आले तर ती आपल्याला सौजन्याचा पुरवठा करते, दुर्जन आले तर आपल्या अहंकारांत आणि प्रतिकार बुद्धींत ती भर घालते. मी नवीनच एखाद्या माणसाला भेटायला गेलों आणि तो आरामखुर्चीत बसलेला असला तर त्याच्याशीं स्नेहसंबंध प्रस्थापित करणें मला कठीण जात नाहीं.

या ऐहिक जगांत सर्वगुणसंपन्न असें काय आहे ? जगांत आल्यावर देवाचा देवसुद्धां एका पायानें लंगडा आणि मनानें ठकडा झाल्याचें आपल्या ऐकिवांत आहे. सर्व चांगल्या गोष्टींप्रमाणें आरामखुर्चीच्या चांगुलपणालाहि मर्यादा आहेत. आरामखुर्चींत बसल्यावर देवांनींहि आपला हेवा करावा अशी परिस्थिति निर्माण होते ही गोष्ट खरी. परंतु म्हणून दिवसाचे चोवीस तास आरामखुर्चींत बसूनच आपण जीवन कंठूं लागलों तर तें इष्ट होणार नाहीं. सकाळच्या वेळीं आरामखुर्चींत सहसा बसूं नये असें माझें अनुभवसिद्ध मत आहे. सकाळ ही काम करण्याची सर्वोत्कृष्ट वेळ आहे आणि आरामखुर्ची ही कांहीं काम करण्याची जागा नव्हे. आरामखुर्चींत बसून कामाचा विचार करतां येतो, काम करतां येत नाहीं; मनोराज्य करतां येतें, व्यवहार करतां येत नाहीं; वाचतां येतें, लिहितां येत नाहीं. आरामखुर्ची ही कर्मभूमि नव्हे. सकाळीं खुर्चीवर आणि रात्रीं किंवा संध्याकाळीं आरामखुर्चीवर, ही माणसाच्या बसण्याची आदर्श व्यवस्था आहे असें मला वाटतें. संयम ठेवला नाहीं तर आरामखुर्चीचें सुखांतून व्यसनांत रूपांतर व्हावयास उशीर लागत नाहीं. कांहीं उमलते मोहरे जवळ आरामखुर्ची असल्यामुळें कामाला आल्याचें म्हणजे निकामी झाल्याचें मला माहीत आहे. आरामखुर्चीचें राजकारण हा निंदाव्यंजक शद्बप्रयोग अस्तित्वांत आला त्याचें कारण हेंच कीं,असलें राजकारण करणाऱ्या लोकांना आरामखुर्ची हें राजकारण करण्याचें स्थळ किंवा साधन नव्हे हें समजलें नाहीं.रणांगणावर तरवार किंवा व्यासपीठावर वक्तृत्व गाजवून परत आल्यावर आरामखुर्ची ही विश्रांति घेण्याची जागा आहे. परंतु हे लोक आरामखुर्चींतून लढाई करूं लागल्यामुळें लोकनिंदेशिवाय दुसरें कांहींच त्यांच्या पदरांत पडलें नाहीं. आरामखुर्चीच्या बाजूनें मी इतकेंच म्हणेन कीं, हा दोष आरामखुर्चीचा नसून तिच्या योजनेचा आहे. आरामखुर्चीचा इतका काटेकोर सदुपयोग करणें मलाहि कधीं जमलेलें नाहीं. हें सारें ध्यानांत घेऊनहि आरामखुर्ची ही सुसंस्कृत मानवाच्या जीवनांतील एक श्रेष्ठ अशी संस्था आहे हें कोणालाहि मान्य करावें लागेल. या संस्थेंत मी लौकरच पुन्हां दाखल होण्याची आशा करतों.

● ● ●

# तो कोठें गेला असेल....

कोणाचा होता कुणास ठाऊक तो कुत्रा, माझा नव्हता हें मात्र निश्चित. परंतु स्नेहबंधनें अकल्पितपणें आणि अचानकपणें सांधलीं जातात तीं कांहीं केवळ माणसामाणसांतच नव्हे. एके दिवशीं संध्याकाळीं मी घराकडे परत येत असतां, रस्त्याच्या एका कोपऱ्यांत विसावा घेत पडलेल्या त्या राजश्रींनीं मला पाहिलें आणि पूर्व जन्मींचे कांहीं ऋणानुबंध स्मरून माझ्याकडे धांव घेतली. कुत्रा या जातीविषयीं माझ्या अंतःकरणांतहि थोडीशी आस्था असल्यानें त्याला समजतील आणि आवडतील असे चारदोन अमानुष आवाज मीं काढले आणि तुझ्या स्वयंस्फूर्त स्नेहाचा मी साभार स्वीकार करतों असें त्याला कळविलें.

तुम्हाला ठाऊक असेल, कुत्र्याच्या अपेक्षा थोडक्या असतात. त्याची मागणी फार अल्प असते. एखादी चुटकी, एखादी शिटी किंवा हाताची एखादी चाळवाचाळव एवढ्यावरच तो बेहद्द खूष होऊन जातो आणि आपलें सारें जीवन तुमच्या पायावर समर्पण करण्याची सिद्धता दाखवितो. त्याच्या अंतः-करणांतील स्नेहसागर नेहमीं भरतीच्या अवस्थेंत असतो. आपल्या प्रेमाला फारसा वाव नाहीं हेंच त्याच्या अंतर्यामींचें एक दुःख असतें. हिरवेपिवळे आवाज काढून एखादा कुत्रा कुठें मध्यरात्रीं आक्रोश करूं लागला म्हणजे गेल्या चोवीस तासांत त्याच्या अंगावर कुणीं हात फिरवला नाहीं, कोणींहि त्याच्याकडे पाहून एखादा चित्कार केला नाहीं, एखादी चुटकी वाजवली नाहीं, हेंच त्याचें गाऱ्हाणें असावें असें मला वाटतें. मायेच्या स्पर्शासाठीं तडफडणाऱ्या अकेल्या जिवाचें तें आक्रंदन असावें असाच मला भास होतो. कदाचित् अकारणहि असेल तो. मध्यरात्र उलटून गेली आहे, रस्त्यांतली सारी रहदारी आणि दुनियेंतले सारे

कोलाहल शांत झालेले आहेत, निरभ्र चांदण्यामुळें सर्व जगाला एखाद्या अचेतन संगमरवरी शिल्पकृतीचें किंवा अथांग काळोखामुळें एखाद्या उदासवाण्या डोहाचें स्वरूप आलेलें आहे, अशा वेळीं बिछान्यावर जाग्या राहणाऱ्या माणसाला अनेक अकारण आणि अवास्तव भास होऊं शकतात.

कुत्र्याच्या अपेक्षा थोड्या असतात हा सामान्य नियम झाला. पण मला भटलेल्या त्या दोस्ताच्या अपेक्षा फारच थोड्या होत्या. वर सांगितल्याप्रमाणें माझ्याशीं परिचय करून घेतांच तो तडक माझ्याबरोबर चालायला लागला. चित्रकार आपल्या चित्रविषयाच्या चारी बाजूंना फिरतो त्याप्रमाणें माझ्या पायाभोंवताली चौफेर प्रदक्षिणा घालीत, ते कोणत्या दिशेला आणि कोणत्या गतीनें जात आहेत याचा आढावा घेत आणि त्याप्रमाणें आपली दिशा व गति निश्चित करीत, आसपासच्या लोकांकडे पाहून ' हे आमचे मालक आहेत यांच्या वाटेला जाऊं नका किंवा वाटेंत येऊं नका ' असें सांगण्याचा आविर्भाव करीत, स्वारी माझ्या मुक्कामापर्यंत आली; आणि मी फाटकांत शिरतांच माझ्याशीं विचारविनिमय न करतां माघारी वळून परत आपल्या जागीं गेली.

पुढील दोनचार दिवसांत त्या कुत्र्याकडे माझें बरेंच लक्ष वेधलें. त्याला निश्चित आपली अशी जागा नव्हती हें मला आढळून आलें. भूतदयेनें प्रेरित होऊन कोणीतरी त्याच्या गळ्यांत पट्टा अडकविला होता आणि आपलें कर्तव्य संपलें असें समजून, कुत्र्यांपेक्षां माणसांचीं संख्या अधिक असलेल्या या अफाट शहरांत त्याला आपल्या नशिबासह मोकळा सोडला होता.

रस्त्याला लागलेला असला तरी तसा तो खाऊन पिऊन सुखी दिसला. घर नसलेल्या माणसापेक्षां घर नसलेला कुत्रा अधिक भाग्यवान असतो यांत शंका नाहीं.तीन हॉटेलमालकांनीं त्याच्या चरितार्थाची जबाबदारी सामुदायिक-रीत्या उचलली होती असें मला आढळून आलें. खाल्लेल्या अन्नाला जागून तो तिघांच्याहि दाराशीं थोडा थोडा वेळ बसे आणि हॉटेलच्या पायऱ्या चढणारे लोक हे एक तर चोर किंवा आपले प्रतिस्पर्धी आहेत असा संशय येऊन त्याच्या अंगावर केव्हां भुंकायला लागे. इतकें झाल्यावर मालक अर्थातच त्याला दूर जाण्याची सूचना किंवा धमकी देत. मला त्या कुत्र्याचें वैशिष्ट्य वाटलें तें त्याच्या समंजसपणाचें. धमकी असो, सूचना असो वा विनंती असो,एका शब्दा-

नंतर दुसरा शब्द ऐकायला तो कधीं उभा राहात नसे.आपण कोणत्या ठिकाणीं किती वेळ हवे आहोंत हें समजणें खरोखर मोठें कठीण असतें. तुम्हांआम्हां माणसांच्याहि ध्यानांत तें अनेकदां येत नाहीं. परंतु त्या कुत्र्याला मात्र तें फार चांगलें समजे. आपली आतां येथें बूज राहाणार नाहीं अशी शंका येतांच तो संथपणें उठे, ' ठीक आहे , पुन्हां केव्हांतरी भेटेन ' असें सुचविणारी शेपटीची हालवाहालव करी आणि रस्त्याच्या कडेकडेनें कोठेंतरी·जाऊं लागे.

दिवसभर तो काय उद्योग करीत असे याची मला कल्पना नाहीं एका सुभाषितांतील ' संयमी ' लोकांच्या वर्णनानुसार जग झोंपलें म्हणजे कुत्र्यांचा दिवस उजाडतो. संयमी लोकांविषयीं मला माहिती नाहीं. परंतु कुत्र्यांच्या बाबतींत तरी याचा क्रमप्राप्त परिणाम असा होतो कीं जगाचा दिवस उजाडला कीं त्यांची रात्र सुरू होते. अर्थात् जे कुत्रे घरांत शोभेसाठीं पाळले जातात, मालकांच्या अथवा मालकिणीच्या मांडीवर ज्यांचें अर्धे जीवन व्यतीत होतें, तारुण्याच्या ऐन उमेदींतहि जे चेंडूबरोबर खेळत राहातात आणि मांजराला पाहून जे भयग्रस्त होतात त्या कुत्र्यांच्या बाबतींत हें खरें नाहीं. रात्र जागून काढण्याचें त्यांना कांहीं कारण नसतें. ते जागे राहिले तर त्यांच्या संरक्षणासाठीं त्यांच्या मालकांनाही जागें राहावें लागेल ! परंतु मानवजातीच्या संरक्षणाची जबाबदारी उचलून जे कुत्रे रात्रभर रस्त्यावर गस्त घालीत असतात त्यांना दिवसां झोपा घेणें प्राप्त असतें. या अशा कुत्र्यांतच माझा दोस्त जमा असल्यामुळें कोठेंतरी निवारा शोधून तो झोंप काढीत असावा असें मला वाटतें.माझ्याप्रमाणें इतरहि अनेक लोकांच्या बरोबर जाऊन त्यांचा स्नेह तो संपादन करीत असावा. मला त्याबद्दल मत्सर वाटत नाहीं, केवळ समाधान वाटतें. त्यांतील एखाद्या उदार माणसानें त्याला कायमचा आश्रय दिला आहे काय ? कारण गेले कित्येक दिवस मला माझ्या त्या मित्राचें दर्शन झालेलें नाहीं. एखादा मोठा थोरला पुतळा काढून टाकल्यावर तो चौक ओका भासावा त्याप्रमाणें नाक्यावरील त्याची जागा मला रोज रिकामी आढळते आणि रिकामी वाटतेहि.

परंतु त्याला कोणी आश्रय दिला नसेल तर ? मुंबईसारख्या शहरांत खुद्द मनुष्यसुद्धां नेहमीं मरणाच्या किनाऱ्यावरून प्रवास करीत असतो. मग तो तर एक मुका निराधार प्राणी ! एखाद्या मोटारीच्या ओझ्याखालीं तर

त्याच्या सेवापूर्ण जीवनाची इतिश्री झाली नसेल–? माणसाच्या प्रेमासाठीं आसावलेलें त्याचें भोळें अंत:करण आगगाडीच्या लोखंडी चक्राखालीं दुभंग झालें असेल ? कीं मालक नाहीं म्हणून त्याला गोळी घालून ठार करण्यांत आलें असेल ?

खालीं मान घालून रस्त्याच्या कडेनें संथपणें जाणारी त्याची आकृति आठवली कीं या क्रूर शंका माझ्या मनाला स्पर्श करतात आणि माणसानें कुत्र्याला किती अधोगत आणि निराधार केलें आहे याची जाणीव होते. कुत्र्यानें माणसाची ही पिढीजाद गुलामगिरी कधींपासून पत्करली ? ती पत्करल्यामुळेंच अरण्यांत आत्मविश्वासानें संचार करण्याऐवजीं त्याला गजबजलेल्या रस्त्यांतून भयाकुल होऊन हिंडावें लागतें, स्वपराक्रमानें स्वत:चें भक्ष मिळविण्याऐवजीं भाकरीच्या पापुद्र्यासाठीं लांगूलचालन करावें लागतें, इतर हिंस्त्र पशूंशीं झुंजून मरण्याऐवजीं मोटारीखालीं असहायपणें प्राण सोडावा लागतो आणि स्वत:च्या कर्तृत्वाऐवजीं गळ्यांतील पट्ट्याच्या आधारावरच जीवंत राहाण्याचा अधिकार मिळवावा लागतो. आज त्या चतुष्पादाला स्वतंत्र असें अस्तित्वच उरलेलें नाहीं. माणसाचा दास म्हणून तो जन्माला येतो आणि माणसाचा दास म्हणूनच तो मरण पावतो. आम्हीं त्याच्या भाकरीची व्यवस्था केली, पण त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें. त्याला संस्कृति दिली पण त्याचा स्वाभिमान छिनून घेतला. स्वातंत्र्यापेक्षां अधिक संरक्षणीय, स्वाभिमानापेक्षां अधिक पूजनीय आणि पारतंत्र्यापेक्षां अधिक तिरस्कारार्ह अशी दुसरी कोणतीहि गोष्ट अस्तित्वांत असू शकत नाहीं. स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांची किंमत देऊन मिळवलेला भाकरीचा तुकडा तुमचें शरीर कांहीं काळ जीवंत ठेवील, पण तुमचा जीवंतपणा मात्र कायमचा मारून टाकील. गुलामगिरीनें माखलेली भाकरी ही स्वत:च्या रक्तानें माखलेली भाकरी असते. ती खाऊन आपणच आपल्या जीवनाचा संहार करीत असतो. परंतु या गोष्टी आम्हां बुद्धिमान माणसांच्याहि नीटशा ध्यानांत येत नाहींत. मग त्या अल्पबुद्ध जनावरांना समजू नये यांत काय आश्चर्य ?

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...७१५६२... दि: ...१।७।८५...
क्रमांक ...९६८... नोंद दि: २०।६।७०

# टिळक आणि सुपारी....

'लोकमान्यांचें कांहींतरी वैशिष्टच त्यांत ( आठवणींत ) दिसून आलें पाहिजे नाहींतर, लोकमान्यांना सुपारीचें व्यसन होतें तें इतकें कीं, एकदां असा प्रसंग आला कीं, त्यांच्या खिशांतली सर्व सुपारी संपली होती आणि सुपारीची तल्लफ तर लागलेली. तेव्हां त्यांनीं मुद्दाम मला हांक मारून माझ्याजवळची सुपारी मागून घेतली, ही गोष्ट लोकमान्यांची आठवण म्हणून लोकमान्य माझ्याशीं बोलले हें शाबीत करण्याच्या अनावर इच्छेनें सांगत सुटणाऱ्या भोळ्याभावड्या खुळचट किंवा स्वयंमन्य टिळक भक्ताबद्दल हसूं आल्याशिवाय राहात नाहीं.... ज्या आठवणींत लोकमान्यांची आठवण, ओळख पटत नाहीं ती आठवण तरी कसली ? '

' लोकमान्य टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका ' हा ग्रंथ चाळीत असतां, त्याच्या संपादकीय निवेदनांतील वरील वाक्यावर मी ठेंचाळून उभा राहिलों. एका मान्यवर विचारवंतानें संग्राहकास पाठविलेल्या सूचना-पत्रांतील तो उतारा होता. मोठ्या माणसांकडे किंवा त्यांच्या व्यक्तित्वाकडे पाहण्याची ही भूमिका मला कधींच फारशी प्रिय वाटत नाहीं. सुपारीची अनावर तल्लफ आल्यामुळें टिळकांनीं मला हांक मारून माझ्याजवळची सुपारी मागून घेतली असें सांगणारा मनुष्य खरोखर हास्यास्पद होईल काय ? निदान मला तो खचित हास्यास्पद वाटला नसता. मी उत्सुकतेनें त्याची ती हकीगत ऐकली असती आणि तसल्याच कांहीं आणखी आठवणी त्यांच्या संग्रहीं असत्या तर त्या त्याला सांगायला लावण्याचा प्रयत्न केला असता. मोठ्या माणसांच्या छोट्या गोष्टींपेक्षां अधिक मनोरंजक दुसरें कांहीं असूं शकणार नाहीं. टिळकांची

सुपारीची संवय त्यांच्या स्वराज्यविषयक प्रयत्नांइतकीच प्रख्यात झाली याचें कारण वेगळें नाहीं. सार्वभौम साम्राज्यसत्तेसमोर डोंगराप्रमाणें छाती काढून उभा राहणारा हा प्रखर लोकनेता सुपारीच्या एका खांडासाठीं हैराण झाला होता, विविध समस्यांनीं भारावलेलें त्याचें जीवन सुपारीच्या अभावीं त्याल निःसत्व आणि सुनें वाटत होतें, त्यानें एका सामान्य माणसास हांक मारली आणि त्याच्या जवळची सुपारी मागून घेतली; हा विचार मनाला कांहीं त्रिचित्र आल्हाद देणारा आहे.

अशा आठवणींनीं किंवा हकीगतींनीं चरित्रनायकाच्या मोठेपणास कांहीं बाध येतो असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. असें जे समजतात त्यांची मोठेपणाविषयींची कल्पना आणि अपेक्षा अयथार्थ असते. एखादी देवतेची मूर्ति ज्याप्रमाणें संपूर्णतः संगमरवराची असते किंवा पुतळा आपादमस्तक ब्राँझचा असतो त्याप्रमाणें कोणताहि मोठा मनुष्य संपूर्णतः मोठेपणाचा घडविलेला असूं शकत नाहीं. इंद्रधनुष्याप्रमाणें प्रत्येक माणसाचें व्यक्तित्व अनेक रंगांनीं बनविलेलें असतें. मोठीं माणसेंहि याला अपवाद नसतात. तीं मोठीं असतात त्याप्रमाणें माणसेंहि असतात हें विसरतां कामा नये. माणसाला साहजिक असे लहानसहान दोष, अशा बारीकसारीक संवयी मोठ्या माणसांतहि जरूर असूं शकतात. कोणताहि मोठा माणूस चोवीस तास मोठा असूं शकत नाहीं. तो अनेकदां सामान्य माणसाप्रमाणें लहान होतो आणि कित्येकदां तर सामान्य माणसाहूनहि लहान होतो.परंतु या लहानपणावरून ते लहान किंवा सामान्य ठरत नाहींत.त्यांचें मोठेपण आणि असामान्यत्व हें मोठ्या आणि असामान्य गोष्टींतच व्यक्त झालेलें असतें आणि त्यांतच त्यांचा शोध घेतला पाहिजे. वर्तनाच्या अथवा वाणीच्या प्रत्येक छटेंतून त्यांच्या मोठेपणाचा शोध घेणें म्हणजे सोन्याची खाण असलेल्या जमिनींत दगडमातीच्या प्रत्येक कणाला सोनें बिलगलें आहे अशी अपेक्षा करण्यासारखें आहे. रणक्षेत्रावर प्रहार किंवा बंदुकीच्या गोळ्या हंसतमुखानें छातीवर झेलणारा वीर न्हाव्यापुढें बसल्यावर विव्हळणारच नाहीं अशीं खात्री देतां येईल काय ? परशुरामपंत पटवर्धन या पेशवेकालीन शूर सरदाराची आख्यायिका प्रसिद्ध आहे. एका कारागिरानें त्या नामांकित योद्ध्याला असेंच कण्हायला लावलें होतें. इतक्या विजयानें तो कारागीर संतुष्ट झाला नाहीं. त्यानें पंतांना

खिजवून विचारलें, 'भाऊसाहेब, थोडासा वस्तरा लागला म्हणून तुम्ही कण्हतां, मग लढाईच्या वेळीं काय करीत असाल ?' भाऊसाहेबांनीं स्मित केलें आणि सर्व विधि आटोपल्यावर युद्धाच्या वेळीं आपण काय करतों हें त्या कारागिराला सप्रयोग दाखविलें. त्यांनीं एक भाला घेतला आणि न्हाव्याच्या पायावर आपला पाय ठेवून तो आरपार मारला. पाय गेल्यावर न्हाव्याच्या डोक्यांत प्रकाश पडला कीं शत्रू आणि न्हावी यांच्याशीं वागतांना माणसाच्या मनोवृत्ति वेगळ्या असतात. थोर लोकांच्या लहानसहान गोष्टीवरून त्यांची थोरवी नाकारणारे लोक या कारागिराचे समानधर्म होत. हिमालय पर्वताच्या रांगेमध्यें सर्व भरणा गौरीशंकरांचा आणि धवलगिरींचाच आहे निदान असावा असा त्यांचा आग्रह. हिमालयांतहि अगदीं कमी उंचीची छोटीं टेकाडें असू शकतील हें त्यांना मान्य नसतें. असे लोक थोर पुरुषांचीं चरित्रें लिहून त्यांचें हित साधण्याऐवजी अहितच साधीत असतात. एखाद्या मोठ्या थोरल्या काळ्याभोर, रुक्ष पहाडाप्रमाणें चरित्रनायकाचा गुणसंभार ते वाचकांपुढें उभा करतात आणि त्याच्या माणुसकीचे उडते बागडते झरे मात्र त्यांच्यापासून लपवून ठेवतात.

मोठ्या माणसांच्या छोट्या गोष्टींबद्दल सामान्य माणसाला नेहमींच कुतूहल असतें. तें कुतूहल भागविणारें चरित्रच त्याला प्रिय होतें. लेखकानें चरित्रनायकाचें संगमरवराच्या रेखीव मूर्तींत रूपांतर केलें, प्रस्तावनेच्या आद्याक्षरापासून समारोपाच्या अंत्याक्षरापर्यंत शुद्ध स्तुतीची रास उभी केली कीं, त्या माणसाविषयींचा आदर वाढतो पण जिव्हाळा मात्र कमी होतो. आदर फार झाला कीं, आपलेपणास ओहटी लागते. आपल्यापेक्षा वाजवीहून अधिक श्रेष्ठ असलेल्या माणसाबद्दल जिव्हाळा वाटणें कठीण असतें. छोट्या गोष्टींनीं आणि आठवणींनीं सामान्य माणूस व चरित्रनायक यांच्यांतील अंतर कमी होतें. आणि कित्येकदां तर या मोठ्या माणसांपेक्षांहि कांहीं बाबतींत तरी आपण मोठे आहोत असें वाचकास वाटून त्याचें त्याविषयींचें प्रेम द्विगुणित होतें. समुद्रापलीकडील अज्ञात प्रदेशांना स्वातंत्र्याचा संदेश देणारा कागद, बाटलींत बंद करून, शेले ती समुद्रांत टाकीत असल्याची गोष्ट 'एरियल' मध्यें आपल्याला वाचायला मिळते. सज्ञान झालेला प्रत्येक वाचक ही हकीकत वाचून शेलेच्या अव्यवहारीपणाबद्दल किंबहुना खुळेपणाबद्दल आश्चर्यचकित होतो. शेलेसारखी

कविता आपल्याला लिहितां येत नाहीं तरी त्याच्यासारखा मूर्खपणाहि आपण करूं शकत नाहीं अशा विचारानें त्याच्या अहंकाराला समाधान लाभतें व तो निर्विकल्प मनानें शेलेचें कौतुक करूं शकतो. मोर्वाचें प्रस्तुत शेलेचरित्र किंवा बॉस्वेलचें जॉन्सनचरित्र आणि मराठींतील रमाबाई रानडे किंवा लक्ष्मीबाई टिळक यांचीं आत्मचरित्रें लोकप्रिय झालीं याचें कारण त्यांनीं लहानसहान गोष्टींवर दिलेला भर हेंच नाहीं का ? बॉस्वेलनें तर या बाबतींत विक्रम केलेला असून आजपर्यंतच्या जागतिक साहित्यामध्यें तो अजिक्य राहिलेला आहे. त्यानें जॉन्सनविषयीं इतकें सांगितलें आहे कीं, एखादा मनुष्य आत्मचरित्रांतसुद्धां तेवढें सांगूं शकणार नाहीं. जॉन्सन आपल्या वाङमयीन कर्तृत्वापेक्षां बॉस्वेलच्या चरित्रांतूनच अमरत्व पावलेला आहे. गबाळा आणि अस्वच्छ पोषाख केलेली, खूप खाणारी आणि खूप बोलणारी, विदूषकाप्रमाणें अकारण हर्षभरित होणारी आणि योग्याप्रमाणें आकाशाकडे पाहून उदासीन होणारी, विजेप्रमाणें कडाडणारी आणि झऱ्याप्रमाणें झुळझुळणारी, दारिद्र्यानें गांजलेली आणि आपल्या दरिद्री घराची अनाथअपंगांसाठीं धर्मशाळा करणारी, विसरभोळी आणि विद्वान्, तल्लख आणि विक्षिप्त, प्रेमळ आणि दुराग्रही अशी डॉ. जॉन्सनची ती स्थूल मूर्ति, काल–पथावरील खांब मोजीत अनंताकडे प्रवास करीत आहे, याचें श्रेय बव्हंशीं बॉस्वेललाच द्यावें लागेल. कोणत्याहि समकालीन साहित्य-सेवकापेक्षां डॉ. जॉन्सनची माहिती आम्हांला अधिक आहे असें एका टीका-कारानें म्हटलें तें सार्थच होय. बॉस्वेलनें जॉन्सनच्या विद्वत्तेची आणि प्रतिष्ठित गुणांचीच प्रशंसा केली असती, त्याच्या थोरपणाचाच भव्य पहाड वाचकांपुढें उभा केला असतां,त्याची अप्रतिष्ठितता आणि विक्षिप्तता त्यांच्यापासून लपवून ठेवली असती तर तो खास इतका यशस्वी झाला नसता. टिळकांना सुपारीची झनावर तल्लफ आल्याची हकीगत बॉस्वेलनें– तो त्यांचें चरित्र लिहावयास बसला असता तर खास गाळली नसती. अशा लहान गोष्टींनीं माणसाच्या मोठेपणाला उठाव मिळतो, त्याचें ' संगमरवरीकरण ' न होतां, त्याची हाडा-मांसाची जिवंत मूर्ति नजरेसमोर उभी राहते आणि त्याच्याविषयीं वाचकांना सप्रेम आदरभाव वाटूं लागतो.

लहान गोष्टींतून मोठेपणा शोधूं नये हें खरें, पण तसा शोध केल्यास तोहि कित्येकदां सफल होऊं शकतो. मंडळाच्या छापखान्याला आग लागली असतां,

टाइपाच्या केसी भर बुधवार चौकांतून टिळकांनीं आपल्या खांद्यावर वाहून नेल्या ही आठवण क्षुल्लक असली तरी त्यांच्या व्यक्तित्वावर प्रकाश पाडणारी नाहीं काय ? हिंदी राजकारणाचें ओझें खांद्यावर उचलणाऱ्या लोकमान्यांचा बेदरकारपणा आणि स्वतःची सामाजिक प्रतिष्ठा विसरून जाण्याची वृत्तीच त्यांत दिसून येते. बुधवारांतल्या गर्दीतून लोकमान्य टिळक खांद्यावर टाइपाच्या पेटया घेऊन लगबगीनें धांवत आहेत, जातांना लोकांचें धक्के त्यांना लागत आहेत आणि ते लोकांना धक्के देत आहेत, रस्त्यांतील अथवा खिडक्यांतील माणसें त्यांच्याकडे कुतूहलानें किंवा उपहासानें पाहात आहेत आणि त्या ब्राह्मणाच्या धांदलीबद्दल तर्ककुतर्क करीत आहेत हें सर्व चित्र क्षणभर डोळे मिटून दृष्टीसमोर उभें केलें तर तें टिळकांच्या दोनचारशें पानी गुणगायनापेक्षां क्वचित अधिक प्रभावी होऊं शकेल.

कित्येक आठवणी थोर पुरुषांच्या मोठेपणास विसंवादी असल्या तरी त्यांच्या माणूसपणाला धरून असतात. याच पुस्तकांत टिळक-आगरकरांसंबंधीं एक आठवण दिलेली आहे. सांगोवांगी आलेली ही हकीगत कदाचित पक्षपाती व असत्यहि असेल. पण सत्य आहे असें समजलें तरी आगरकरांच्या थोरवीला तीमुळें खग्रास ग्रहण लागतें असें मानणें वेडेपणाचें आहे. हकीगत अशी : श्रीमंत बाळासाहेब महाराज होळकर यांनीं पुण्याच्या एका मुक्कामांत टिळक-आगरकरांना मुलाखतीस बोलावलें. त्याप्रमाणें दोघेहि भेटीस गेले. होळकरांनीं उभयतांच्या कार्याची प्रशंसा केली आणि सातशें रुपयांच्या नोटांचें पुडकें टिळकांच्या हातीं दिलें. टिळकांना तें बरें वाटलें नाहीं. बाहेर आल्यावर त्यांनीं रक्कम परत करण्याचा प्रयत्न केला. परन्तु कारभाऱ्यांनीं ती घेण्याचें नाकारलें आणि आणि रक्कम दोघांच्या खाजगी उपयोगासाठीं दिल्याचें सांगितलें. आगरकरांना पैशाचा लोभ सुटला. टांग्यांत बसल्यावर, पैसे दोघांनीं सारखे वाटून घ्यावे असे उद्गार त्यांनीं टिळकांजवळ काढले. टिळक कांहीं उत्तरले नाहींत. ते सरळ शाळेंत गेले व सर्व रक्कम देणगी म्हणून त्यांनीं शाळेच्या फंडांत जमा केली. या ठिकाणीं आगरकरांच्या अभिमान्यांनीं मान लज्जेनें खालीं घालण्याचें किंवा टिळकांच्या भक्तांनीं ती गौरवानें वर उचलण्याचें कांहींच कारण नाहीं. आगरकरांचा स्वार्थत्याग इतका प्रखर आणि प्रकट आहे कीं, त्यांच्या अशा उद्गारांनी

( ते खरे असले तरी ) त्यास अणुमात्र उणेपणा येत नाहीं. आकाशांत उंचवर तळपणारा कळस हा कांहीं आकाशांत अधांतरीं उभारलेला नसतो. त्याच्या-खालीं जमिनीपर्यन्त इमारत असते आणि इमारतीच्या खालीं जमिनींत खोलवर गेलेला तिचा पाया असतो. मोठेपणा किंवा स्वार्थत्याग हे कांहीं माणसाचे शारीरिक अवयव नव्हेत कीं ते जन्मत:च त्याच्या बरोबर येतील स्वार्थाशीं झालेल्या घनघोर संग्रामांतूनच स्वार्थत्यागाचा उदय होतो. लहानपणाशीं पावलोंपावलीं झगडूनच मोठेपणा हा माणसाच्या जीवनावर आपली पताका लावतो. हा संग्राम लोकांपासून लपविणें आणि थोरांचें थोरपण हें स्वयंभूच आहे असें भासविणें म्हणजे त्यांची निंदा करणें होय.

• १ •

# तळहातावरील रेषा....

माझ्या हातावरील रेषा पाहून त्या हौशी ज्योतिष्यानें सांगितलें कीं, तुम्ही फार सज्जन आहांत, परंतु तुम्हांला त्वरित निर्णय घेतां येत नाहीं! हात पाहण्याचा हौशी उद्योग मींहि स्वतः केव्हां तरी करीत असल्यामुळें त्यांत तथ्य कितपत असतें याची मला साधारण कल्पना आहे. हस्तसामुद्रिकांत हात हा केवळ निमित्तापुरता असतो. त्यांतील प्रत्यक्ष फायदा अेवढाच कीं, हात गुंतून पडल्यामुळें आपलें संपूर्ण विधिलिखित अैकल्यावाचून त्या अभागी माणसाला सहसा पळून जातां येत नाहीं ! बाकी हाताचा उपयोग फारसा नाहीं. सांग-णाऱ्याची आणि ऐकणाऱ्याची अक्कल या दोहोंतील हें खरोखर द्वंद्व असतें. शरीर व्यायामानें पुष्ट होतें, त्याप्रमाणें ही अक्कलहि अर्थात् सरावानें वाढवितां येते. ती किती वाढू शकते याचें प्रत्यंतर पाहण्यासाठीं लाल पगडया घालून मोक्याच्या जागीं बसलेल्या कुडबुड्या जोशांकडे बघावें. एखाद्या खेडुताला समोर घेऊन त्याचें भूत-भविष्य-वर्तमान सांगण्यांत रंगून गेलेले असे एखादे जोशीबुवा दिसले कीं माझे पाय दोन-चार मिनिटें तरी तिथें रेंगाळल्यावाचून राहात नाहींत. फार मनोरंजक दृश्य—आणि श्राव्यहि असतें तें. जागेच्या निवडीपासून यांच्या अकलेच्या करामतीला सुरवात होते. कोर्ट, पोलीसकचेरी, दवाखाने आणि वायदेबाजार या त्यांच्या हमखास बाजारपेठा. कोर्टाची पायरी चढणाऱ्या लोकांत वकील हा एकटाच इसम शहाणा असतो. बाकीचे इतरेजन कसला तरी बोजा अंतःकरणावर घेऊन आंत प्रवेश करतात व तो वाढवून बाहेर येतात ! यमपुरीतून बाहेर आल्याप्रमाणें मुद्रा भकास झालेली, डोक्यावरील पागोट्याचे पदर सुटून अस्ताव्यस्त झालेले आणि न समजणाऱ्या कायद्याच्या

कैफानें डोळे तारवटलेले, अशा अवस्थेंत एखादा ' देहाती ' कोर्टाच्या फाटकांतून बाहेर पडला,कीं बाहेर बसलेला कुडवुडचा जोशी मांजराच्या सफाईनें त्याच्यावर झडप घालतो. वकिलानें आंत केलेल्या लूटमारींतून जें धन खिशांत शिल्लक उरलें असेल तें या जोशीबुवांना अर्पण करून तें अशील घराकडे प्रयाण करतें. जोशीबुवांचें तंत्र फार परिणामकारक असतें. देहाती समोर येऊन उभा राहतांच त्याच्या उजाड चेहऱ्याकडे पाहून ते रहस्यमय आवाजांत सांगतात, " तं सगळ्यांसाठीं –पण तुझ्यासाठीं कुणी नाहीं ! " पाटीलबुवा आपल्या वाढलेल्या दाढीवरून हात फिरवतात—कारण या अनिष्ट काळांत न्हाव्यानेंदेखील त्यांना दगा दिलेला असतो–आणि क्षणभर इकडेतिकडे पाहून मटकन खालीं बसतात. अशा रीतीनें या प्रकरणाचा प्रारंभ होऊन त्याचा शेवट वर म्हटल्याप्रमाणें, अशिलाच्या खिशांत वकिलानें शिल्लक ठेवलेले पैसे जोशाच्या खिशामध्यें जाण्यांत होतो. याप्रमाणें कोर्ट-कचेरीच्या दारापासून, राजेरजवाडयाच्या दरबारापर्यंत हा भविष्यकथनाचा धंदा ग्रहांच्या बळापेक्षां अकलेच्या बळावरतीच खरोखर चाललेला असतो !

असें असलें तरी प्रस्तुत हौशी ज्योतिषानें ज्या दोन गोष्टी मला सांगितल्या त्यांतील एक तरी मला निःसंशय मान्य आहे. तुम्हांला त्वरित निर्णय घेतां येत नाहीं ! तडकाफडकी निर्णय घेणें हें मला खरोखरीच मोठें दिव्य वाटतें. सध्याच नव्हे, तर पूर्वीपासून. शाळेंत असतां क्रिकेट खेळण्याचा मला फार षोक असे. सामन्यांत नाहीं तरी रोजच्या प्रॅक्टिसमध्यें दिसणारें फलंदाजीचें कौशल्य, क्रिकेटसाठीं वाटेल तेवढा वेळ घालवायची तयारी, मास्तरांची मर्जी, कप्तानाचें स्नेहजन्य औदार्य, वगैरे कारणांमुळें शाळेच्या प्रातिनिधिक संघापर्यंत मी अधूनमधून मजल मारीत असें. क्रिकेटचा सामना ही गोष्ट अशी आहे कीं जेथें तडकाफडकीं निर्णय घेणें ही गोष्ट केवळ अत्यावश्यक असते. ज्याला लवकर निर्णय घेतां येत नाहीं त्यानें बुद्धिबळाचा डाव खेळावा, क्रिकेटच्या वाटेला जाऊं नये. एका हातानें डोकें आणि दुसऱ्या हातानें उंट किंवा घोडें धरून दहा मिनिटें तुम्ही बुद्धिबळाच्या पटाकडे पहात बसलांत तरी विशेष बिघडत नाहीं. क्रिकेटमध्यें हें चालत नाहीं. गोलंदाजानें टाकलेल्या चेंडूकडे तुम्ही वामन मल्हा-रांच्या तत्त्वचिंतक दृष्टीनें पाहूं लागलांत तर दोघाचौघांचा आधार घेऊन

तुम्हांला तंबूंत परत यावें लागेल. त्वरित निर्णय घेण्याच्या माझ्या असमर्थतेनें सामन्यांत माझी आणि परिणामतः आमच्या संघाचीहि मोठी दाणादाण उडत असे. बॅटिंगच्या प्रसंगीं चेंडू नेमक्या कोणत्या दिशेनें व गतीनें येत आहे हें मला ठरवितां येत नसे; आणि केव्हां ठरवितां आलें तर, त्याला सीमेपार टोलवून सहा धावा मिळवाव्यात कीं चारांवर तूर्त संतोष मानावा, पुढें जाऊन दाबावा कीं मागें होऊन अंगावर घ्यावा, वगैरे पर्यायांची मनांतील व्यासपीठावर चर्चा होई आणि तिचा निर्णय लागेपर्यंत चेंडू यष्टिरक्षकाच्या हातांत जाऊन दाखल होई. याहूनहि अधिक दाणादाण होई ती क्षेत्ररक्षणांत. आमच्या कप्तानाला दोन ज्वलंत चिन्ता डोक्यावरती वाहाव्या लागत. एक सामना जिंकावयाचा कसा ही, आणि दुसरी क्षेत्ररक्षणाचे वेळीं माझें काय करायचें ही. मूर्तिमंत प्रश्नचिन्ह होऊन मी त्याच्यासमोर सूचना घेण्यासाठीं उभा राही. अॅरेबियन नाइटस्मधील जादुगाराप्रमाणें दृश्याला अदृश्य करण्याचें त्याच्यांत कसब असतें तर त्यानें मला निमिषार्धांत 'होत्याचा नव्हता' करून टाकलें असतें. परंतु या साधनेच्या अभावीं मला कुठें तरी ठेवणें त्याला भागच पडत असे. नको असलेली वस्तु अडगळींत टाकतात त्याप्रमाणें सहसा चेंडू येणार नाहीं अशा जागीं तो मला उभा करी. परंतु नशिबाची गति आणि फलंदाजांची कुशलता अशी कीं चेंडू बाकीच्या दहा लोकांना सोडून, माझ्याकडे भराभर उत्साहानें धावत येत ! कप्तानानें माझी जागा बदलली तरी पुन्हां त्याच प्रकाराची वारंवार आवृत्ति होत असे. इतकी कीं, शेवटीं चेंडू हा कोणीतरी जिवंत प्राणी आहे आणि पूर्वजन्मींचे कांहीं ऋणानुबंध आठवून तो मला वारंवार भेटूं पहात आहे, प्रेमानें मिठी मारूं पाहात आहे, असें मला वाटूं लागे ! त्यांतहि सरपटते चेंडू आले तर विशेष धास्ती नसे. दोनचार धावांची भर पडून बेरीज वाढेल एवढेंच. परंतु चेंडू, रामाच्या पुष्पक विमानाप्रमाणें आकाशांत उड्डाण करून माझ्याकडे झेप घेऊं लागला म्हणजे मला ब्रह्मांड आठवत असे. त्वरित निर्णयाच्या अभावामुळें, चेंडूची आणि माझी पांचदहा मिनिटें अशी जोरदार झटापट होई कीं प्रेक्षक राहो, पण सारे खेळाडूदेखील स्तिमित होऊन व खेळ विसरून त्या देखाव्याकडे पाहात बसत! एवढ्या धामधुमींत चेंडू बहुधा दहा-वीस फुटांवरती जाऊन जमिनीवर खदखदा हंसत पडलेला असायचा !

गोष्टी जितक्या मोठ्या आणि महत्त्वाच्या, तितकी निर्णय घेण्याची सुलभता वाढत जाते असें मला वाटतें. बारीकसारीक व कमी महत्त्वाच्या गोष्टींत निर्णय घेणें मला तरी अधिक जड जातें. आज हवा कशी आहे, म्हणून प्रश्न केला तर चांगली किंवा वाईट म्हणून मोकळे होणारे शीघ्रनिर्णयी पुरुष आपल्याला अनेक आढळतात. मला त्यांच्याबद्दल आदर वाटतो. परंतु त्यांच्या श्रेणींत जाऊन बसणें मात्र सहसा शक्य होत नाहीं. हवा कशी आहे, या प्रश्नाचें निर्णयात्मक उत्तर देतांना मला खिडकी उघडून चारपांच मिनिटें आकाशाकडे पाहाण्याची आवश्यकता वाटते. सकाळीं हवा कशी होती, दुपारीं कशी होती, जी होती तिला चांगलें म्हणायचें कीं वाईट वगैरे प्रश्न मनामध्यें उभे राहतात. यामुळें साध्या, क्षुल्लक प्रश्नाला गहन व विद्वत्तापूर्ण स्वरूप प्राप्त होतें ! हा सिनेमा कसा आहे, तें नाटक कसें आहे, अमुक गोष्ट कशी आहे, तमुक कादंबरी कशी आहे, वगैरे प्रश्नांचीं उत्तरेंहि द्यायला अशींच दुर्घट असतात. अगदींच रद्दी किंवा फारच चांगल्या वर्गांत या गोष्टींचा समावेश होत असल्यास वेगळें. परंतु असें सहसा होत नाहीं. तसें पाहिलें तर मानवी संसारांतील अर्ध्याहून अधिक गोष्टी—बरें, ठीक, चालेल, हरकत नाहीं, विशेष वाईट नाहीं, वगैरे सदरांत पडणाऱ्या असतात. आणि निर्णय मागणाऱ्या लोकांना बहुधा हीं उत्तरें म्हणजे खरीं उत्तरें नको असतात. असत्य हें भरजरी पोशाख करून मानववस्तींत मिरवतें सत्य मात्र वल्कलें नेसून वनवासांत फिरतें, अशा आशयाचें एक सुभाषित आहे; त्यांत थोडेंफार सत्य आहे यांत शंका नाहीं. स्वतःचा प्रत्यक्ष संबंध नसेल तेव्हां सत्य सहन करण्याचें औदार्य आपण अनेकदां दाखवूं शकतों. पण प्रत्यक्ष संबंध असेल तर मात्र सत्याला धूम ठोकण्यावाचून गत्यंतर उरत नाहीं. 'स्वयंपाक कसा झाला' असा प्रश्न गृहिणीनें केला तर 'तो उत्तम झाला' असें उत्तर कोण-त्याहि कर्तव्यपरायण व शांतताप्रिय पतीला देणें आवश्यकच आहे. तेथें विशेष वाईट नाहीं किंवा बरा आहे अशीं उत्तरें देऊन चालायचें नाहीं. एखाद्या गोष्टी-बद्दल वा पुस्तकाबद्दल लेखक जेव्हां स्वतःच 'हें कसें काय आहे' म्हणून प्रश्न विचारतो तेव्हां तर फार मर्मभेदक पेंचप्रसंग निर्माण होतो ! स्वयंपाकांत स्त्रीचे केवळ हात गुंतलेले असतात. पण लेखनांत लेखकाचें सारें हृदयच गुंतलेलें असतें. आरामखुर्चीत किंवा इतरत्र कोठें बसून मजेनें एखादी कथा वा कविता

वाचतांना तिच्या प्रत्येक वाक्यामागें केवढा अग्नि धगधगत असतो याची वाचकास कल्पना येत नाहीं. त्यांत जागतिक कीर्ति मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षा असतात, प्रणयिनीला दिलेले छुपे संदेश असतात ( ती आपलें लिखाण वाचते अशा कल्पनेनें ! ) , प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध केलेली चढाई अगर वैऱ्यांवर उगवलेला सूड असतो, आईबापांवर केलेली कठोर टीका असते ( ते लिखाण वाचणार नाहींत अशा भरवशानें )—एक ना हजार गोष्टी असतात ! म्हणून लेखक, विशेषत: नवीन लेखक जेव्हां आपलें कांहीं साहित्य तुमच्या हातांत ठेवतो तेव्हां त्या कागदाच्या रूपानें आपल्या जीवनाचा एक तुकडा काढूनच तो तुमच्याजवळ देत असतो. या जीवनाच्या किंवा अंत:करणाच्या तुकड्याला तो केवळ अक्षरांच्या रूपानें आणि शाईच्या आधारें प्रकट झाला आहे म्हणून श्रेष्ठ कलेचे धारवाडी काटे लावीत बसणें खरोखर चूक असतें. अशा प्रसंगीं सत्य बाजूला ठेवणें सोयीचें असतें, आणि सत्य टाळून निर्णय द्यावयाचा असल्यानें तो तातडीनें देणें कांहींसें ग़ैरसोयीचें असतें ! परंतु पाटीखाली चोरून दडपून ठेवलेला कोंबडा पंख फडफडवीत अचानक पाटीसकट उडायला लागावा त्याप्रमाणें कित्येकदां सत्य क़ांहीं विचित्र मार्गानें बाहेर पडतें. असा एक विचित्र, अवघड प्रसंग मला नेहमीं आठवतो. एका दैनिकांत मी काम करीत होतो आणि त्या दैनिकाच्या चतुरस्र संपादकांना, लेख पाठविणाऱ्या आपल्या परिचितांना किंवा लेखकांना टोलवावें कसें याचें तंत्र चांगलें अवगत होतें. जवळपासच्या गांवीं राहणाऱ्या एका गोरक्षकानें एकदां गोरक्षणावरील एक लांबलचक लेख संपादकाकडे पाठविला. संपादकांनीं लेखाच्या मथळ्यावर आणि विस्तारावर एकदां नजर टाकली आणि नंतर तो सरळ टेबलाजवळच खालीं ठेवलेल्या रद्दीच्या टोपलींत टाकला. कर्मधर्मसंयोग असा कीं सदर लेखाचे लेखक हे दुपारीं दत्त म्हणून कचेरींत हजर झाले. पोस्टानें सकाळीं लेख आला आणि मोटारनें दुपारीं लेखक आले. हे गृहस्थ संपादकांच्या परिचयांतील होते व दोघेहि बाह्यत: तरी परस्परांबद्दल आदरभाव बाळगीत होते. संपादक थोडेसे बिचकलेच; परंतु बाह्यात्कारीं तसें कांहीं न दाखवितां त्यांनीं त्या गृहस्थाचें आगत-स्वागत करून त्याच्या कार्याची प्रशंसाहि केली.

"माझा लेख आज मिळाला असेलच !" शेवटीं पाहुण्यानें मुद्द्याला हात घातला.

" होय. मिळाला कीं ! –छान आहे ! " संपादक उत्तरले.

" केव्हां छापतां आहांत ?

" पुढच्या आठवड्यांत देतों. का हो–" संपादक नेहमींच्या पद्धतीनुसार माझ्याकडे वळून म्हणाले, " या आठवड्यांत नाहीं जायचा ना ? "

" नाहीं ! " मीं उत्तर दिलें.

" चालेल ! " लेखक महाशय म्हणाले. आणि नंतर त्यांनीं अकस्मात् एक बाँबगोळा टाकला. ते खिशांतून पेन काढून म्हणाले, " जरा हस्तलिखित द्या पाहूं. दोन तीन सुधारणा करायच्या आहेत ! लेख छापायचा म्हणजे निर्दोष असायला हवा ! "

" हो तर ! " संपादक प्रसंगावधान ठेवून उद्‌गारले व नंतर मला उद्देशून म्हणाले, " कुठें आहे हो यांचा लेख ? "

लेख कुठें आहे याची मला जाणीव होती. परंतु संपादकांना कोणतें उत्तर हवें होतें याचीहि मला कल्पना आली. पेंचप्रसंगांतून त्यांची सोडवणूक करणें जरूर होतें.

मी म्हणालों, " सकाळीं ते अमुक कामावरती होते त्यांनीं ठेवला कुठें तरी ! "

एवढ्यावर हें प्रकरण आटोपलें असतें. परंतु नशिबानें त्या दिवशीं पुरता पाठलाग करायचा ठरविलें असल्यामुळें ते ' अमुक ' गृहस्थहि नेमके त्याचवेळीं दारांतून आंत प्रविष्ट झाले. त्यांना या प्रकरणाची पार्श्वभूमि कांहींच माहिती नव्हती. संपादकांसमोर बसलेले गृहस्थ त्या लेखाचे जनक आहेत, हेंहि त्यांना ठाऊक नव्हतें. संपादकांनीं त्यांना नाइलाजानें तो प्रश्न विचारला. " का हो, तो गोरक्षणावरचा लेख कुठें आहे ? "

सहसंपादक खुंटीला कोट लावीत उद्‌गारले, "तो सकाळीं तुम्ही रद्दीच्या टोपलींत टाकला कीं ! –"

" छे हो ! तुम्ही ठेवला असेल–"

" छे छे, तुम्ही त्या टोपलींत टाकलेला मीं पाहिला डोळ्यांनीं. तो पहा–वरतीच आहे ! –"

गोरक्षक पडशी घेऊन ताडकन् उठून उभा राहिला व म्हणाला, " द्या तो! "

संपादकांनीं बिनशर्त माघार घेतली. त्यांनीं टोपलींतून लेख काढला व कांहीं आणखी कपोलकल्पित सांगन तो गोरक्षकाच्या हातीं दिला. गोरक्षक लेख घेऊन तडक बाहेर पडले ! सर्कशींतल्या विदूषकाप्रमाणें सत्य अनेकदा असें अनपेक्षित जागेंतून बाहेर पडतें. !

परंतु मला सत्यासत्याच्या गहन प्रश्नांची मीमांसा करावयाची नाहीं. तडकाफडकी निर्णय घेणें ही गोष्ट सोपी नव्हे हेंच मला सांगावयाचें आहे. तळहातावरील कोणता तरी उंचवटा कमीजास्त असल्यानें माझी निर्णयशक्ति क्षीण आहे, असें समाधान मला मिळवितां येईल. परंतु मुद्दाम आडबाजूला जाऊन समाधान शोधावें इतकें दुःख या बाबतींत मला कधींच वाटलें नाहीं, सध्यांहि वाटत नाहीं. शीघ्रनिर्णयी लोकांबद्दल मला कौतुक वाटतें, परंतु हेवा मात्र मुळींच वाटत नाहीं. त्यांच्या हातावरील ग्रहांचे उंचवटे कितीहि जोरदार असले तरी त्यांचे निर्णय नेहमीं बिनचूक असतात असें मानायचें कारण नाहीं. त्वरित निर्णय घेऊन ते अनेकदां त्वरित पश्चात्तापांत पडतात. लवकर निर्णय न घेणें आणि लवकर निर्णय घेऊन तो वारंवार बदलणें यांत तत्त्वतः कांहीं फरक पडत नाहीं ! शीघ्र निर्णय घेण्याची प्रवृत्ति, अपेक्षा व 'समर्थता' कित्येक प्रसंगीं तर केवळ हास्यास्पद वाटते. आपल्या समाजांत रूढ असलेली वधू-परीक्षेची पद्धत ही याचा उत्कृष्ट नमुना होय. एखादी निर्जीव बाजाची पेटी घ्यावयाची असली तरी मनुष्य दहांदां त्या दुकानावरून फेऱ्या मारील, पंचवीसदां ती वाजवून पाहील, पन्नास वेळां घ्यावी न घ्यावी याचा विचार करील. परंतु स्वतःच्या संसाराची स्वामिनी आणतांना इतकाहि विचार करणें या शीघ्र-निर्णयी लोकांना आवश्यक वाटत नाहीं. वधू खालीं मान घालून बसते, वर आढ्याकडे नजर लावून बसतो; तो कांहींतरी चाचरत विचारतो, ती कांहीं तरी चाचरत उत्तर देते; नंतर धीर धरून तो घसा साफ करतो आणि एखादा प्रश्न स्पष्टपणें विचारतो, तीहि खाकरून किंवा खोकून तितक्याच स्पष्टपणें उत्तर देते आणि नंतर दोघेंहि मौनाच्या डोहामध्यें उडी मारतात. अशा या दहावीस मिनिटांच्या उद्योगानंतर उभयतांनीं आपले 'निर्णय' जाहीर करायचे असतात ! शीघ्र निर्णयास व्यवहारांत जें अवास्तव महत्त्व प्राप्त झालें आहे त्यांतून या पद्धति निर्माण होतात !

अर्थात् कांहीं ठिकाणीं शीघ्र निर्णय हास्यास्पद असला तरी कित्येक ठिकाणीं तो अपरिहार्य असतो हेंहि मला मान्य आहे. शौर्य या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या गुणांत, माणसें मारण्याच्या सामर्थ्यापेक्षां त्वरित निर्णय घेण्याच्या सामर्थ्याचाच अधिक प्रभाव असतो. नेपोलियनचा सारा पराक्रम व पुरुषार्थ या एका सामर्थ्यावर आधारलेला होता असा जाणत्यांचा अभिप्राय आहे. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत पुढील डावपेचांचे निर्णय तो अत्यंत त्वरेनें घेत असे. हात पाठीशीं घेऊन दोनचार फेऱ्या मारल्या कीं मोठमोठ्या मनसुब्यांचे निकाल त्याच्या विचारयंत्रांतून पटापट बाहेर पडत. परंतु सगळींच माणसें नेपोलियन नसतात. आणि जीवन म्हणजे संग्राम हें सुभाषित कितीहि खरें असलें तरी नेपोलियनचा संग्राम आणि आपला संग्राम यांत महदंतर असतें !

आमच्या हौशी ज्योतिष्यानें जी दुसरी गोष्ट सांगितली--तुम्ही सज्जन आहांत ही-तिच्या विषयीं मात्र मी नेहमींच साशंक असतों. किंबहुना, पहिलीची सत्यताच या दुसरीच्या मार्गांत आडवी येत आहे असें मला वाटतें. मी सज्जन आहें कीं दुर्जन आहें याचा निर्णय मला कधींच घेतां येत नाहीं. सकाळीं आठ वाजतां मी सज्जन असेन, तर दुपारीं दोन वाजतां पट्टीच्या खलनायकांत माझी गणना करतां येईल. बहुतेकांची अवस्था अशीच असते अशी माझी कल्पना आहे. ज्यांचें अंतःकरण संपूर्णतः साधुत्वांत बुचकळून काढलें आहे किंवा दुष्टपणाच्या काजळांत अहोरात्र भिजत ठेवलें आहे अशीं माणसें फार थोडीं असतात. शंभरांतील नव्वद माणसें तरी सुजनता आणि दुर्जनता या दोन्हींतील सरहद्दीवरतीच संचार करीत असतात. पुष्कळदां यांत परिस्थितीचा वांटा असतो तो वेगळाच. माणसापेक्षां अनेकदां त्याची परिस्थितीच सुजन किंवा दुर्जन असते.

अर्थात् हौशी ज्योतिष्यानें माझ्या सौजन्याचें रहस्यशोधन केलें तेव्हां हस्तरेषांच्या ज्ञानापेक्षां त्याचें मानवी स्वभावाचें ज्ञानच अधिक कार्य करीत होतें यांत मला मुळीच शंका नाहीं. ज्युलियस सीझरसारखा स्तुतीच्या कक्षेपलीकडे असलेला असामान्य माणूस-- " तुम्हांला स्तुति आवडत नाहीं " या स्तुतीला अखेरीं मोहित झाला ! तुमच्या माझ्यासारख्या सामान्य माणसांना सौजन्याचा निर्वाळा पुरेसा होतो. माझें सौजन्य सुरवातीलाच जाहीर झाल्यामुळें पुढें पंधरा मिनिटें ज्योतिष्याची चर्पटपंजरी मला निमूटपणें ऐकणें भागच पडलें !

• • •

# कर्जाच्या कमळांत....

> ' प्रभाकर कवि भ्रमर गुंतला
> पहा कर्जाच्या कमळांत '
>
> —प्रभाकर.

कर्जाला कमळाची उपमा देणाऱ्या आणि स्वतःला त्या कमलांत अडकलेला भ्रमर म्हणणाऱ्या प्रभाकराबद्दल मला, या एकाच कारणाबद्दल अत्यंत आदर वाटतो. अप्रिय गोष्टीला प्रिय गोष्टीची उपमा देऊन प्रभाकरानें या ठिकाणीं अनौचित्य दाखविलें आहे असें कांहीं टीकाकारांचें मत आहे. त्यांच्या मतें कर्ज हें कर्दमासारखें असतें, कमलासारखें नव्हे ! मी इतकेंच म्हणेन कीं, या टीकाकारांना कर्ज किंवा कर्जबाजारीपणा याविषयीं फारशी माहिती किंवा अनुभव नसावा. कर्जबाजारीपणाच्या तृतीय अवस्थेंतील गूढ आनंदाशीं, सविकल्प समाधीशीं किंवा कलात्मक तादात्म्याशीं त्यांची तोंडओळखहि झाली नसावी !

वस्तुस्थिति अशी आहे कीं, कर्ज थोडें आणि आटोक्यांतील असलें तर त्याला कर्दमाची उपमा साजून दिसते. परन्तु समुद्राप्रमाणें तें चारी दिशांनीं उसळूं लागलें, त्यांच्या सरहद्दी पुसून गेल्या, म्हणजे त्याला कमलाचीच उपमा द्यावी लागेल. आटोक्यांतलें कर्ज आणि आटोक्याबाहेरचें कर्ज यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. माफक कर्ज असलेला मनुष्य दुःखी असतो. चिखलांत रुतलेल्या गाईचे दुःख ती केवळ चिखलांत रुतली आहे म्हणून नसतें तर त्यांतून बाहेर पडण्यासाठीं तिला जी धडपड करावी लागते तीच तिच्या जिवाचा अधिक छळ करते. याशिवाय तिच्या दुःखाला आणखीहि एक कारण असतें.

कर्दमापलिकडचें हिरवेंगार जग तिच्या दृष्टीला दिसत असल्यामुळें त्यांत पुन्हां संचार करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें ती व्यथित झालेली असते. थोडच्या कर्जाला कर्दमाची उपमा शोभते ती याच दृष्टीनें. त्यांत अडकलेला मनुष्य बाहेर पडण्यासाठीं धडपड करीत असतो आणि ती यशस्वी होणेंहि अशक्य नसतें. तो दुःखी असतो तो या धडपडीमुळें आणि बाहेर जाण्याच्या आशेमुळें. कर्ज अफाट आणि चौफेर असलें म्हणजे बाहेर पडण्याची सर्व धडपड आणि शक्यता नाहींशी होतें, पलिकडचें जग दिसेनासें होतें, भावना बधिर होतात, एक अपूर्व तादात्म्य उत्पन्न होतें, एक अद्‌भुत आनंद उदय पावतो. थोडक्यांत कमलांत अडकलेल्या भ्रमरासारखी त्याची अवस्था होते !

प्रभाकरानें सांगितलेल्या या कर्जाच्या कमलावस्थेची मी यथार्थ कल्पना करूं शकतों. अनेक वर्षे ओस पडलेल्या घरांत सर्वत्र कोळिष्टकें लागावींत त्याप्रमाणें जीवनांत चहूंकडे कर्जाची जाळीं लटकलेलीं आहेत, रस्त्यांत बाहेर पडल्यावर पावलोंपावलीं सावकाराची भेट होत आहे, एक कर्ज भागवण्यासाठीं दुसरें कर्ज काढलें जात आहे, दुसऱ्याचा तगादा सुरू झाल्यावर त्यांतूनच तिसरें निर्माण होत आहे, झाडांतून बीज आणि बीजांतून झाड या प्रमाणें ही क्रिया अखंड चालू आहें, कर्जदार किंवा त्यांचे दूत शिव्याशापांचा अभिषेक करीत आहेत, दिवाणी कोर्टांत वारंवार फेरफटके होत आहेत, जप्ती आणणाऱ्या बेलिफाशीं जिगरदोस्ती होऊन बसली आहे, आणि या एकंदर अवस्थेंतून मुक्त होण्याचा एकहि मार्ग शिल्लक राहिलेला नाहीं ! या तृतीय अवस्थेंत कर्जजन्य दुःख अस्तंगत होऊन मनुष्य निर्विकारपणें एखाद्या तजविरीप्रमाणें आपल्या जीवनाकडे पाहात असतो आणि त्यांतील अगतिकता आणि भानगडींची परमावधि ध्यानांत येऊन त्याच्या विनोदबुद्धीचें अनुरंजन होतें. या अवस्थेंतून सुटका नाहीं हें समजल्यानें तिच्यांतील नवखें दुःख नाहींसें होतें आणि शेवटीं निर्जन बेटावरहि सौख्य, समाधान मिळवणाऱ्या रॉबिन्सन क्रूसोप्रमाणें त्या अवस्थेंतहि त्याला एक गूढ, विचित्र आनंद प्राप्त होतो. दैनंदिन आयुष्यक्रमाला गनिमी लढाईचें मनोरंजक स्वरूप येतें आणि त्या लढाईच्या, बंडखोरीच्या हर्षांत लढाई कशासाठीं चालू आहे याचें विस्मरण होतें. अती झालें आणि हंसूं आलें ही म्हण कोठें सार्थतेनें लावतां येत असेल तर ती कर्जाच्या प्रकरणांतच. तृतीया-

वस्थेंतील कर्जबाजारी रडत नाहीं, तो हंसतो. रडण्याचें कार्य तो आपल्या सावकारांवर सोंपवितो.

आणि खरोखर, कर्ज घेणाऱ्यापेक्षां देणाऱ्याचेंच दुःख अधिक असतें— निदान असायला पाहिजे. कर्ज घेणाऱ्याच्या दृष्टीनें पैसा हा केवळ उपयोगासाठीं असतो. कांहीं आवश्यक गोष्टी विकत घेण्याचें साधन यापलीकडे त्याला पैशांचें महत्त्व वाटत नसतें. बँकेंतील रकमेवर अधिक शून्यें चढविण्यासाठीं किंवा जमिनींत प्रेमानें पुरून ठेवण्यासाठीं कोणीं कर्ज काढीत नाहीं. शोधा-प्रमाणें कर्जाची जननीहि आवश्यकता हीच असते. अनावश्यक कर्ज ही गोष्ट अबोल स्त्रीप्रमाणें प्रायः अशक्य आहे. कर्ज देणाऱ्याची अवस्था याहून वेगळी असतें. धनावरील त्याचें प्रेम शेलेच्या प्लेटॉनिक प्रेमाप्रमाणें निराकार आणि निरपेक्ष असतें. तो पैशावर पैसा म्हणून प्रेम करतों, साधन म्हणून नव्हे. सावकार हा आर्थिक सृष्टींतला महाकवि असतो. पैसा बुडाल्यामुळें त्याला होणारें दुःख भावनात्मक आणि म्हणूनच खरें व तीव्र असतें. घेणाऱ्याचें किंवा बुडविणाराचें दुःख मात्र केवळ काल्पनिक आणि संस्कारजन्य असतें. कर्जबाजारीपणा आणि कर्जदार यांची पुरातन काळापासून ( बहुधा सावकारांच्या प्रेरणेनें ) इतकी प्रखर निंदा करण्यांत आली आहे कीं त्या स्थितींत प्रत्यक्षतः दुःख नसतांहि, मनावरील संस्कारामुळें आपण तें मानतो, उत्पन्न करतों ! तृतीयावस्थेंतील कर्जबाजारी माणसाला आर्थिक सृष्टींतील या अंतिम सत्याची ओळख पटते आणि म्हणूनच तो सुखी होतो !

कर्जबाजारांच्या जगांतील मोगल बादशहांची ही गोष्ट झाली. पण तुमच्या आमच्यासारखे या राज्यांतील जे छोटे अमीर—उमराव असतात त्यांच्या यातनांना मात्र सीमा नसते. उदाहरणार्थ कर्जाची मागणी. दहा हजारांचें कर्ज मनुष्य छाती ताठ ठेवून मागूं शकतो; परंतु दहा रुपयांचें कर्ज काढतांना मात्र त्याचे प्राण कंठांत गोळा होतात. छोटें कर्ज काढण्याचा — मागण्याचा प्रसंग मोठा मजेदार असतो.

तुम्ही एखाद्या मित्राकडे जातां. तुमचे पाय चालत असले तरी हृदय थांबण्याच्या तयारींत असतें. तोंडावर शक्य तेवढा स्वाभाविकपणा आणि खेळकरपणा ठेवण्याचा प्राणांतिक प्रयत्न तुम्ही करीत असतां. परंतु तो अय-

शस्वी होऊन आपल्या मुद्रेवरती ‘ कर्ज पाहिजे ’ असे जाहिरातफलक लागले आहेत कीं काय अशी शंका तुम्हाला सारखी छळीत असते. ‘ यांत काय विशेष आहे ? ’ असा रास्त प्रश्न तुम्ही स्वत:ला विचारीत असतां. पण मन माणसाचें वैरी असतें. बुद्धिबळांतल्या उंटासारखें तें सदैव वांकडें जात असतें. कवीप्रमाणें साध्याहि विषयांतला मोठा आशय तें शोधीत बसतें. मनाचा हा छळ सहन करीत आणि अंकगणितांतील सुप्रसिद्ध पालीप्रमाणें मागें पुढें जात येत तुम्ही त्या मित्रासमोर जाऊन दाखल होता.

मित्राला पाहिल्याबरोबर तुमचा चेहरा पडतो. निदान पडल्यासारखा तुम्हाला वाटतो. तुम्ही बसतां आणि हवापाण्याच्या गोष्टींनीं सुरवात करतां. ज्यासाठीं आलांत त्याची मागणी करणारे शब्द घशामध्यें रुतून बसल्यानें इतर शब्दांची रहदारी मोठ्या कष्टानेंच होतें. संभाषण मधूनच थांबतें. त्याचा फायदा घेऊन तुम्ही मागणीसाठीं तोंड उघडतां आणि लगेच बंद करतां किंवा उघडलेल्या तोंडांतून कांहीं भलतेच शब्द बाहेर काढतां ! शेवटीं संभाषण पुढें चालविणें अशक्य झाल्यावर आणि आतां बैठक आटोपली पाहिजे असें दिसूं लागल्यावर तुम्ही बोलायचें ठरवितां ! ’ अलिकडे हवा फारच वाईट आहे ’ अशा विधानाच्या आविर्भावांत आणि आवाजांत तुम्ही गळ्यांत रूतून बसलेलें तें वाक्य उपसून बाहेर काढतां, ‘ मला पन्नास रुपयांचें कर्ज हवें आहे ! ’

छाती पळभरांत मोकळी होते आणि आतां पुढें काय होईल तें होवो, आपण बोलायचें तें बोलून टाकलें असें गाढ समाधान मनाला लाभतें. पण दुर्दैव तुमच्यामागें हात धुऊन लागलेलें असतें. तुमचे शब्द तुम्हीं उच्चारीत असतां, मित्राचें लक्ष कोठें तरी तजबिरीकडे किंवा वृत्तपत्राकडे लागलेलें असतें. तुमच्या हृदयाच्या चिंध्या करणारे ते शब्द तो तुम्हांला ऐकवतो, ‘ काय ? काय म्हणालांत ? ’

आणि मग पुन्हां—

● ● ●

# शेजारी....

पहिल्या अश्मयुगापूर्वी कॉकेशस पर्वताच्या आसपास जो प्रख्यात आणि प्रचंड हिमपात झाला त्यावेळीं 'शेजारी' ही संस्था अस्तित्वांत आली असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या वेळेपर्यंत आपापल्या गुहेमध्यें अथवा झाडावर एकट्यानें राहणारा आदिमानव यापुढें समुदायानें राहूं लागला. आकाशांतून बर्फाचा अविरत वर्षाव होऊं लागल्यामुळें आमचा पूर्वज जेव्हां रानोमाळ पळूं लागला तेव्हां आपल्याबरोबर आपल्याचसारखा आकार असलेले इतर अनेक प्राणी पळत आहेत असें त्याला आढळून आलें. पळणारा एकटाच असला तर तो लौकर दमतो, कच खातो. परंतु अनेकजण जेव्हां एकदम पळूं लागतात तेव्हां प्रत्येकाच्या पायांत सामुदायिक गतीचा आणि शक्तीचा कांहीं अंश प्रविष्ट होतो आणि त्यामुळें एकंदर पळण्याच्या कार्यांत आवेश उत्पन्न होतो. शर्यतीच्या मैदानावरील अनेक घोडे बेहोष वेगानें पळत असतात आणि पुण्याच्या टांग्याचा एक घोडा पळण्याचा देखावा करून वस्तुत: चालत असतो याचें कारण अंशत: या सामुदायिक सामर्थ्यांत अथवा सामुदायिक सामर्थ्याच्या अभावांत सांपडेल असें माझें मत आहे. तेव्हां सामुदायिक रीत्या पळणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या झुंडी, पळण्याचें कारण नाहींसें झाल्यावर जेव्हां उभ्या राहिल्या आणि एका ईश्वरी प्रकोपांतून शीरसलामत सुटल्या-बद्दल त्यांनीं परस्परांकडे हांसून पाहिलें तेव्हांच शेजारधर्माचा पहिला साक्षात्कार मानवाला झाला असा माझा दावा आहे. आतां, आमच्या या पळणाऱ्या पूर्वजांनीं आपली गति थांबल्यावर परस्परांकडे पाहिलेंच नाहीं, किंवा पाहिलें असलें तरी ते हांसले नाहींत, असें एखाद्या संशोधकानें प्राचीन दगडांच्या

अथवा सापळ्यांच्या अवशेषांवरून सिद्ध केलें तर गोष्ट निराळी. तोंपर्यंत हें मत ग्राह्य मानावयास प्रत्यवाय नाहीं.

'शेजारी' ही संस्था अशा रीतीनें समाजाच्या संस्कृतिपूर्व अवस्थेमध्येंच अस्तित्वांत आली असल्यानें कांहीं संस्कृतिपूर्व गुणदोषांचे अवशेष तीमध्यें आजहि आपल्याला आढळून येतात. उदाहरणार्थ, आपण आपल्या घरांत बसून काय काय उद्योग करतो, आपल्याकडे कोणाची येजा होत असते, आपल्या घरांत कोणकोणत्या तऱ्हेचे आवाज निर्माण होत असतात, याकडे शेजाऱ्याचें कसोशीनें लक्ष असतें तें त्या पाषाणयुगांतील संवयीमुळेंच. त्या युगांत घर ही चीज अभावानेंच उभी असल्यामुळें साहजिकच शेजाऱ्याची नजर आपल्या शेजाऱ्यावर केंद्रित होऊन राही. शिवाय आजच्या काळाप्रमाणें तेव्हां मानवाला फारसे उद्योग नसत, करमणुकीचीं साधनेंहि त्या मानानें अत्यंत कमी असत, याहि गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. एखादा हरिण किंवा ससा मारून तो भक्षण केल्यावर, झाडाच्या ढोलीमध्यें जांभया देत बसलेला आमचा एक पूर्वज शेजारच्या झाडावर बसलेल्या आमच्या दुसऱ्या पूर्वजानें आज काय मारलें आहे, जें मारलें आहे त्याची लांबीरुंदी काय आहे, त्यानें एखादें नवें वल्कल पैदा केलें आहे काय आणि असल्यास कोणासाठीं, हें 'कोण' आज त्याच्या झाडावर किंवा गुहेंत आलें आहे काय आणि आलें असल्यास तें कसें आहे आणि काय करीत आहे, वगैरे विविध प्रश्नांचीं उत्तरें शोधीत बसे. आज तें पाषाणयुग जाऊन यंत्रयुग आलें. झाडें आणि गुहा यांच्या जागीं इमारती उभ्या राहिल्या, वल्कलांच्या ऐवजीं तलम रेशमाचीं पातळें पैदा होऊं लागलीं, झाडाच्या ढोलीमध्यें बसणारा माणूस आरामखुर्चीमध्यें बसूं लागला. परंतु शेजाऱ्यावर नजर ठेवण्याची ती संस्कृतिपूर्व संवय मात्र आजतागायत टिकून राहिली आहे. आजहि या साऱ्या गोष्टी तो करीत असतो. भिंतीला कान असतात ही म्हण प्रचारांत आली ती शेजाऱ्याचे हे गुण लक्षांत घेऊनच. भिंतीला कान असतात ते शेजाऱ्यांचेच हें उघड आहे.

पैशाला पैसा मिळविला म्हणजे रुपया तयार होतो त्याप्रमाणें शेजाऱ्याला शेजारी मिळाला म्हणजे समाज तयार होतो. शेजारी हा समाजाचा प्राथमिक घटक आहे हें यावरून लक्षांत येण्यासारखें आहे. समाजाची सारी इमारत

अशा रीतीनें आपल्या शेजाऱ्यावर आधारलेली असते. शेजाऱ्याशिवाय समाज ही संस्था अस्तित्वांत असणें शक्य नाहीं. याचा ओघानेंच असा अर्थ होतो कीं , ज्याला समाज हवा असेल त्यानें शेजारी सहन केला पाहिजे ! एका संपादक मित्राच्या टेबलावर नुकतीच एक कथा मीं पाहिली. त्या कथेंत एका नवविवाहित सौभाग्यवतीनें आपल्या राजा राणीच्या संसारांत शेजारचे बाल–पांडव कसे कुरुक्षेत्र निर्माण करतात याची हृदयद्रावक माहिती जाहीर केली होती. त्या बाईची कल्पना–संपादक आपली गोष्ट छापतील, गोष्ट छापलेला अंक आपल्याकडे रवाना करतील ( बिचारी ! ), तो अंक बाल-पांडवांची माता शेजारधर्मानुसार 'आत्तां आणतें' म्हणून उचलून नेईल, आपली गोष्ट आश्चर्यचकित होऊन वाचूं लागेल आणि तो आपल्यावर आणि आपल्या अपत्यावरच लिहिला आहे हें आढळून आल्यावर 'चला रे मेल्यांनो' म्हणत ती आपल्या सर्व अपत्यांना इतस्ततः पसरलेल्या कागदाच्या चिंध्याप्रमाणें गोळा करील आणि धपाधप पाय टाकीत जी आपल्या घरांतून बाहेर जाईल ती कायमचीच ! या बाईचें दुःख मी समजूं शकतों. अशी गोष्ट लिहिण्याचे विचार माझ्याहि मनांत अनेकदां येऊन गेले हेंहि प्रामाणिकपणें सांगावयास हरकत नाहीं. शेजारी या संस्थेंतील पोरांचें प्रकरण सर्वांत भयंकर असतें. कोणीतरी औपचारिक रीत्या दिलेला अष्टपुत्रांचा आशीर्वाद वेड्याप्रमाणें खरा करून दाखवणारा शेजारी हा सर्वांत भयावह शेजारी असतो ही गोष्ट निर्विवाद आहे. 'शेजार नको पण पोरं आवर' असें आपल्याला करून सोडणारा शेजारी तो हाच ! शेजाऱ्यांच्या मुलांचें एक लक्षांत घेण्यासारखें वैशिष्टय असतें कीं, तीं स्वतःच्या घरापेक्षां शेजारच्या घरांतच आपलें जीवन अधिक उल्हासानें कंठीत असतात. चाळीसारख्या ठिकाणीं **अ**चीं मुलं **ब**च्या घरांत आणि **ब**चीं मुलं **क**च्या घरांत असे प्रकार नेहमीं आढळून येतात. आणि याच बाल–शेजाऱ्यांच्या बाबतींत मानवाची दुसरी एक संस्कृतिपूर्ण संवय आपल्याला आढळून येते. नव्यानें हातीं आलेली कुऱ्हाड वॉशिंग्टनसाहेब ज्याप्रमाणें पुढें दिसणाऱ्या प्रत्येक वस्तूवर चालवूं लागले त्याप्रमाणें आपल्या बुद्धीचा प्रथमच साक्षात्कार झालेला आमचा प्राचीन पूर्वज प्रत्येक चराचर गोष्टींकडे कुतूहलानें आणि कौतुकानें पाहूं लागला,

या झाडाखालीं काय पडलें आहे, त्या खड्ड्यामध्यें काय दडलें आहे, त्या टेकडीवर कोण चढतें आहे, या दरीमध्यें कोण उरतें आहे, काळविटाला शिंगें किती आहेत, माकडाला दांत किती आहेत, कावळ्याचं पोस काळं कां आणि आभाळ मात्र निळं कां, वगैरे अनेक कूटप्रश्न त्याच्या नवख्या बुद्धीला भंडावून सोडीत असत. त्यांचीं उत्तरं शोधण्याचा तो प्रत्येक क्षणाला प्राणांतिक प्रयत्न करीत असे. या पूर्वजांच्या पावलावर पाऊल टाकूनच आपला बालशेजारी आपल्या घरांत प्रवेश करतो. तिन्ही लोक पदक्षेपानें व्यापून टाकणाऱ्या बटुवामना-प्रमाणें तो आपलें सारें घर पादाक्रांत करतो. त्याचें अखेरचें पाऊल बळीप्रमाणें आपल्या मस्तकावर पडतें तें वेगळेंच ! तात्पर्य, नवविवाहित सौभाग्यवतीनें केलेली तक्रार मला एकदम मान्य आहे. परंतु मी अगोदर सांगितल्याप्रमाणें ज्याला समाज हवा असेल त्यानें शेजारी सहन केला पाहिजे. शिवाय, आपल्याला कोणीतरी शेजारी असतो त्याप्रमाणें आपणहि कोणाचे तरी शेजारी असतो ही गोष्ट विसरतां कामा नये. या नवविवाहित सौभाग्यवतीसंबंधीं असलीच तक्रार करणारी गोष्ट दहा वर्षांनीं एखाद्या संपादकाकडे येणारच नाहीं असें सांगतां येईल काय ?

यावर कोणी कदाचित ( बहुधा शेजारीच ) संतापून विचारील कीं, शेजारधर्म म्हणून कांहीं गोष्ट आहे कीं नाहीं ? उगाच शेजाऱ्याला शिव्या कां देतां ? त्याला मी इतकेंच उत्तर देईन कीं, मी शेजाऱ्याला शिव्या देतों यावरूनच मी शेजारधर्माचा कट्टा पुरस्कर्ता आहे ही गोष्ट आपोआपच सिद्ध होते. शेजारधर्माचीं अवहेलना करण्याचा माझा मुळींच उद्देश नाहीं. या धर्माचें आंतरिक महात्म्य मला मंजूर असल्यामुळें मी त्याची अवहेलना करणें शक्य नाहीं.

शेजारधर्म हा जगांतील इतर कोणत्याहि धर्मापेक्षां अधिक व्यापक, अधिक चिरंतन आहे. आज हिंदु असलेला मनुष्य उद्यां मुसलमान होईल आणि शुद्धीकरणाच्या चळवळींत सांपडून परवां परत हिंदु होईल. परंतु जगाच्या पाठीवर तुम्ही कोठेंहि गेलांत आणि कितीहि धर्म बदललेत तरी शेजारधर्म मात्र तुम्हाला सुटणार नाहीं ! शेजारी हा परमेश्वराप्रमाणें किंवा हवेप्रमाणें सर्वव्यापी आहे. हिमालयाच्या एका उत्तुंग शिखरावर एकदां दोन संन्याशांची

गांठ पडली. हवापाण्याची प्राथमिक चर्चा झाल्यावर एकानें विचारलें, महाराज आपण संन्यास कां घेतलांत ? महाराजांनीं तासभर प्रवचन दिलें आणि निसर्गाच्या सान्निध्यांत परमेश्वरप्राप्ति सुलभ असते म्हणून आपण हिमालयांत आलों असें तात्पर्य सांगितलें. नंतर त्यांनीं आपल्या पृच्छकाला तोच प्रश्न केला, आपण हिमालयांत कां आलांत ? ‘शेजार चुकविण्यासाठीं !’ महाराज उत्तरले. आणि नंतरच्या काळांत ते दोन संन्याशी जवळजवळ असलेल्या गुहांमध्यें ‘शेजारी’ म्हणून राहूं लागले. शेजाऱ्याला परमेश्वरप्राप्ति कधीं व कशी होते इकडे दोघांचेंहि पुढें लक्ष लागूं लागलें आणि त्यामुळें खुद्द परमेश्वराकडे दोघांचेंहि दुर्लक्ष झालें. शेजाऱ्यामुळें आपलें ध्येय साध्य होत नाहीं हें ध्यानांत आल्यावर कालांतरानें दोघेहि हिमालय उतरून पुन्हां तुमच्या आमच्या जगांत येऊन दाखल झाले ! तात्पर्य हें कीं, शेजारी हा कुठेंहि चुकत नाहीं. आणि प्रयत्नांतीं तो चुकवला तर माणसाला लौकरच चुकल्यासारखें वाटूं लागतें. संस्था म्हणा वा व्यथा म्हणा, शेजारी हा माणसांच्या रक्तामध्येंच भिनलेला आहे.

• • •

# सर्कस....

रात्रीं नऊच्या सुमारास मी शहराबाहेर फिरून परत येत असतां एका मैदानावरती मला तें दृश्य दिसलें आणि मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें मी कितीतरी वेळ त्या देखाव्याकडे पाहात उभा राहिलों.

त्या मैदानावर एका सर्कशीनें आपला अजस्र संसार मांडावयास सुरुवात केली होती. या सध्यांच्या उपेक्षित परंतु पूर्वी लोकप्रिय असलेल्या संस्थेविषयीं आपल्याला किती गाढ जिव्हाळा वाटतो याची त्या क्षणीं मला जाणीव झाली.

सर्कस येणार असल्याची वार्ता मीं ऐकली होती, नाहीं असें नाहीं. परंतु त्या वार्तेला मीं फारसें महत्त्व दिलें नव्हतें. पूर्वी दाट परिचयाचा, परंतु दीर्घकालीन दुराव्यामुळें आतां अपरिचित झालेला एखादा बालमित्र गांवांत आल्याचें आपण ऐकावें आणि थोडा आनंद वा कुतूहल व्यक्त करून आपण त्यासंबंधींचा विचार सोडून द्यावा तसें माझें झालें. सर्कस येत आहे हें मी विसरून गेलों. तिच्यासंबंधीं आपल्याला कांहीं अधिक कर्तव्य आहे हें मला जाणवलें नाहीं.

परंतु परवां रात्रीं तो देखावा बघितल्यावर अंतःकरणांत निद्रित असलेलीं पूर्वीचीं सारीं भावबंधनें जागीं झालीं. पावलें जागच्या जागीं स्थिर झालीं आणि नजर अधीरपणानें त्या दृश्यांतून संचार करूं लागली. आकाशांतील अंधारांत डोकें खुपसून बसलेला तो विशाल, पांढऱ्या रंगाचा तंबू, त्याच्या पिलांप्रमाणें सभोंवार उभ्या असलेल्या लहानलहान राहुटया, सोंड हलविणें ही एकच गोष्ट इहलोकांत अर्थपूर्ण आहे असें समजून तें कार्य एका झाडाच्या

बुंध्याशीं निरलसपणें करीत राहणारे तीनचार हत्ती, एरव्हीं निर्जन असणाऱ्या त्या मैदानावरील बत्त्यांचा प्रकाश व माणसांची रहदारी, वाघसिंहादि हिंस्र श्वापदांच्या पिंजऱ्यांकडून येणारे भीतिदायक आवाज...हें सारें पाहिल्यावर आणि ऐकल्यावर हें एकंदर प्रकरण आपल्याला किती प्रिय आहे याची मला जाणीव झाली. किती तरी वेळ मी तेथें उभा राहिलों.

तेवढ्यांत सायकलवरून घराकडे जाणारे एक परिचित गृहस्थ मला पाहून खालीं उतरले व आश्चर्यचकित मुद्रेनें माझ्याकडे बघूं लागले. चारपांच उनाड मुलांच्या मेळाव्यांत मी तंबूकडे पाहात उभा आहे याचें तर त्याला नवल वाटलेंच, परंतु त्या मुलांप्रमाणें तंबूच्या पडद्याखालून आंत जाण्याचा चोरमार्ग मीहि शोधीत आहे कीं काय याचीहि त्याला शंका आली असावी. तो प्रश्नार्थक चेहऱ्यानें उद्‌गारला, —

"कां हो ?"

"काय ?"

"इथें उभे ?"

"सर्कस पाहातों आहे !"

"इथून काय दिसतं ? सुरू झाली म्हणजे आंत जाऊन पाहा कीं !"

"तें पाहाणं वेगळं ! हें वातावरण पाहाण्यांतच विशेष गंमत आहे !"

माझ्या परिचित मित्रानें एकदां निर्विकार नजरेनें त्या तंबूकडे पाहिलें आणि कोणतीहि गंमत त्यांत न आढळल्यामुळें तो सायकलीवर पाय टाकून निघून गेला. एका माणसाची मिठाई दुसऱ्या माणसाला मिठाई वाटेलच असें नाहीं या सुभाषिताचा मला प्रत्यय आला.

सर्कस या संस्थेवरील माझी ही भक्ति फार जुनी आहे. सर्कसमध्यें जाऊन आपण कांहीं अमानुष कामें करावींत आणि स्तिमित झालेल्या लोकांच्या टाळ्यांवर चरितार्थ करावा अशी आकांक्षा, वेड्यावांकड्या आकांक्षा करायच्या वयांतहि माझ्या मनांत कधीं आली नव्हती. मला वाटणारा हा स्नेहभाव पूर्णतः निःस्वार्थीपणाचा आहे. केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेवरून वाटणारी भावना आहे ती. नाटकासंबंधींहि मला खूप प्रेम आहे. पण तें वेगळ्या प्रकारचें आहे. कांहींसें अधिक मर्यादित आहे. नाटककंपनीचें बिऱ्हाड पाहाण्या-

साठीं मी असा कधीं उभा राहिलों आहें किंवा राहीन असें वाटत नाहीं. आणि याचें कारण म्हणजे सर्कस आपल्याभोंवतीं एक अद्भूततेचें वातावरणच घेऊन येते. रंगभूमीवर आभाळाला हात किंवा आवाज लावणारा धीरोदात्त नायक रंग उतरून बाहेर आला म्हणजे त्याच्या पूर्वस्वरूपाच्या मानानें फार क्षुद्र वाटतो. नाटचांत प्रतिभा असते, यांत शंकाच नाहीं. परंतु तें नाटच आहे, म्हणजे जें खरोखर नाहीं त्याचा आविर्भाव आहे हें आपण विसरूं शकत नाहीं. तेथील शौर्य खोटें, धैर्य खोटें, शृंगार खोटा आणि त्यागहि खोटाच. मानापमानांतील धैर्यधर मोठें शौर्य गाजवितों असें आपण पाहतों आणि मानतोंहि. परंतु त्या शूरत्वाच्या अंगरख्याखालीं लपलेला नट हा प्रत्यक्षांत लक्ष्मीधराचा वडील भाऊ असण्याची शक्यता कांहीं कमी नसते. एकच प्याला नाटक आटोपल्यावर रामलाल दारू पीत आहे आणि सुधाकर किंवा तळीराम त्याला तो नाद सोडण्याचा आग्रह करीत आहेत असा प्रसंग असंभवनीय नाहीं. सर्कशीच्या बाबतींत अशा आविर्भावास अवसर नाहीं. तेथील वाघसिंह जितके खरे असतात तितकेच तेथील खेळाडूहि खरेच असतात. जीवनमृत्यूच्या सरहद्दीवर जाऊन त्यांनीं केलेली कसरत खरी असते. उत्कृष्ट नाटच पाहून मनुष्य आनंदित होईल, पण सर्कशींतील उत्कृष्ट कामें पाहून तो स्तिमित होतो. नाटच आपल्या आटोक्याबाहेरचें आहे असें त्याला कधीं वाटत नाहीं. सर्कशींत मात्र आपल्या जीवनाच्या वर्तुळाबाहेरचें अस कांहीं तरी दिसत असतें.

अद्भुततेचें आकर्षण लहानपणीं विशेष वाटतें. गो. गो. दातारांच्या कालिकामूर्ति,शालिवाहन वगैरे कादंबऱ्या जगांतील सर्वश्रेष्ठ कलाकृति आहेत असें मानण्याचा काळ असतो तो. कल्पनाशक्ति तरल असते व तिची धार व्यवहाराच्या आघातांनीं बोथट झालेली नसते. या प्रवृत्तीमुळेंच सर्कस या संस्थेविषयींचें प्रेम सहसा लहानपणींच मनांत घर करून बसतें. आमच्या छोटचा गांवीं सर्कस आली म्हणजे मुलांच्या जगांत केवढी विलक्षण खळबळ माजायची! सर्कशीच्या त्या अद्भुतरम्य विषयामुळें शाळा, घर, पुस्तकें, परीक्षा वगैरे साऱ्या रूढ व रटाळ गोष्टी चटकन् शून्यामध्यें विलीन होऊन जात. हत्तीच्या हलत्या सोंडेकडे व अवाढव्य आकाराकडे तासन् तास पाहात

राहूनहि समाधान व्हावयाचें नाहीं. पिंजऱ्यामध्यें अविरत फेऱ्या मारणारे वनराज पाहून गिरिदऱ्यांनीं भरलेलें त्यांचें सगळें हिरवें साम्राज्य डोळ्यांपुढें उभें राही ! तंबूच्या पांढऱ्याशुभ्र विस्ताराकडे पाहातांना, किती वेगवेगळ्या शहरांत, गांवांत, प्रांतांत तो असेंच वास्तव्य करून आला असेल याचा विचार मनामध्यें घोळूं लागे. आणि रात्रीच्या वेळीं प्रत्यक्ष तंबूमध्यें जाऊन बसल्यावरती तर एका वेगळ्या जगाचीं चित्रविचित्र कवाडेंच समोर खुलीं होत आहेत असें वाटे.

सर्कस या शब्दाच्या उच्चाराबरोबर मला विदूषकाचें स्मरण होतें. त्या विचित्र संसारांतील ही सर्वांत विचित्र चीज. आपण विदूषक आहोंत हें तो आपल्या पहिल्या प्रवेशापासूनच सर्वांना जाणवून देतो. कोणी तरी मागून ढकलल्याप्रमाणें धडपडत, आपल्या तऱ्हेदार टोपीशीं हुस्ती घेत, एखाद्या सराईत खेळाडूच्या पाठोपाठ त्याची नक्कल करीत —वा अशीच कांहीं इतर चेष्टाकुचेष्टा करीत तो प्रवेश करतो. लोकांना हंसविण्याचा हेतु त्यांत सूर्य प्रकाशाइतका लख्ख असतो. तेथें कांहीं लपवालपवी नाहीं, कोणतेंहि आच्छादन नाहीं. विदूषकगिरीची लाज नाहीं, सभ्यतेचा संकोच नाहीं किंवा शिष्टपणाची मर्यादा नाहीं ! लोकांना हंसविणें, अगदीं खदखदां हंसविणें हेंच ऐहिक जीवितांतील सर्वश्रेष्ठ, पवित्रांतील पवित्र कार्य होय ही त्याची भूमिका. संस्कृतीची प्राथमिक अवस्था दर्शविणारा विनोद असतो तो. पण मला वाटतं, हा त्यांतला उणेपणा नसतो तर विशेष गुण असतो. त्या तंबूच्या बाहेर संस्कृतीचें ओझें सर्वांच्या शिरावर असतेंच. शिष्टाचारानें संकुचित केलेल्या नाजुक स्मितांची आरास तेथें सर्वांच्या चेहऱ्यावरती सदोदितच चालू असते. तेथला विनोदहि शिष्टाचाराच्या कल्पनापाशांनीं आवळलेला, तेथलें हास्यहि सभ्यतेच्या कात्रीनें कातरलेलें ! सर्कशीच्या तंबूंत या संयमाच्या शृंखला निखळून पडतात व हें घडवून आणण्याचें श्रेय विदूषकाकडेच असते. सर्कशीला योग्य असें वातावरण तो निर्माण करतो. घोड्याच्या पार्श्वभागाला लोंबकळून तो किंचाळ्या मारीत रंगणांत फिरूं लागला कीं प्रेक्षक एका जगांतून दुसऱ्या जगांत तावडतोब प्रवेश करतात. हें दुसरें जगहि विदूषकाच्या विनोदाप्रमाणेंच संस्कृतीच्या कक्षेबाहेरचें असतें !

विदूषकाचें आणखी एक वैशिष्टय असतें. आपण केवळ विदूषक आहोंत असें तो भासवतो, पण तो केवळ विदूषक नसतो. त्याच्या सगळ्या अवतारांत हा एक खोटेपणा असतो, पण तो फार हृदयंगम असतो. विदूषक हा स्वत:हि अत्यंत पटाईत व सराईत असा कसरतकार असावा लागतो. कसरतीचें विडंबन करण्यासाठीं त्याला इतर कसरतकारांपेक्षांहि कित्येकदां अधिक कौशल्य दाखवावें लागतें, अधिक धोका पत्करावा लागतो. आणि इतकें असून, इतर खेळाडूंप्रमाणें तो लोकांकडून कौतुकाची किंवा आदराची अपेक्षा करीत नाहीं! तुम्हीं मोकळेपणानें हंसावें एवढीच त्याची आकांक्षा. घरी गेल्यावर तुम्ही म्हणतां, तो विदूषक काय गाढव होता, गमत्या होता! तो सराईत खेळाडू होता ही वाहवा त्याच्या वाट्यास येणें प्राय: अशक्य!

विदूषकाच्या भूमिकेंतील सर्वांत मोठी हृदयंगमता यांतच आहे असें मला वाटतें. तुमच्या पोटांत संकोचानें दडून राहणारें निरामय, निर्भेळ हास्य बाहेर ओढून काढतांना, हक्काच्या कौतुकावरती तो लीलेनें पाणी सोडतो.

सर्कशीचें हें सारेंच जग वरती म्हटल्याप्रमाणें संस्कृतीच्या टप्प्याबाहेरचें असतें. तें मूलत: असंस्कृत,रानटी, माणसाच्या पूर्वस्थितीचें निदर्शक असें असतें. वाघसिंहासारख्या हिंस्त्र पशूंशीं येणारा माणसाचा संबंध पुरातनच. हत्ती-माकडांसारख्या जनावरांशीं क्रीडा करण्याचा उद्योग एरव्हींच्या जीवनांत कोणीहि माणूस करणार नाहीं. ज्या गोष्टी पाहाण्यासाठीं आज आपल्याला पैसे देऊन तिकीट खरेदी करावें लागतें, त्या गोष्टी मानवी इतिहासाच्या पहिल्या पर्वामध्यें सर्वांना मोफत व अपरिहार्यपणें पाहाव्या लागत असतील! मनुष्य आपल्या पायावर त्या काळीं पुरेसा उभा नव्हता. चतुष्पादांपासून तो फारसा दूरवर गेला नव्हता. अनेक कार्लेकर आणि देवल त्या काळांत या पशूंवर आपल्या बुद्धीचे व शक्तीचे साहसी प्रयोग करीत असतील!

दुसरीहि एक गोष्ट आहे. सर्कशींतले सारे प्रयोग म्हणजे यमराजाला दिलेलीं आव्हानें होत. घोड्याच्या पाठीवर एका पायावर उभें राहण्यापासून मोटारसायकलवर बसून गोल पिंजऱ्यांत फेऱ्या मारण्यापर्यंत सारे खेळ म्हणजे कसरतकारांनीं आपल्या प्राणांशीं केलेले खेळच असतात. पाठीशीं विस्तीर्ण लांकडी फलक घेऊन आपल्या अवघ्या शरीराभोंवतीं तीक्ष्ण

सुऱ्यांची वेलबुट्टी काढून घेणारी स्त्री रोज मरणाच्या वेशींतूनच माघारीं येत असते. जीवनमरणाच्या सीमारेषा सर्कसच्या तंबूंत अगदीं पुसट झालेल्या असतात. आपल्या सुरक्षितपणाच्या भूमिकेवरून आपण दुसऱ्याच्या असुरक्षितपणाचा आनंद उपभोगीत असतों. मृत्यूशीं लगट करण्याची ही वृत्ति आजच्या सुधारलेल्या काळांत अगदीं विरळा आढळते. मनुष्य जसजसा प्रगत होत गेला तसतसें त्याचें जीवन अधिक निर्वंध, सुखसोयींनीं अधिक समृद्ध, असें होत गेलें. प्राचीन काळांत तो सर्कशींतील कसरतकारांप्रमाणेंच मरणाच्या सरहद्दीवर जगत होता. म्हणून सर्कशीच्या तंबूंत पाऊल टाकणें म्हणजे भूतकाळांत प्रवेश करणें होय, असें मला वाटतें. सर्कस पाहण्याचा आनंद या गोष्टींतच असेल काय ?

● ● ●

# हे लोक...

'हे लोक ! ' चष्म्याच्या जाड भिंगाखालीं नेस्तनावूत झालेलें आपलें नाक उडवीत तो म्हणाला आणि सभोंवारच्या बहुतेक लोकांनीं संपूर्ण अनुमति दर्शविणारे चेहरे करून त्या लोकांकडे पाहिलें. एखाद्या शृंगारलेल्या दिवाणखान्यामध्यें रात्रीच्या वेळीं आपण संतुष्टतेनें आकाशवाणी ऐकत पडलों असतां,एकाएकीं दिवाणखान्याचीं दारें उघडून एक गाईम्हंशींचें खिल्लार आंत शिरलें, तर त्याच्याकडे आपण ज्या भावनेनें आणि ज्या नजरेनें पाहूं, त्या भावनेनें व नजरेनें ते सर्वजण त्यांच्याकडे बघत होते. रौरवाचा रस्ता चुकलेल्या मूर्तिमंत पापांचा हा थवाच आगगाडीच्या डब्यांत घुसत आहे असें त्या मंडळीच्या अंगविक्षेपांवरून सूचित होत होतें. सर्वांच्या डोक्यांत एक विचार होता, डोळ्यांत एक छटा होती. बाहेरच्या लोकांनीं आंत येऊं नये याबद्दल अगोदर आगगाडींत बसलेल्या लोकांचें जितकें एकमत होतें तितकें ऐन युद्धाच्या काळांत कोणत्याहि राष्ट्राच्या विधिमंडळांतसुद्धां होत नसेल. दूर महासागरामध्यें एखादें लहानसें जहाज वादळांत सांपडावें, त्याप्रमाणें परस्परांशीं सहमत असलेल्या त्या उतारूंच्या जमावांत, मी माझ्या वेगळ्या मतामुळें एकाकी सांपडलों. ते त्या लोकांकडे तिरस्कारानें पाहात होते आणि मी या लोकांकडे-होय, तिरस्कारानेंच पाहात होतों.

तो जाड भिंगाचा चष्मा घालणारा आणि 'हे लोक' म्हणून नाक उडविणारा प्राणी—मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें किंवा एखाद्या फर्ममध्यें महागाई-भत्त्यासह शेंदीडशें रुपये कमावणारा एखादा हिशेबनीस असावा. त्याच्या आयुष्याचा सगळा हिशेब त्याच्या तोंडावर लिहिलेला होता. एखाद्या विहि-

रीचा उपसा करावा त्याप्रमाणें त्याच्या डोळ्यांतील सारा जिवंतपणा, सारा स्वाभिमान कोणींतरी उपसून काढलेला होता. त्याच्या ऑफिसांत दिवसा दिवे लावले जात होते हें सहज कळण्यासारखें होतें. अंधेराच्या सतत सहवासामुळें आगगाडींतील गर्दीमध्यें शिरणारा माफक प्रकाशहि त्याला असह्य झाला होता आणि आपल्या लगतची खिडकी पूर्णपणें बंद करून तो कोपऱ्यामध्यें उशीवर रेलून पडला होता. त्याची शरीरयष्टि लहानशी होती व तीमध्यें हाडांना प्राधान्य होतें. थोडासा धक्का बसला तरी त्याच्या हाडांचे सांधे निखळून सर्वांची एक मोळी होईल कीं काय, अशी शंका येण्यास अवसर होता त्याच्या दोन्ही गालांचे कोनाडे झाले होते आणि दिवा ठेवण्याच्या कोनाड्यांत काजळाची पुटें बसतात त्याप्रमाणें त्यांत रोज खरडलेल्या दाढीचा काळसर पणाहि कोंदटलेला होता. त्याच्या जाड ओंठावर एक बारीक सिगारेट जळत होती आणि बारीक मनगटावर एक जाड सोनेरी घड्याळ टिकटिकत होतें. तो घड्याळाकडे ज्या गंभीरतेनें आणि निष्ठेनें वारंवार पाहात होता, ती ध्यानांत घेतां, घड्याळाची किल्ली म्हणजे त्याच्या जीवनाची व यशाची गुरुकिल्लीच होती असा अंदाज करणें कठिण नव्हतें. त्याचे कपडे परीटघडीचें, स्वच्छ आणि मूल्यवान् होते. घड्याळाप्रमाणें आपल्या कोट–विजारीकडेहि तो पुनःपुन्हा पाही आणि त्यांच्यावर जमा होणारे धुळीचे कण हळुवार टिचकीनें उडवून लावी. घड्याळाखालोखाल त्याच्या आयुष्यांत कपड्यांना महत्त्व असावें. या दोन खांबावरती आपल्या जीवनाचा तंबू त्यानें उभारला होता आणि त्यांत तो आरामानें विश्रांति घेत पडला होता. पण त्याच्या विश्रांतीला 'हे लोक' बाधा आणीत होते !

हिशेबनिसाच्या उद्गारांना संमति देणाऱ्या आणि त्या लोकांच्या अमित दुर्गुणांची चिकित्सा आपापल्या बुद्धिनुसार चालू ठेवणाऱ्या मंडळीमध्यें आणखी एकदोन चेहरे लक्षांत घेण्यासारखे होते. त्यांतील एकजण उघडउघड व्यापारी होता. त्याचा लठ्ठ बँक अकाउंट त्याच्या तुंदिल तनुवरून जाहीर होत होता. त्याच्या ओठांची अधूनमधून सारखी उघडझांप होत होती.आपल्या दुकानांतील मालाचे भाव किंवा सट्टेबाजारांतील वायद्यांचे आंकडे तो गाण्याप्रमाणें गुणगुणत असावा.व्यापार हें त्याच्या ऐहिक जीवनाचें सार आणि संगीत होतें.आपल्या

लांबलचक रेशमी कोटाचे पाखें त्यानें दोन्ही हातांनीं अपत्याप्रमाणें पोटांशीं कवळून धरले होते. आगगाडींत पाऊल टाकल्याबरोबर त्याला पहिली चिंता जागा मिळवायची नव्हे, तर खिसा सांभाळावयाची लागली असावी ! आपल्याला अन्तःकरण आहे या जाणिवेपेक्षां आपल्याला खिसा आहे ही जाणीव ज्या लोकांत अधिक प्रभावी असते त्यांपैकीं तो एक होता. त्या व्यापाऱ्यानें दोन स्टेशनांवर कांहींतरी खाण्याचा किंवा पिण्याचा मनोदय जाहीर केला होता. परन्तु पैशाचा व्यवहार न जमल्यानें त्याचा हेतु तडीस जात नव्हता. खरोखर असेंच दिसत होतें कीं, त्याला कांहीं भूक किंवा तहान लागली नव्हती; प्रवास करतां करतां वेगवेगळ्या पदार्थांचे भाव काय आहेत आणि त्यांत कमीजास्त होऊ शकतें काय या जिज्ञासेनेंच तो प्रेरित झालेला होता, आणि ती भागण्यानेंच तो आकंठ तृप्त होत होता. एका कवीनें मृत्यूला असें विनविलें आहे कीं, तूं येणार असशील तर सुन्दर स्त्रीच्या रूपानें ये. या गृहस्थानें मृत्यूला चेकच्या किंवा रुपयाच्या रूपानें यावयास सांगितलें असतें. सर्वत्र भिरभिर फिरणारे त्याचे लहान, गोलसर व चकचकीत डोळे पाहून, दोन कोऱ्या करकरीत पावल्यांची आठवण होई; आणि ईश्वरानें हें आठ आण्याचें भांडवल घेऊन जगाच्या बाजारांत त्याला व्यापार करण्यासाठीं पाठविला आहे असें वाटे. त्याचा वर्ण गोरा होता, कपाळ मोठें होतें आणि नाक बांकदार होतें. नाकाच्या खालून दोन्ही दिशेला ओघळलेल्या मिशा कातरून बारीक व अणकुचीदार केलेल्या होत्या. कपाळावर पुसट झालेला चंदनी गंधाचा टिळा होता; तो त्याची धार्मिकता प्रकट करीत होता. लाखों रुपयांची कमाई केल्यावर वेळप्रसंगीं एखाद्या अनाथ संस्थेला कांहीं हजारांची देणगी आणि आपलें किंवा आपल्या बापजाद्याचें नांव देण्यास त्यानें कंबर बांधली असती हें त्या पुसट टिळ्यावरून स्पष्ट होत होतें. पहिला चष्मेवाला साहेबापुढें, त्याप्रमाणें हा टिळेवाला देवाच्या मूर्तीपुढें नेहमीं नम्र होत असावा. तो दुसऱ्याचे हिशेब ठेवीत होता, हा स्वतःचे हिशेब निर्माण करीत होता. फुलांकडे पाहून अत्तराचे आणि चंद्राकडे पाहून चांदीचे भाव त्याच्या मनांत येत असावेत ! 'हे लोक' पाहिल्यावर त्याच्याहि कपाळावर आठी उमटावी आणि त्याची व्यापारी जीभ लवलवूं

लागावी हें साहजिकच होतें. कारण त्याच्या गिऱ्हाइकांच्या जगांत या किंवा अशा लोकांचा कालत्रयीं समावेश होण्यासारखा नव्हता !

त्या मंडळींतील तिसरी एक व्यक्ति, तिच्या लांब केसांमुळें, उंच टोपीमुळें आणि वेषभूषेंतील एकंदर स्वस्त थाटमाटामुळें लक्षांत येण्यासारखी होती. हा गृहस्थ कोणातरी श्रीमंताची मोटरगाडी चालवीत किंवा साफसूफ करीत असावा. श्रीमंत होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा असावी. पण ती अशक्य असल्यानें श्रीमंतीचें बाह्य अनुकरण करण्याचा प्राणांतिक प्रयत्न त्यानें केलेला होता. आपल्या मर्यादित मिळकतींत जेवढा डामडौल साधतां येईल तेवढा त्यानें साधला होता. त्याच्या कोटाच्या वरच्या खिशांत एक रंगीत रुमाल त्रिकोणी घडी करून बसविलेला होता. रुमालाच्या पार्श्वभूमीवर फाउंटनपेनची एक क्लिप आणि पेन्सिलीचें कळसासारखें उंच टोपण चकचकत होतें. हातांतल्या मोठ्या थोरल्या घड्याळाला सोनेरी रंगाची रुंद साखळी लावलेली होती. त्याचे ओंठ व दांत पान-तंबाखूनें तांबडे-काळे झालेले दिसत होते. त्या लोकांना शिव्या देण्यांत आणि त्यांचा प्रत्यक्ष प्रतिकार करण्यांत या गृहस्थानें बराच पुढाकार घेतला होता. पहिले दोघे जागच्याजागीं बसून तोंड चालवीत होते, हा हातहि चालवण्यास तयार होता. पहिल्या दोघांच्या वर्गांतील हा नव्हता हें उघड होतें. कदाचित् आंत येणाऱ्या त्या लोकांच्या वर्गाशींच त्याचा सूत्र-संबंध लागूं शकला असता. परंतु त्याचा जन्म त्या बाजूला असला तरी त्याची महत्त्वाकांक्षा या बाजूला होती. याच कारणामुळें त्याचा त्या आप्त लोकांवर बहुधा अधिक राग होता. तो त्यांच्यापासून दूर सरकत होता आणि ते त्याच्याजवळ येत होते. तो वृत्तीनें आणि प्रकृतीनें कणखर होता आणि प्रसंग पडल्यास त्या लोकांच्या अंगावर हात टाकण्यास, म्हणजे त्यांच्या फाटक्या आणि मळक्या कपड्यांना हात लावण्यास तो मागेपुढें पाहणारा नव्हता. पहिल्या दोघांच्या उत्तेजनानें त्यानें भुसावळ एक्स्प्रेसच्या डब्याचें तें दार पावनखिंडीप्रमाणें लढविण्याचा जोरानें प्रयत्न केला. परंतु त्या लोकांच्या लोंढ्यापुढें त्याचा इलाज न चालल्यामुळें शेवटीं आपली उंच टोपी सांवरीत तो परत आला.

हा सारा प्रकार सकाळीं मुंबईहून निघालेल्या आमच्या गाडीनें कल्याणच्या

पुढें मजल गांठल्यावरती झाला. आमचा डबा अर्थातच तिसऱ्या वर्गाचा आणि उतारूंनीं खचलेला होता. या गर्दींतहि कित्येक पुंडांनीं आणि प्रतिष्ठितांनीं वाजवीपेक्षां अधिक जागा अडवून ठेवली होती. नागाच्या रूपानें पूर्वज आपल्या धनावर बसून राहतात, त्याप्रमाणें जी. आय. पी. रेल्वेच्या लाकडी बांकावर ते निष्ठेनें आणि आव्हानाच्या पवित्र्यांत बसून अथवा पडून राहिले होते. कल्याणपर्यंत एकंदर परिस्थिति ठीक होती. पण पुढील प्रत्येक लहान स्टेशनवर 'हे लोक' गाडींत चढूं लागले आणि त्यामुळें डब्यांतील पूर्व उतारूंचें स्वास्थ्य कमी होऊं लागलें. अशाच एका स्टेशनावर आंत शिरूं पहाणारा लोंढा पाहूनच आमचा चष्मेवाला 'हे लोक' म्हणून उद्गारला होता. 'हे लोक' हे शद्ब त्यानें अशा रीतीनें उच्चारले कीं, या लोकांचें अधिक वर्णन करण्याची आवश्यकताच राहूं नये.

शहरापासून आणि शहरीं संस्कृतीपासून दूर राहणारे अडाणी खेडूत होते ते ! त्यांच्यांतील प्रत्येक माणूस म्हणजे दारिद्र्याची आणि उपासमारीची पताका होती. त्यांत कांहीं शेतकरी असावे, कांहीं गुराखी असावेत, कांहीं मोळ्या, गवत वगैरे विकणारे असावेत. त्यांच्याहि श्रीमंतींत अथवा दारिद्र्यांत कांहीं भेद आणि प्रतवारी असावी. परंतु ते भेद पत्त्याच्या डावांतील राजा-गुलामाच्या भेदाप्रमाणें होते. म्हणजे ते सर्वजण आपल्या भेदांसह एकत्र मिसळून, पिसून गेले होते. पत्त्यांतील डावांत राजाच्या जवळ राणीच सांपडेल असें नाहीं. दुर्री किंवा छक्कीहि तेथें असूं शकेल. वरिष्ठ पानें कनिष्ठ पानांपासून वेगळीं असत नाहींत. एक्याप्रमाणें दुर्रीलाहि आपण पत्ता या संज्ञेनेंच ओळखतो. त्याप्रमाणें ते सारे लोक 'दरिद्री' या एका सर्वसामान्य संज्ञेला प्राप्त होते. त्यांच्यांत पुरुषांप्रमाणेंच स्त्रिया व मुलेंहि होतीं. मुलें बहुतेक वेषाच्या विवंचनेपासून मुक्त होतीं. प्रौढांचे पोषाख छिन्नविच्छिन्न झालेले, आणि काळे कळकट होते. एखाद्या शहराच्या पूर्व वैभवाचे अवशेष म्हणून कांहीं वांकडेतिकडे दगड मात्र शिल्लक राहावें आणि ते कल्पनेनें एकत्र करून पूर्वीच्या वैभवाचें चित्रहि मनासमोर उभें करणें अशक्य व्हावें त्याप्रमाणें, त्यांच्या अंगावरील लक्तरांवरून त्यांचें मूळ स्वरूप समजणें फार दुष्कर होतें. बायकांच्या अंगाचा बराचसा भाग उघडा पडलेला होता. त्याबद्दल त्यांना लाज किंवा चिंता

वाटण्याची फारशी शक्यता दिसत नव्हती.त्यांच्याजवळ वेगवेगळ्या आकाराची गाठोडीं आणि बोचकीं होतीं. ते डब्यांत शिरत किंवा शिरण्याचा प्रयत्न करीत ते जमावानेंच. गर्दींत जीव गुदमरण्याचें भय त्यांना नव्हतें. ते लोक आंत आले आणि दरवाजापाशीं उभे राहिले. इच्छा आणि सामर्थ्य असतें तर ते डब्यांत आपली प्रगति करून घेऊं शकले असते. वाजवीपेक्षां अधिक जागा अडविणाऱ्या लोकांना उठवून ते बसूंहि शकले असते. पण त्या दृष्टीनें त्यांनीं प्रयत्नच केला नाहीं. ते आंत आले आणि सुखानें एकमेकांच्या आधारानें उभे राहिले. आगगाडीच्या डब्यांत आपण उभेच राहिलें पाहिजे अशी त्यांची भावना दिसली. केवळ आगगाडीचाच नव्हे तर एकंदर जीवनाचाच प्रवास उभ्यानें करण्याचा संकल्प त्यांनीं सोडल्यासारखें वाटत होतें. ते इतक्या हौसेनें आणि निष्ठेनें उभे राहात होते कीं,स्वतःच्या घरामध्येंसुद्धां बसण्याची मनीषा त्यांनीं कधीं बाळगली नसेल असें मला वाटलें. लोक त्यांना दूर ठेवीत होते आणि दूर राहाणें हाच आपला हक्क आणि गौरव आहे अशा समजुतीनें तेहि दारापाशीं उभे राहिले होते. पुढें येण्याची कांहीं आमंत्रणेंदेखील त्यांनीं साफ नाकारलीं. मला त्यांचा संताप आला.

मीहि शेवटीं उद्वेगानें उद्गारलों, ‘हे लोक !’

● ● ●

# पक्षांचा राजा....

गरुड पक्षी हा सध्यां पक्षांचा राजा समजला जातो. परंतु कांहीं कारणानें या राजपदाची फेर निवडणूक झाली आणि मला-मी पक्षी नसतांहि – मतदानाचा हक्क मिळाला, तर माझें मत मीं गरुडासच देईन यांत मुळींच शंका नाहीं, गरुडाविषयीं मला गाढ आदर वाटतो. मीं अद्याप गरुड पाहिलेला नाहीं. आणि इतरहि कोणीं तो पाहिला असेल–असें मला वाटत नाहीं. परंतु एखादी गोष्ट पाहिली नाहीं म्हणून तिच्याविषयींचा आदर कमी होऊं शकत नाहीं. किंबहुना न पाहिलेल्या गोष्टींबद्दल आणि व्यक्तिबद्दलच माणसाला अधिक आदर असूं शकतो. पाहणें किंवा जवळ असणें ही गोष्ट प्रेमाला आवश्यक असते, आदराला नव्हे.

गरुड पक्षी आपल्याकडे प्रत्यक्ष दिसत नसला तरी त्याच्या संबंधींची सर्वांगीण आणि शास्त्रीय माहिती आपल्याला ज्ञानकोशासारख्या ग्रंथांत मिळू शकते. तशी ती मिळविण्याचा विचार मी अनक दिवसांपासून केलेला आहे. परंतु अद्याप तो तडीस गेलेला नाहीं आणि कधीं जाईल अशी आशा वाटत नाहीं. ज्ञानकोश समोर असला म्हणजे मला गरुडाची आठवण असत नाहीं आणि गरुडाची आठवण होते तेव्हां ज्ञानकोश समोर असत नाहीं ! मानवी जीवनांत ज्या असंख्य चुकामुकी सतत चाललेल्या असतात त्यांतील ही एक होय. अनेकदां आठवण होऊन आणि ज्ञानकोशासारखें पुस्तक जवळ असूनहि उपयोग होऊं शकत नाहीं. त्याचें असें होतें. ‘ ग ’ मधला गरुड पाहण्यासाठीं आपण ज्ञानकोश उचलतों आणि उघडतों. परंतु उघडलेलें पान ‘ ग ’ ऐवजीं ‘ क ’ चें असतें आणि त्यांतील कालिदासावर आपली सहजच दृष्टि जाते

कालिदासासंबंधीं आपल्याला आदर व कुतूहल असल्यानें त्याला ओलांडून जाणें शक्यच नसतें. आपण 'कालिदास' वाचूं लागतों. कालिदासांत भोजराजा–विषयीं मजकूर असल्यानें व त्याच्याविषयींचें आपलें ज्ञान तुटपुंजें असल्या-मुळें आपण 'भ' मध्यें प्रवेश करतों. भोजाविषयींचा मजकूर वाचतांना चंद्रगुप्त मौर्य आणि समुद्रगुप्त यांजविषयीं करण्यांत आलेल्या कांहीं विधानानें आपण चकित होतों आणि 'भ' नंतर आपण 'च' कडे आणि 'च' नंतर 'स' कडे वळतों. या धामधुमींत गरुडपक्षी आठवणींतून उडून जातो किंवा तेवढ्यांत कोणीतरी उपस्थित होऊन आपल्याला ज्ञानकोश दूर सारावा लागतो.

परंतु गरुड पक्षी, मी प्रत्यक्ष किंवा ज्ञानकोशांतहि पाहिला नसला तरी त्याच्यासंबंधींच्या माझ्या कल्पना स्पष्ट आणि सिद्ध आहेत. त्या खऱ्या आहेत कीं नाहीं यासंबंधी मला फारशी चिंता नाहीं. कारण माणसानें स्वतः पुरता विचार केल्यास त्याच्या कल्पनेइतकी सत्य गोष्ट जगांत दुसरी असूं शकत नाहीं. गरुड पक्षी दोन प्रकारचे असतात. एक घारीप्रमाणें करड्या रंगाचा आणि दुसरा तापलेल्या सोन्याप्रमाणें आरक्त सोनेरी रंगाचा. या वर्णभेदाव्यति–रिक्त इतर कांहीं फरक त्यांच्यांत नसतो. त्याची चोंच पोलादी कट्यारी–प्रमाणें लांब, बांकदार आणि बलाढ्य असते. उंची खूप असते, पंख मोठाले असतात आणि अंगांत प्रचंड सामर्थ्य असतें. दृष्टींत करारीपणा असतो आणि अंत:करणांत निर्धार असतो. अशा या प्रभावशाली पक्षाचें श्रेष्ठत्व अमान्य करून त्याच्याकडे विहंग–सृष्टीचें नेतृत्व न देणें म्हणजे गुणग्राहकतेशीं आपला घटस्फोट झाल्याचें जाहीर करणें होय.

आमच्या पुराणांनीं आणि प्राचीन काव्यांनीं गरुडांचें हें महात्म्य मान्य करून आपली गुणग्राहकता व्यक्त केली आहे. देवाधिदेव विष्णूनें गरु–डाला आपल्या वाहन–पदाचा मान दिला आहे अथवा या खगश्रेष्ठानें फक्त देवाधिदेवाचेंच वाहन होण्यास मान्यता दिलेली आहे. देवांचा विक्षिप्तपणा त्यांच्या इतर कारभाराप्रमाणें वाहन–योजनेंतहि दिसून येतो ही गोष्ट खरी आहे. गणपतीसारख्या महोदर दैवतानें मूषकावर कां स्वार व्हावें किंवा सौदामिनीचा वेगसुद्धां ज्याच्या जागतिक संचाराला आणि कार्याला अपुरा

पडेल त्या यमराजानें, वाहन म्हणून रेड्याचा स्वीकार कां करावा हें त्या दोघांशिवाय इतरांना समजणें कठिण आहे. परंतु विष्णूची विक्षिप्तपणा-साठीं प्रसिद्धि नाहीं. कनिष्ठ देवांच्या वर्तनांतील आणि वृत्तींतील हा तऱ्हे-वाईकपणा त्या श्रेष्ठ देवेंद्राच्या चरित्रांत अंशमात्रहि आढळत नाहीं. लहान कवींचें वर्तन काव्यमय असतें आणि काव्य गद्यमय असतें, तर महान् कवींचें काव्य काव्यमय असतें आणि वर्तन गद्यमय असतें असें म्हणतात. देवांच्या बाबतींत असाच कांहींसा प्रकार झालेला आहे. अवघ्या संसाराचा आधार असलेला विष्णु विक्षिप्त असूंच शकत नाहीं. आणि म्हणूनच त्यानें गरुडाची निवड केली ती त्याची गुणाढ्यता ध्यानांत घेऊनच.

गरुडाविषयीं मला मुख्य आकर्षण वाटतें तें हें कीं, तो पक्षी असूनहि "पक्षी" या शद्बाशीं संबद्ध असलेल्या नाजुक कल्पनांचा संपर्क त्याला झालेला नाहीं. कोकिळेला उद्देशून कवि माधव जूलियन यांनीं,—

नकोत मजला मैना राघू
साळुंकी चंडोल
नकोत मजला विविध सुरांचे
कृत्रिम ते हिंदोल—

असे उद्‌गार काढले आहेत. या ओळींत खुद्द कोकिळेचाहि अंतर्भाव करून मी ती गरुडाला उद्देशून म्हणूं शकेन. मैना, राघू, कोकिळा वगैरे पक्षी म्हणजे केवळ 'पांखरें' होत! विहंगम ही श्रेष्ठ किताबत संपूर्ण सार्थतेनें ज्याला लावतां येईल असा पक्षी म्हणजे गरुडच होय. गरुड कोकिळेप्रमाणें मोहरलेल्या आम्रावर बसून कूजन करणार नाहीं, पोपटाप्रमाणें पिंजऱ्यांत तुमच्या शद्बांचा प्रतिध्वनि काढणार नाहीं, किंवा मैनेप्रमाणें ती जें काय करीत असेल तें करणार नाहीं. परंतु या गोष्टी तो करीत नाहीं म्हणूनच तो श्रेष्ठ आहे. त्याचें वैशिष्टय कंठाच्या माधुरींत नाहीं अथवा पिसाऱ्याच्या रंगामध्यें नाहीं. तें त्याच्या आंतरिक आणि शारीरिक सामर्थ्यांत आहे, त्याच्या आकाश-भेदी उड्डाणांत आहे. आकाशांत मेघांचें दर्शन होतांच तो मोरासारखा जमिनी-वर नाचत नाहीं; तर मोराला अप्राप्य व प्रिय असलेल्या मेघांच्या मख-मलीवरच तो आपल्या पायांचे आणि पंखांचे प्रहार करतो. काडीदोरा जम-

वून झाडावर अथवा वळचणीच्या आश्रयाला तो आपलें घरकूल बांधीत नाहीं, दुस्तर पर्वताच्या पहाडावरील गुहेमध्यें तो वास्तव्य करतो. त्याला पिंजरा आहे तो फक्त आकाशाचा आणि क्षितिजाचाच. बुलबुलाप्रमाणें गुलाबाच्या क्षुद्र फुलाभोंवतीं तो पिंगा घालीत नाहीं. सूर्याच्या विराट व दाहक तेजोराशीवर अनिमिष दृष्टि लावून झेंप घालण्याचा तो प्रयत्न करतो. इतर पांखरांप्रमाणें तो नाजुक नाहीं, गोंडस नाहीं, गोड नाहीं, विलासी नाहीं. गरुडाच्या बलाढ्य चोंचीनें या गोड गुणांच्या चिंध्या उडविलेल्या आहेत. ज्यांच्याजवळ महान् गुण असतात ते क्षुद्र गुणांची पर्वा करीत नाहींत. इतकेंच नव्हें तर क्षुद्र गुणांविषयीं त्यांना केवळ तिरस्कारच वाटतो. आणि म्हणूनच कोकिळेप्रमाणें गाणारा किंवा मोराप्रमाणें नाचणारा गरुड ही गोष्ट आपल्या कल्पनेलाहि असह्य वाटते. गरुड म्हणतांच माझ्या कल्पनेपुढें एकच चित्र नेहमीं उभें राहतें. आणि तें म्हणजे, पायांत मोठा थोरला नाग धरून, निळ्या आकाशांतून आणि रुपेरी ढगांतून आपले सोनेरी पंख पालवीत, एखाद्या आकाशनौकेप्रमाणें वेगानें उड्डाण करणाऱ्या एका बलाढ्य पक्षाचें.

● ● ●

# अविस्मरणीय ...

" **मा**झ्या जीवनांतील अविस्मरणीय प्रसंग " या मथळ्याची एक लेखमाला मीं पाहिली आणि माझ्या जीवनांतील अविस्मरणीय प्रसंग कोणते याचें मी स्मरण करूं लागलों. अविस्मरणीय प्रसंगसुद्धा स्मरण केल्याशिवाय लक्षांत येऊं नयेत हा एक विरोधाभास आहे. परन्तु माझ्या बाबतींत तरी तो खरा आहे, आणि इतरहि अनेकांच्या बाबतींत तो तसा असेल यांतहि मला शंका वाटत नाहीं.

पूर्णार्थानें जीवनांतील कोणताहि प्रसंग अविस्मरणीय असणें असंभवनीय आहे. मग तो प्रसंग सुखदायक असो वा दुःखदायक असो. घरांतील मूल्यवान् मालमत्ता तिजोरींत कुलूपबंद करून ठेवली जाते, त्याचप्रमाणें नको असलेलें तोडकेंमोडकें सामानसुद्धां अडगळीच्या खोलींतील अंधारांत नजरेआड केलें जातें. कांहीं सामर्थ्यवान् स्मरणाचीं माणसें मात्र याला अपवाद असतात. स्मरणशक्तीच्या क्षेत्रांतील हे गामा-गुंगा कांहींच विसरूं शकत नाहींत. आपल्या पूर्व-जीवनांतील यच्चयावत् तपशील त्यांच्या ओठावरून अहोरात्र ओसंडत असतो. जीवनाच्या दीर्घ शृंखलेंतील प्रत्येक दुवा त्यांच्या हिशेबांत आणि आठवणींत खळखळत असतो. अशक्य हा शब्द जसा नेपोलियनच्या कोशांत नव्हता, तसा अविस्मरणीय हा शब्द त्यांच्या कोशांत नसतो. सोड्याची बाटली फोडतांच आंतील पाणी फसफसून वर येतें, त्याप्रमाणें या मंडळींनीं तोंड उघडलें कीं,अंतःकरणांत न सामावणारा त्यांचा सारा जीवनवृत्तांत वरती उसळून येतो. त्यांच्या मनाच्या घरांत कुलुपाचीं कपाटें नसतात आणि अडगळीच्या खोल्याहि नसतात. सार्‍या वस्तु अस्ताव्यस्तपणें सर्वत्र संचार करीत असतात. आपल्यासारखे कमकुवत मरणचेक्तीस्श लोक

अधिक भाग्यवान् कीं हे गामा-गुंगा अधिक भाग्यवान् याचा निर्णय करणें कठिण आहे.

आणि तुमच्या स्मरणशक्तीला एकांतांत समोर उभी करून, कोणत्या प्रसंगाची कायमची नोंद तूं करून ठेवली आहेस असा प्रश्न तुम्ही केलांत, तर ती एकाच प्रसंगाचा निर्देश करील हें शक्य आहे काय ? तपासनीस येतांच कचेरींतील कारकून आपलें सारें दप्तर उघडून त्याच्यापुढें ठेवतात, त्याप्रमाणें ती अनेक प्रसंगांचे आराखडे तुमच्यापुढें उभें करील. शैशवांतील तुमच्या निर्मळ नजरेसमोर घडलेल्या कांहीं गोष्टी, शाळेच्या चिमण्या जगांत आलेले कांहीं अनुभव, घराच्या चार भिंतींतील कांहीं सुखदु:खें,यौवनाच्या प्रणयजीवनांतील कांहीं आशानिराशा, व्यवहाराच्या बाजारपेठेंतील कांहीं घडामोडी–कितीतरी प्रसंग, कितीतरी अनुभव, आपण अविस्मरणीय आहोंत असा कोलाहल करीत तुमच्याभोंवतीं गर्दी करतील !

मी विचार करूं लागलों तेव्हां अविस्मरणीय प्रसंगांचा असलाच कोलाहल माझ्यासमोर सुरू झाला. ते सारेच अविस्मरणीय आहेत यांत शंका नाहीं. एकाद्या गोठ्या वटवृक्षावर नाना प्रकारच्या पक्ष्यांनीं आपलीं घरटीं बांधून वास्तव्य करावें, त्याप्रमाणें ते प्रसंग माझ्या जीवनावर कायमचीं घरटीं बांधून राहात आहेत. पण ते सारेच प्रकट करण्यासारखे नाहींत. त्यांतील कित्येक चित्ररूपानें माझ्या डोळ्यांसमोर उभे राहतात, पण त्यांचा उच्चार मी स्वत:शींहि करूं शकत नाहीं. कांहीं प्रसंग म्हणजे करुणरसानें कांठोकांठ भरलेले घडे आहेत, ते रहदारीच्या चौकांत रिकामे करण्याचा धीर मला व्हायचा नाहीं. कांहीं अनुभव अविस्मरणीय आहेत; पण ते विस्मरणीय नाहींत याचाच मला खेद होतो. धूपानें परिमळलेल्या आणि निरंजनांनीं उजळलेल्या देवालयाच्या गाभाऱ्यासारखे कांहीं पावित्र्यपूर्ण आणि शांततादायक आहेत. पण, या देवालयाचे दरवाजे इतरांना मी उघडूं शकत नाहीं. या देवालयांत फक्त पुजाऱ्यालाच प्रवेश आहे.

मग चारचौघांना मोकळ्या मनानें सांगण्यासारखे अविस्मरणीय प्रसंग आपल्याजवळ नाहींतच काय ? आहेत. शिक्षकानें टेबलावर छडी आपटतांच

मुलांनीं गर्दी मोडून पटापट आपल्या जागेवर शांतपणें बसावें, त्याप्रमाणें वरील गोष्टी उपस्थित करतांच भोंवतालचा गलबला शांत झाला आहे आणि दोनच प्रसंग माझ्या नजरेसमोर उभे आहेत. एकांत मी स्वतः नायक आहें आणि दुसऱ्यांत मी अनेकांतील एक, सहस्रावधि लोकांतील केवळ एक आहें. एक माझ्या वैयक्तिक जीवनांतील सन्मानाचा, अहंकाराचा क्षण आहे; तर दुसऱ्यांत माझें व्यक्तित्वच शिल्लक उरलेलें नाहीं. कडेकपारींतला एकादा क्षुद्र पाझर गंगासिंधूसारख्या महानदींत मिळून जावा, लुप्त व्हावा, त्याप्रमाणें माझें लहान, क्षुद्र जीवन त्या प्रसंगीं सभोंवारच्या अथांग जीवनांत मिळून गेलें होतें.

अपमान मनांत ठेवावा आणि मान जनांत सांगावा हा सनातन उपदेश या घटकेला तरी मला फारच सोइस्कर वाटतो. कारण आतां सांगत असलेला प्रसंग माझ्या मानाचाच आहे. त्या आठदहा अशिक्षित, अबोल आणि सामान्य मित्रांनीं माझ्या घरीं येऊन माझा जो सन्मान केला, त्याचें विस्मरण मला कधींहि झालेलें नाहीं. कृतार्थतेचें सुख त्या सन्मानानें मला त्यावेळीं जितकें दिलें, तितकें इतरत्र कधींहि लाभलेलें नाहीं. आणि तसें म्हटलें तर, त्यांत विशेष असें कांहीं नव्हतेंहि! यांत सांगण्यासारखें काय आहे असें तुम्ही विचारूं शकाल आणि तुम्ही सांगितलेल्या एखाद्या अनुभवांत सांगण्यासारखें काय आहे असें मीहि विचारूं शकेन. तुमच्या किंवा माझ्या भावनेची तार एखाद्या विशिष्ट प्रसंगानेंच कां छेडली जाते हें सांगणें कठिण आहे आणि समजावून सांगणें त्याहूनहि कठिण आहे.

एका दैनिक वृत्तपत्रांतील माझा अखेरचा दिवस होता तो. तीन वर्षें रोज पांच-सहा तास मी जिच्यावर स्थानापन्न होत होतों त्या सहसंपादकीय खुर्चीचा त्या दिवशीं मी निरोप घेणार होतों. या काळांत निर्माण झालेलीं भावबंधनें तोडतांना मला वाईट वाटत होतें; आणि आपल्या जीवनांत कांहीं-तरी बदल होत आहे, कांहीं नावीन्य येत आहे, या कल्पनेनें आनंदहि होत होता. वरिष्ठांचा आणि सहकाऱ्यांचा निरोप घेऊन मी छापखान्यांत गेलों. माझे खरे निकटचे सहकारी तेथें होते. मी खरडलेल्या मजकुराला ते

सुंदर छापील स्वरूप देत, माझ्याकडून मथळे लिहून घेत, पानांची रचना करण्यासाठीं माझी सल्लामसलत घेत, आणखी मजकूर द्या म्हणून तगादा लावीत, किंवा अधिक मजकूर झाला म्हणून तक्रार करीत. रात्रपाळीला मी एकटा असतांना अधूनमधून आपल्या सुखदु:खाच्या गोष्टी ते मला सांगत किंवा मी बृहस्पति आहें असें समजून कांहीं जागतिक प्रश्नांची माझ्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न करीत. या सहकाऱ्यांना भेटण्यासाठीं मी आंत गेलों.

सारेजण आपापल्या कामांत व्यग्र होते. मी सर्वांना नमस्कार केला, आणि सर्वांचा नमस्कार घेतला. छापखान्यांतील शिस्त कडक होती. क्षणभर दोघांतिघांनीं तिचा भंग करून माझ्याभोंवतीं गर्दी केली आणि एकजणानें मला विचारलें, "तुम्ही राहतां त्या घराचं नांव् काय ?"

"कां बुवा ? येणार आहेस कीं काय ?"

"हो, संध्याकाळीं येणार आहें. काम आहे जरा."

"ये, जरूर ये," मी उत्तरलों आणि घराच्या खाणाखुणा सांगून घरीं आलों.

संध्याकाळीं ती गोष्ट माझ्या ध्यानांतहि नव्हती. किंबहुना, केव्हां ध्यानांत आली तर एकजण आपल्याकडे कांहीं कामासाठीं येणार आहे इतकीच जाणीव होई.

आणि म्हणूनच त्याची हांक ऐकून मीं दार उघडलें तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें. तो एकटा आला नव्हता, ते सारेजण आले होते. उंबऱ्याजवळ तो उभा होता; आणि मागच्या लहानशा जागेंत आठ-दहा जणांनीं गर्दी केली होती. कांहींतरी कट केल्याची भावना सर्वांच्या चेहऱ्यांवर दिसत होती. आपले झगे सांवरीत रोमन सिनेटर्सनीं सीझरवर गर्दी करतांच त्यानें त्यांचा कट ओळखला, त्याप्रमाणें मींहि यांचा कट ओळखला आणि सर्वांचें स्वागत केलें. छापखान्याच्या जगांतील तैमूरलंग आणि नादीरशहा म्हणून ज्यांना मी म्हणत असें त्यांनीं माझ्या छोट्याशा खोलीचा कबजा घेतला, कोपरान् कोपरा व्यापून टाकला.

पुढील पांच मिनिटें माझें लक्ष नाहीं असा सोइस्कर समज करून घेऊन ते परस्परांना खुणावीत होते, एकमेकांशीं कुजबुजत होते. अखेरीस त्यांच्या पुढाऱ्यानें एका पिशवींतून एक नारळ काढला, एक पेढ्यांचा पुडा काढला, हार काढला, गुच्छ काढला, आणि नंतर तोंडांतून शब्दहि काढले. या पहिल्या शब्दांचीच जणूं सर्वजण वाट पाहात होते. ते बाहेर येतांच सारेजण बोलूं लागले. त्यांनीं केलेल्या माझ्या सत्काराचा आणि मीं केलेला त्यांच्या स्वागताचा समारंभ पुढें पार पडला आणि नंतर ते निघून गेले. हंसत आणि थट्टाविनोद करीत मीं त्यांना निरोप दिला. पण नंतर खोलीच्या एकांतात माझें अंतः-करण आनंदानें, कृतज्ञतेनें, अनेक अबोध भावनांनीं भारावून गेलें. लोकांच्या चांगुलपणाचें आणि माझ्या समाधानाचें ओझें घटकाभर मला अगदीं असह्य झालें होतें.

आणि दुसरा अविस्मरणीय प्रसंग—तो केवळ माझ्याच जीवनांतील अविस्मरणीय प्रसंग नाहीं. सर्व भारताच्या जीवनांतील तो एक अविस्मरणीय प्रसंग आहे. सोन्याच्या अक्षरांत लिहिलेलें आपल्या देशांतील इतिहासाचें तें एक अलौकिक पान आहे. या पानाच्या तळाशीं,ज्याच्या जन्मामुळें या विराट् देशाचें भाग्य उदयास आलें आणि शतकानुशतकें पायदळीं पडलेल्या पाषाण-खंडांतून ज्वाळा झळाळूं लागल्या, ज्याचे आदेश ऐकून दुर्बळता प्रबळ झाली आणि प्रबळता अधोमुख झाली, आत्मिक सामर्थ्याच्या उच्चासनावर उभें राहून ज्यानें सर्व जगाला शांततेचा, स्वाभिमानाचा, स्नेहाचा संदेश दिला आणि रक्त-समुद्रांत बुडणाऱ्या मानवांना एका उज्ज्वल आशेचें दर्शन घड-विलें त्या नेत्याची—म. गांधींची – सही आहे.

१९४२ च्या काँग्रेस अधिवेशनांत, स्वातंत्र्याची मागणी संमत झाल्या-नंतर म. गांधींनीं केलेल्या भाषणाचा प्रसंग होता तो. काँग्रेसच्या मंडपांत असणाऱ्या भाग्यवानांत मी नव्हतों. बाहेरच्या मैदानावर बसून गांधींचें भाषण ऐकणाऱ्या अधिक भाग्यवानांत माझी जागा होती.

रात्रीं नऊ – दहाचा सुमार होता. सर्वत्र अथांग अंधार पसरलेला होता. सुमारें एक लक्ष माणसें मैदानावर पुतळ्यासारखीं शांतपणें बसलेलीं होतीं.

कोणीहि उठत नव्हतें, बोलत नव्हतें, जाण्याचा प्रयत्न करीत नव्हतें. आपल्या सर्व जीवनशक्तीचें श्रवणशक्तींत विसर्जन करून सारेजण मंडपाच्या दिशेनें येणाऱ्या प्रत्येक शब्दाचें ग्रहण करीत होते. ध्वनिक्षेपकांतून येणाऱ्या त्या संथ रेशमी शब्दांच्या धाग्यांनीं लाख लोकांच्या जीवनाभोंवतीं एक जाळें विणलें जात होतें. एकाच बंधनांत सारेजण बांधले जात होते. अगणित वैयक्तिक जीवनांचे प्रवाह एकत्रित होऊन त्यांचें एक अफाट सरोवर झालें होतें, आणि या सरोवराच्या पृष्ठावर गांधींची वाणी समीरणाप्रमाणें संचार करीत होती. समीरण म्हटलें, पण गांधींच्या शब्दांत केवळ समीरणाची शीतलता नव्हती, त्यांत दावानलाची दाहकताहि होती. मंडपाच्या पडद्याआड बसलेल्या त्या असामान्य जादूगारानें आम्हां लाख लोकांना मंत्रमुग्ध करून टाकलें होतें भोंवतालीं गर्द काळोख असूनहि आमचीं जीवनें घटकाभर प्रकाशित झालीं होतीं, तेजोमय झालीं होतीं. अंधारांत बसून आयुष्यभर ज्या क्षणाची वाट पाहावी असा क्षण होता तो !

● ● ●

# निर्वासित नीति....

कोणातरी मोठ्या माणसासबंधीं आमचें बोलणें चाललें होतें. आमचें बोलणें चाललें होतें असें म्हणण्यापेक्षां, तो गृहस्थ खुर्चीला व्यासपीठ समजून माझ्यासमोर भाषण करीत होता, असें म्हणणेंच वस्तुस्थितीस अधिक धरून होईल. मला बहुतांशीं अगोदरच मान्य असलेली त्या माणसाची थोरवी तो मला पुन्हां पुन्हां आळवून सांगत होता; आणि जें खरोखरी ऐकायची आवश्यकता नव्हती तें मी नेहमींप्रमाणें ऐकत बसलों होतों. हें मला ठाऊक आहे, हें सांगूं नका, असें बोलण्याचें अशिष्ट परन्तु प्रामाणिक धैर्य जर माणसें दाखवूं लागलीं तर जगांतील अर्धेअधिक बोलणें कमी होईल असें मला वाटतें. परन्तु असें धैर्य लोक सहसा दाखवीत नाहीत हें एका दृष्टीनें बरेंच आहे. कारण शब्द हा मानवी अहंकाराचा, त्यांतल्या त्यांत निरुपद्रवी असा आविष्कार आहे. जगांतलीं सारीं माणसें बोलणें बंद करून कांहींतरी करूं लागलीं तर मानवी समाजाच्या भवितव्यासंबंधीं निश्चित चिंताजनक परिस्थिति निर्माण होईल. !

सगळें सांगून झाल्यावर माझ्या मित्राचा आवाज आणि मुद्रेवरील आविर्भाव एकदम बदलला. सुनीतामध्यें बारा ओळी झाल्यानंतर तेराव्या ओळींत अकस्मात् कांहीं कलाटणी यावी त्याप्रमाणें एका अनपेक्षित उद्‌गारावर त्यानें आपल्या प्रवचनाचा समारोप केला.

‘ पण हें सारं वाया गेलं ! ’ हलक्या आवाजांत आणि हाताचीं पांचीं बोटें धिक्कारानें उडवीत तो म्हणाला. ‘ त्या माणसाची नीति चांगली नाहीं !

‘ म्हणजे काय ? ’

'ठाऊकच नाहीं का ? अितकं देशकार्य करणारा मनुष्य, जोग्यासारखा राहतो, वागतो, पण बायकांच्या बाबतींत बुवाजीचं वर्तन चांगलं नाहीं ! '

'बरं मग ? त्यामुळें त्याची सगळी थोरवी वितळून जाते कीं काय ? त्यानं केलेलं समाजकार्य, त्याचा त्याग, त्याचा प्रामाणिकपणा साऱ्या गोष्टी एकदम बरबाद झाल्या ? ' मीं विचारलें.

'अर्थात्च ! ' तो गृहस्थ आवेशानें अुद्गारला. 'लहानशा ज्योतीनं बर्फाचा मोठा थोरला काप वितळून जात नाहीं कां ? ज्याची नीति चांगली नाहीं, चारित्र्य निर्मळ नाहीं, अशा माणसाला समाजाचं नेतृत्व पत्करण्याचा काय अधिकार ? '

'तुम्ही म्हणतां हें खरं असेलच असं नाहीं. पण तें खरं आहे असं गृहीत धरलं तरी या माणसानें त्या स्त्रियांवर त्यांच्या अिच्छेविरुद्ध अत्याचार केले आहेत असं तुम्हाला म्हणायचं आहे का ? '

'कोणाच्याहि इच्छचा अनिच्छेचा हा प्रश्न नाहीं. हा प्रश्न आहे नीतीचा...'

यांत अनेक गफलती होत होत्या, आणि अशा बाबतींत नेहमींच होत असतात असें मला वाटतें. अनेकदां या बातम्या केवळ दंतकथांच्या स्वरूपाच्या म्हणजे संपूर्णत: निराधार असतात. ईश्वरानें दिलेल्या जिभच्या भांडवलावर अशा अफवांचे कारखाने घालणें हा शेंकडों लोकांचा आवडता उद्योग असतो. ज नेते असतात, सामाजिक जीवनाच्या आघाडीवर असतात, त्यांना हा उपद्रव विशेषच पोहोंचतो. गळे गहिंवरून आपण नेत्यांच्या नांवांचा जयजयकारहिं करतो आणि चारचौघांच्या खाजगी बैठकींत त्याच नांवांवर खराखोटा चिखल फासण्याचाहि प्रयत्न करतों. हें थोडेसें स्वाभाविक आहे यांत शंका नाहीं. जे सामान्य असतात त्यांना असामान्यांविषयीं वाटणाऱ्या अव्यक्त मत्सराचा हा एक सूक्ष्म आविर्भाव होय. कर्तृत्वानें अथवा बुद्धिमत्तेनें हीं माणसें पुढें गलेलीं असलीं, तरी चारित्र्याच्या बाबतींत तीं आपल्याच रांगेंतील किंबहुना आपल्याहि खालच्या रांगेंतील आहेत हें सिद्ध करण्याचा हा अभावित प्रयत्न असतो. अहंभाव ही माणसाच्या मनाची एक अत्यंत प्रभावी आणि उद्योगी अशी प्रवृत्ति आहे. स्वत:चें समाधान ती कोठें शोधील याचा मळींच नेम नाहीं.

एका लेखकानें या बाबतींत दिलेलें उदाहरण मला येथें आठवतें. बर्लिनमध्यें राहणारा एक गृहस्थ संध्याकाळीं येतां जातां शहरांतील मोठमोठ्या लोकांच्या पुतळ्यावर थुंकत असे. एऱ्व्ही हा गृहस्थ मोठा सालस व सभ्य होता. परन्तु पुतळ्यांवर थुंकण्याची उबळ कांहीं त्याला आवरतां येत नसे. शेवटीं त्याच्यावर खटला झाला आणि त्याला थोडीफार शिक्षाहि मिळाली. लेखकास हें प्रकरण अभ्यासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें वाटलें. त्यानें बारकाईनें तपास काढल्यावर त्याला समजलें कीं, या गहस्थाचे वडील आपल्या गांवाचे प्रतिष्ठित पुढारी होते, आपल्या मुलानेंहि राजकारणांत पडून नांवलौकिक मिळवावा अशी त्यांची इच्छा होती. मुलानेंहि आयुष्याच्या पूर्वार्धांत पुढारीपणाचा पाया घालण्याचे बरेच प्रयत्न केले. परन्तु ते यशस्वी झाले नाहींत. त्याला एका बँकेमध्य नोकरी पत्करावी लागली आणि त्या आकांक्षाहि तो पूणपणें विसरून गेला. पण त्या आकांक्षा मात्र त्याला विसरल्या नाहींत. त्याच्या संथ सुखी जीवनप्रवाहांतून त्या वरती डोकें काढीत आणि रस्त्यावरील पुतळ्यांचा त्याला अपमान करायला लावून सूड'चें समाधान मिळवीत. !

परन्तु याहून महत्वाची गोष्ट वेगळी आहे. ज्या मोठ्या माणसासंबंधीं आम्ही बोलत होतों त्याच्या नीतीसंबंधींचे– म्हणजे खरोखरी अनीतीसंबंधींचे सारे प्रवाद खरे आहेत असें मानलें तरी त्याच्या साऱ्या चांगुलपणाला त्यामुळें ग्रहण लागतें काय ?

नीतीसंबंधींच्या परंपरागत, आंधळ्या कल्पनांतून अशा प्रकारचे समज उत्पन्न होतात. नीति हीं दोन अक्षरें उच्चारलीं कीं स्त्री–पुरुषांच्या प्रणयव्यवहाराविषयींचे निर्बंधच आमच्या डोळ्यासमोर चटकन उभे राहतात. अनीतीचें जें पंचायतन आम्ही नेहमीं चित्ररूपानें भिंतीवर लटकून देतों, त्यांत मध्यभागीं व्यभिचार, एका बाजूला वेश्यागमन, दुसऱ्या बाजूला दारू आणि पायथ्याशीं गांजा व जुगार हीं मंडळीच बसलेली असतात. आमच्या नीति-अनीतीच्या कल्पना या कुंपणापलीकडे कधीं जाऊं शकत नाहींत. या गोष्टींच्या पलीकडे नीतीची व्याप्ति असते याची जाणीवच उरलेली नाहीं. मला स्वत:ला तर, मद्यपी, व्यभिचारी अथवा बाहेरख्याली माणसापेक्षां, या सर्व गोप्टींत अत्यंत सोवळा असलेला परन्तु आपल्या मित्रांचे व भागीदारांचे सफाईनें

गळे कापणारा, स्वतःच्या फायद्यासाठीं अितरांचीं जीवनें उध्वस्त करणारा मनुष्य अनेक पटीनीं अधिक अनीतिमान् वाटतो.

हा एक सावकार पहा. पहांटे उठून तो भूपाळ्या म्हणतो, स्नानसंध्यादि कर्में नियमितपणें करतो, भिकाऱ्यांना अन्नदान करतो, जेवतांना चित्राहुती घालतो, संध्याकाळीं यच्चयावत् देवळांतील देवांपुढें मस्तक टेकतो, सणासुदीला ब्राह्मणांना दक्षिणा देतो, क्षेत्रांत देवालयें बांधतो, संस्थांना देणग्या देण्यासहि तो मागेंपुढें पाहात नाहीं. परस्त्रीकडेच काय परन्तु स्वस्त्रीकडेसुद्धा तो कधीं वाकड्या नजरेनें पाहात नाहीं; मद्यासारखें पेटतें पाणी राहो, पण पाण्यासारखा चहासुद्धा तो कधीं पीत नाहीं. हा आमच्या समाजांतील आदर्श नीतिमान् झाला ! परन्तु त्याच्या हातापायाकडे जरा बारकाईनें बघा. अनेक अभागी जनांचीं आंतडीं त्याच्या पायाला लटकलेलीं दिसतील. अनेक स्त्री-पुरुषांचें रक्त त्याच्या वोटांवरून ओघळतांना आढळेल. याच्या साध्यासुध्या पांढऱ्या वेषाखालीं राक्षसाचें अंतःकरण दडलेलें आहे. आपली तिजोरी भरण्यासाठीं यानें कित्येक जीवनांचीं सरणें रचलेलीं आहेत, अनेकांना मरणाहून असह्य अशा यातना भोगावयास लावल्या आहेत. अनेक चुलींमधील जाळ यानें आपला बर्फासारखा शीतल पंजा टाकून विझविला आहे, अनेक घरांतील माणसें यानें कुत्र्यांप्रमाणें बाहेर ओढून रस्त्यावर आणलीं आहेत. स्वतःचा धन्दा करतांना त्यानें धंदेवाईक प्रामाणिकपणाहि पाळलेला नाहीं. प्रामाणिकपणा आणि माणुसकी हीं पायामध्यें चिणूनच त्यानें आपली ही चार मजली हवेली उभारली आहे. हा आमचा नीतीचा आदर्श ! अनेक संसारांची राख कपाळाला लावून बसलेला, असहाय लोकांच्या अडचणीचें अमानुष लालसेनें आपल्या भांडवलांत रूपांतर करणारा, हा धवल वेषधारी मनुष्य आमच्या रूढ नीतिमत्तेचा मूर्तिमन्त पुतळा आहे. कारण तो कोठल्याहि स्त्रीकडे लालसेनें पाहत नाहीं त्याला सुपारीच्या खांडाचेंहि व्यसन नाहीं. कारण तो सकाळीं उठून भूपाळ्या म्हणतो व सारे धार्मिक आचार यथासांग पार पाडतो. तो देवळें बांधून पुण्याची घाऊक खरेदी करतो आणि कीर्ति विकत घेण्यासाठीं शिक्षण संस्थांना मोठ्यामोठ्या रकमा दान करतो खरोखर, ही नीति म्हणज अनीतीची परिसीमा आहे !

माझ्या माहितींत अशीं कांहीं माणसें आहेत कीं कोठल्याहि व्यसनापासून त्यांनीं स्वतःस अलिप्त ठेवलेलें नाहीं. लोक त्यांना अनीतिमान् समजलात आणि त्यांच्यापासून दोन हात दूरहि राहतात. परंतु या व्यसनी लोकांतील कांहीं जणांचीं अन्तःकरणें अितकीं थोर आहेत कीं, त्यांचा तिरस्कार करणाऱ्या पांचपन्नास लोकांची एकत्र मोळी करून त्यांच्या पायावर टाकली तरी त्यांत यांचा गौरव होणार नाहीं अथवा त्यांचा अपमान होणार नाहीं! अनेक शुद्ध माणसांपेक्षां या 'अशुद्ध' माणसांतील माणुसकी कित्येकदां फार श्रेष्ठ दर्जाची असते. परन्तु वरती सांगितलेला सावकार अशा माणसाच्या घराची पायरीसुद्धा चढायचा नाहीं. आपल्या सोज्वळ मुद्रेवर तिरस्काराची भावना दर्शवीत तो म्हणेल "तो माणूस ना? भलतंच, फार वाईट आहे तो."

नीतीसंबंधींच्या या समजुती केवळ संकुचितच नाहींत तर विपर्यस्तहि आहेत. स्त्रीपुरुषसंबंधाच्या आणि व्यसनांच्या खुंटाला बांधलेली ही नीति समाजाची हानीच करीत नाहीं का? खोटा माल बाजार काबीज करून बसला कीं खऱ्या मालाची ओळखहि पटेनाशी होते. निर्धनांना गिळणारे सावकार, गिऱ्हाइकांना हातोहात फसविणारे व्यापारी, प्रामाणिकपणाच्या शवावर आपल्या प्रतिष्ठेचा संसार मांडणारे पुढारी, मजुरांना पिळून धनांच्या राशी रचणारे गिरणीमालक किंवा हातीं असलेल्या सत्तेचा स्वार्थासाठीं लिलाव करणारे अधिकारी, हेच लोक खरोखर अनीतीच्या राज्यांतील पहिल्या दर्जाचे मानकरी होत. कारण नीति ही अखेर माणुसकीवर, अनाक्रमणावर आणि समानतेवर आधारलेली आहे; कोठल्याहि कृत्रिम वा काल्पनिक बंधनावरती नव्हे. आम्ही जिचें पूजन करतों ती नीति विपरीत आहे, समाजांतील अन्यायांस व आक्रमणांस आशीर्वाद देणारी आहे. खरी नीति प्रचलित समाजरचनेपासून दूर गेलेली आहे, निर्वासित झाली आहे.

• • •

# श्रीयुत आकाश....

" तुम्ही मध्यरात्रींदेखील फिरायला जातां वाटतं ? काल आम्ही सिनेमाहून परत आलों तेव्हां - "

" होय, जातों केव्हां केव्हां – '

" एकटेच ? "

" नाहीं, कुणीतरी असतं बरोबर ! "

" काल तर कुणीच दिसलं नाहीं ! "

" दिसलं नसेल पण होतं कोणीतरी - "

कोण होतं असा प्रश्न त्याच्या ओठांतून बाहेर डोकं काढण्याचा प्रयत्न करीत असलेला मला दिसला. परंतु त्यानें तो आवरला. रस्त्यांतील अनुचित देखावा दिसू नये म्हणून सभ्य माणसं खिडकी बंद करून आंत होतात, त्याप्रमाणें त्याचा तो प्रश्न ओठांची नुसती उघडझाप करून आंत माघारीं गेला. त्याला वाटलं, या प्रश्नाचं उत्तर कांहीं चांगलं, सदभिरुचीला व सभ्यतेला योग्य असं यावयाचं नाहीं. तेव्हां तो विचारून दुसऱ्यावर बोलण्याचं आणि स्वतःवर ऐकण्याचं संकट ओढवा कशाला ? प्रश्न विचारायला आतुर असलेल्या ओठांचं केवळ माफक हास्यानं सांत्वन करून तो गृहस्थ आपल्या मार्गानं निघून गेला.

माझं फिरणं ही थोडीशी रहस्यमय घटना आहे हें मात्र खरं. त्या संबंधींच्या प्रश्नांना मी खरीं उत्तरं पुष्कळदां देऊं शकत नाहीं. कारण खरीं उत्तरं कित्येकदां कांहीं नसतातच. निदान विचारणाऱ्यांना समजण्यासारखीं.

त्याचं असं होतं. दुपारीं दोन अडीचच्या उन्हामध्ये एखाद्या रखरखीत रस्त्यावर कोणी तरी गृहस्थ आपल्याला पाहून सायकलवरून खालीं उतरतो. आपलं लक्ष समोरच्या सडकेकडे, जवळपासच्या एखाद्या झाडाकडे किंवा पलीकडच्या मैदानावर रवंथ करीत बसलेल्या गोमातेकडे आहे अस दाखवायचा आपण यत्न करतों. परंतु एवढ्यानं तें दोस्तराष्ट्र उमगत नाहीं. रस्त्यावर भेटलेला परिचित माणूस कुठे जात आहे, कशासाठीं जात आहे, जथें जात आहे तेथून परत केव्हां येणार आहे,इत्यादि गोष्टी माहीत करून घेणं हें आपलं एक सामाजिक कर्तव्य आहे अशी त्याची श्रद्धा असते. तो सायकल आपल्या पुढें आडवी घालतो व नमस्कार करून प्रेमळपणानं विचारतो—

" काय, इकडे कुणीकडे ? "

देशादेशांतील सरहद्दी ज्याप्रमाणें नियमित व नियंत्रित असतात, त्याप्रमाणें शहरांतील वा शहरावाहेरील विविध विभागांची वाटणीहि तेथील नागरिकांमध्यें निश्चितपणानं झालेली असते, अशी या मंडळीची समजूत. बुधवार पेठेंतील रहिवासी गुरुवार पेठेंत दिसणं हें मोठंच अघटित. ज्यानं त्यानं आपल्या ठरलेल्या रस्त्यानं संचार करावा हें वरं. परंतु आपण त्या पंथांतील नसल्यानं भलत्याच रस्त्याला आलेले असतों. या अपराधाच्या जाणिवेनं आपला चेहरा बहुधा पडतो व गोंधळलेल्या स्वरांत आपण उत्तरतों—

" कांहीं नाहीं. सहज चाललों होतों. "

सहज चाललों होतों ! माणसं कधीं सहज चालतात काय ? जिथें कार्य आहे, तेथें कारणहि असलंच पाहिजे. दोस्त राष्ट्र अधिक प्रेमळपणानं व सहानुभूतीनं विचारतं—

" सहज ? या वेळीं ? "

आपल्या ध्यानांत येतं कीं सहज फिरायला या गृहस्थाची तशी तत्त्वतः हरकत नाहीं. वांधा आहे तो वेळेचा. सहज फिरण्याच्या वेळा मुक्रर होऊन गेलेल्या आहेत. त्यांत फेरफार करायचा आपल्याला अधिकार नाहीं. गुन्हेगारीची आपली जाणीव द्विगुणित होते. खरीं उत्तरं चालत नाहींत असं पाहून आपण खोटयाचा आश्रय घेतों. आपण चाचरत म्हणतों—

" नाहीं, - म्हणजे - बाजारांत जातोंय् जरा ! "

खोटं बोलणं सोपं नसतं. त्यासाठीं पूर्वतयारी करावी लागते. अनेक अवधानं सांभाळावीं लागतात. तो गृहस्थ आश्चर्यचकित होतो आणि उद्गारतो-

" बाजार ? या बाजूला कुठला आलाय् बाजार ? हा रस्ता तर कोर्टा-कडे जातो- "

शहाण्या माणसानं कोर्टाची पायरी तर चढूं नयेच, पण कोर्टाच्या रस्त्यालाहि जाऊं नये हें आपल्या ध्यानांत येतें. परंतु आतां माघार घेणं शक्य नसतं. एका असत्याच्या संरक्षणासाठीं अनेक असत्यांची चिरेबंदी उभी करावी लागते. असत्याच्या व्यवहारामध्यें आपण मोठे पट्टीचे विशारद आहोंत अशा डौलानं आपण उत्तरतों,

" नाहीं, म्हणजे – आधीं कोर्टांतच जायचं आहे. तिथें एका वकिलाला भेटायचं आहे. त्यांना भेटून नंतर बाजारांत ! "

आपण वाङ्मयाच्या व्यवसायांत आहोंत हें त्याला ठाऊक असतें. कवि काव्य, लेखक, वगैरेसंबंधींच्या चित्रविचित्र हकीगती त्यानं ऐकलेल्या असतात. तो अपार स्निग्धतेनं व करुणेनं एकदा आपल्याकडे नजर टाकतो व नंतर म्हणतो–

" अहो, आज रविवार आहे ! कोर्ट बंद आज ! तुम्ही लोक म्हणज अगदीं बंधनाच्या पलीकडे ! ( सहास्य ) चला आतां माघारीं. मलाहि बाजारा–कडेच जायचं आहे. तेवढाच तुमच्या संगतींत काव्यशास्त्रविनोद ! "

आपण मनांतल्या मनांत कपाळाला हात लावतों आणि या गृहस्थाची काव्यशास्त्रविनोदाची हौस कशी भागवावी याची चिंता करीत त्याच्याबरोबर उलट दिशेनं चालूं लागतों. कोर्टाच्या पलीकडे असलेल्या टेकडीवरून चक्कर मारून येण्याचा आपला बेत, काडी लावलेल्या कापराप्रमाणें क्षणभरांत नाहींसा होतो.

•

मला मध्यरात्रीं गांवाबाहेर पाहणारा तो गृहस्थ–प्रारंभीं सांगितलेला–या माणसाची कांहींतरी अंधेरी भानगड आहे अशा विचारानें मंदस्मित करीत

निघून गेला. परंतु खरोखर, मीं न दिलेलं उत्तर, तो समजला तशा प्रकारचं नव्हतं. मी जें सांगणार होतों ( पण सांगितलं नाहीं ) तें फार सोज्वळ, कोणीहि ऐकायला हरकत नाहीं असं होतं. रात्रीच्या आश्रयानंच जमणारी ती एक भानगड होती हें खरं. परंतु सामाजिक नीतिमत्तेची परीटघडी कोठें विस्कटेल असं त्यांत, त्यावेळीं तरी कांहींहि नव्हतं. 'कोणाच्या बरोबर तुम्ही फिरायला गेलां होतां,' असा त्याचा प्रश्न होता. मला सांगायचं होतं तें असं कीं, 'मी आकाशाच्या संगतींत फिरायला गेलों होतों ! '

होय, आकाशाच्या संगतींत ! हें उत्तर थोडसं चमत्कारिक आहे हें मला ठाऊक आहे. त्यामुळेंच त्या सद्‌गृहस्थास तें मीं सांगितलं नाहीं. तें ऐकून त्याचं मंद स्मित आणिकच मंद झालं असतं. घरीं जाऊन तो बायकोला म्हणाला असता, "तो आपला हा– भलताच थापाड्या –" इत्यादि. त्या माणसाला मी चांगला ओळखतों. व्यवहाराच्या धोपट मार्गानं जाणारा तो सीधा प्रवासी आहे. ' संसारामधि ऐसा आपुला उगाच भटकत फिरूं नको ' हें सुभाषित अपौरुषेय वेदवाक्याप्रमाणें तो प्रमाण मानतो आणि इतरांनीहि तें तसं मानावं अशी त्याची अपेक्षा असते. त्याच्या जीवनांतील सर्वांत रोमहर्षक प्रसंग म्हणजे बाजारांतील भाजीचा भाव कमी होणं वा जास्त होणं. त्याची सगळी सकाळ या विषयाच्या चिंतेंत अथवा चर्चेंत जाते. याच परंपरेच्या घाटांतून पुढें उर्वरित दिवसाचा प्रवाह जायचा. अर्थात् या गोष्टींना माझा कांहीं विरोध आहे, किंवा त्यासंबंधीं मला अनास्था आहे असं नाहीं. माणसाचा जन्म पृथ्वीवरच्या मातींत आहे. त्या मातीचा टिळा त्यानं कपाळावर लावायलाच हवा. परंतु त्याचंहि चोवीस तासाचं बंधन होऊं नये. अथवा होऊं नये अन् व्हावं असं म्हणण्यांतहि फारसा अर्थ नाहीं. कांहीं माणसं उंच असतात, कांहीं बुटकीं असतात; कांहीं स्थूल असतात, कांहीं सडपातळ असतात. त्याचप्रमाणें कित्येकांना स्वभावत: हें बंधन मानवतं आणि कित्येकांना मानवत नाहीं. यांत कोठल्याहि बाजूला अभिनिवेश वा अभिमान असायचं कारण नाहीं. एका पक्षांतील माणसानं दुसऱ्या गोटांत आपली वाहवा होईल अशी अपेक्षा करूं नये एवढंच.

हें सारं खरं असलं तरी आकाशाच्या संगतींत फिरायला जाण्याची कल्पना सकृत्‌दर्शनी चमत्कारिक वाटते यांत मात्र शंका नाहीं. कुठें आकाश

आणि कुठें माणूस! " जो आम्हावरी रुसला—त्याचा आकाशाशीं अबोला " असं तुकारामाचं एक वचन आहे. तुकारामाच्या साहित्यांतील ही एक अत्यंत सुंदर आणि संस्मरणीय ओळ आहे असं मला वाटतं. जें त्याला सांगायचं आहे तें फार समर्पक रीतीनं येथें व्यक्त झालेलं आहे. क्षणभर डोळे मिटून विचार केला म्हणजे आकाशाशीं अबोला धरण्याची, त्याच्यावर रुसण्यारागावण्याची कल्पना किती मजेदार आहे याचा प्रत्यय येतो. केवढं तें आकाश, आणि त्याच्याशीं अबोला धरणारा मनुष्य केवढा ! प्रेम करणाऱ्यामध्यें कांहीं समानता हवी त्याप्रमाणें राग वा वैर करणाऱ्यांमध्येंहि हवी. अशी कांहीं समानता आकाशांत व माणसांत अंशमात्र तरी असूं शकते काय ? एखाद्या मुंगीनं हिमालयाच्या सर्वोच्च शिखरापुढें जाऊन रागारागानं डोकं आदळलं तर तेंदेखील यापेक्षां कमी हास्यास्पद ठरेल. साऱ्या विश्वाचा आपल्या महोदरांत अंतर्भाव करणाऱ्या विराट् निराकार आकाशासमोर हें साडेतीन हात उंचीचं बाहुलं उभं राहणार आणि म्हणणार, ' मी तुझ्याशीं बोलत नाहीं ! ' हें जितकं चमत्कारिक, तितकंच ' मी तुझ्याबरोबर फिरायला येतों ' हें म्हणणंहि चमत्कारिक नाहीं का ! आकाशाला आपल्या पातळीवर ओढून त्याला ' श्रीयुत आकाश ' बनविण्याचा हा उद्योग नाहीं का ?

पण चमत्कारिक असलं तरी तें खरं आहे. मित्रांच्या अथवा मैत्रिणींच्या बरोबर फिरण्याचा आनंद मला अमान्य नाहीं, अथवा अज्ञातहि नाहीं. परंतु आकाशाच्या संगतींत फिरण्यांत जो आनंद आहे, उन्माद आहे आणि प्रसंग पडेल तेव्हां दिलासाहि आहे, तो अन्यत्र कधींच लाभायचा नाहीं असं मला वाटतं. माझ्यावरती उपकार करण्यासाठीं आकाश लहान होऊन माझ्या हातांत हात घालतं असं अर्थात् मी म्हणणार नाहीं, म्हटलं तर तें कोणी ऐकणार नाहीं. मी आकाशाच्या संगतींत फिरायला जातों तेव्हां आकाश हें आकाशच असतं आणि मीहि मीच असतों. या विषमतेंतच आमच्या परस्पर प्रेमाचं रहस्य आहे.

आमच्या ? होय, आकाशाचंहि माझ्यावरती प्रेम आहे असं मला वाटतं. त्या उदार दैवताच्या समोर कोठलाहि भेदभाव अथवा पक्तिप्रपंच नाहीं. आपल्या हृदयराणीच्या पायांवर आसवांचा आणि कानांवर प्रियवचनांचा

अभिषेक धरणाऱ्या प्रेमिकाला पुष्कळदां अखेरीं 'वुझावूं मी किती तूतें– करावी मी किती हाजी' असं आर्त आक्रंदन करावं लागतं. वुल्झीसारख्या राजनिष्ठ सचिवाला 'या राजाची सेवा करण्याऐवजीं मी ईश्वराची सेवा केली असती तर ती अधिक कारणीं लागली असती' असे करुणोद्गार आयुष्याच्या अखेरीं काढावे लागले. देवळांतील संगमरवरी मूर्तींच्या साक्षीनं किती जिवाचं बलिदान झालं असेल याचा तर हिशेबच नाहीं. आकाशाजवळ अशी निर्घृणता नाहीं. त्याचा विस्तार जेवढा मोठा, तेवढंच त्याचं हृदयहि मोठं आहे. जो जवळ येईल त्याला तें हृदयाशीं धरतं. सूर्यचंद्राचीं कंकणं घातलेल्या आपल्या निळ्या हातांनीं त्याला तें कुरवाळतं. उदयास्ताच्या वेळीं परिधान केलेल्या भरजरी, रेशमी वस्त्रानं त्याच्या डोळ्यांतील आसवं टिपून काढतं. 'घनतमावर राज्य करणाऱ्या' शुक्राचं दर्शन देऊन त्याच्या खिन्न, उदासीन मनाला संजीवनी देतं. कांहीं कारणानं अथवा कारणाशिवायहि आपलं अंतःकरण विषण्ण झालं, विचारशक्ति वधिर झाली, अथवा जीवन हें शरशय्येप्रमाणें चहूंबाजूंनीं खुपूं लागलं म्हणजे आकाशाइतका उदार, इतका निश्चित आणि इतका प्रभावी सांत्वनकर्ता आपल्याला अन्यत्र आढळत नाहीं. नक्षत्रांच्या नेत्रानं आपल्याकडे पाहणारं हें निळं दैवत हात उंच करून आपल्याला बाहेर बोलावतं. आपण एखाद्या निर्जन मैदानावर जातों आणि त्याच्या कुशींत माथं ठेवून पडतों. आकाशांत अनादि कालापासून जी अपार, गहन शांतता भरली आहे तिचे कांहीं वत्सल थेंब झिरपत आपल्यापर्यन्त येतात आणि आपलं चित्तहि शांत होतं.

परंतु असं खास नव्हे कीं, आपल्या अंतःकरणांतील विषण्णतेचीं व व्यथांचीं काळीं गाठोडीं घऊनच आपल्याला आकाशाकडे जातां येतं अथवा जायचं असतं. आकाशाच्या ठिकाणीं शांति आहे, वत्सलता आहे, त्याप्रमाणें आनंद, आल्हाद व उन्माद याहि भावना आहेत. कल्पवृक्षाच्या तळाशीं बसल्यावर हवी ती वस्तु लाभते त्याप्रमाणें आकाशाच्या किमयागारांत आपल्या मनाला अनुकूल अशा कोणत्याहि भावनेचा रस माणसाला शोधून मिळवितां येतो. सूर्यास्ताच्या वेळीं क्षितिजावर चाललेला रंगविलास पाहावा. भव्य सौंदर्याची ती झगझगीत पेठ पाहून पाहणाऱ्याचे डोळे दिपूनच जातात. क्षितिजावर इतस्ततः पसरलेल्या मखमली मेघांवर सोनरी, कुसुंबी, केशरी, लाल

व जांभळ्या रंगाचे दैदीप्यमान् स्रोत एकामागून एक सारखे पडत असतात. तें दृश्य पाहून पश्चिमेचं क्षितिज म्हणजे ग्रह-ताऱ्यांच्या जगांतील रंगभूमीच असावी अशी कल्पना मनांत येते. पाहतां पाहतां पडद्यांची मखमल बाजूला ओढली जाते आणि शुक्राची चांदणी एखाद्या लावण्यवान् अभिसारिके-प्रमाणें मोठ्या डौलानं रंगमंचावर प्रवेश करते. केव्हां असाहि भास होतो कीं कोणी अदृश्य पुजारी विश्वांतील ब्रह्मतत्त्वाची प्रदोषपूजा करायला बसले असून ते हीं विविधरंगांचीं अभ्रपुष्पें त्या अनंताच्या पायावर वाहात आहेत. हें पुष्पार्पण झाल्यावर शुक्राची ती दिमाखदार निरांजनी पेटवली जाते आणि नंतर अनंताच्या आरतीला प्रारंभ होतो ! उदयास्ताच्या वेळचें हें रंगवैभव इतकं ऐश्वर्यशाली आणि आकर्षक असतं कीं त्या वेळीं वाटचाल करतांना असंच सारखं पुढें चालत जावं आणि क्षितिजावरील त्या सौंदर्याच्या व निरामय आनंदाच्या उद्रेकांत मिळून जावं असा खुळा विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं.

असं असलं तरी आकाशाचं आकाशत्व खरोखरी रात्रींच प्रकट होतं. सूर्याचा प्रकाश प्रखर असतो तोंवर तर त्याचं अस्तित्व जाणवतच नाहीं. भट्टींत टाकलेलं लोखंड शेवटीं स्वतःच अग्निमय होऊन धगधगूं लागतं त्याप्रमाणें सकाळ दुपारचं आकाश सूर्याच्या तेजामुळें तेजोमय होऊन जातं, त्यांत विलीन होऊन जातं. रात्रीं हा देखावा पार बदलून जातो. आकाशाच्या नीलपत्रावर विधात्यानं हिऱ्यामोत्यांच्या अक्षरांनीं लिहिलेलं विराट् काव्य तेथें प्रकट होतं आणि तें वाचण्याचा यत्न करणाऱ्या माणसाचं अंतःकरण विविध विचारांनीं व कल्पनांनीं अगदीं भारावून जातं.

कल्पना ही माणसाजवळ असलेली एक जादूची सतरंजी आहे. या उडत्या सतरंजीवर बसून प्रत्यक्षाच्या पलीकडे असलेल्या अनेक प्रदेशांत तो सहज संचार करतो. तिला ना स्थळाचं बंधन, ना काळाचं. परंतु ही सर्वगामी आणि सामर्थ्यवान् कल्पनादेखील आकाशाच्या विस्ताराचा शोध घेऊं लागल्या-वर भयचकित होऊन जागच्याजागीं उभी राहते, थरथरूं लागते. काळाच्या, अंतराच्या अथवा विस्ताराच्या ज्या कल्पना आमच्याजवळ परंपरेनं जंमलेल्या आहेत त्यांच्या आवाक्यांत आकाश येतच नाहीं. आम्हा माणसांना अपार

असलेली पृथ्वी, पृथ्वीच्या मानानं अपार असलेलं सूर्यमंडळ, वाळवंटांतील रज:कणाप्रमाणें हें सूर्यमंडल ज्यांत पडलेलं आहे ती आमची आकाशगंगा, आणि अशा असंख्य आकाशगंगा धारण करणारं हें सर्व विश्वब्रह्म ! या विस्ताराच्या जाणिवेनंच माणसाच्या कल्पनाशक्तीला भोवळ येईल.

एखाद्या टेकडीवर वा मैदानावर बसून आपण रात्रीच्या वेळीं आकाशाकडे नजर लावली कीं किती तरी प्रश्न मनामध्यें गर्दी करतात ! विश्वाचा हा असीम, अनंत पसारा म्हणजे खरोखर काय आहे ? त्याच्या प्रारंभस्थानीं कोणतं तत्त्व दडलें आहे ? हा विराट् रथ कोणत्या दिशेनं, कोणत्या उद्दिष्टाकडे चाललेला आहे ? या प्रचंड व्यापाशीं माणसचं कोणतं नातं आहे ? वटवृक्षावरील फळांत निर्माण झालेल्या कृमींप्रमाणें तो क:पदार्थ व अगांतुक आहे कीं त्याच्या जीवनाला कांहीं विशेष हेतु आहे ? या चिमुकल्या ग्रहावरील शास्त्रज्ञ खगोलशास्त्राचे सिद्धांत शोधून काढतील, मोठमोठ्या दुर्विणींतून नक्षत्रांचे वेध घतील, कांहीं काळानंतर याहिपुढें जाऊन कदाचित् मंगळावर वा शुक्रावर पर्यटनहि करूं लागतील. तरीहि या गहन प्रश्नांचीं निश्चित उत्तरं त्यांना कधीं मिळतील का ? माशाला आपलं जीवन सुखी करण्यासाठीं पाण्यावाहेर जाण्याची आवश्यकता नसते, त्याप्रमाणें मानवी संसार सुखी व समृद्ध होण्यासाठीं या प्रश्नांचीं उत्तरं आवश्यक नसतील, किंबहुना नाहींतच. परंतु पृथ्वीवरच्या प्रतिभा आकाशांत पांगळ्या पडतात हें खरं. आपण अस्तिक असूं वा नास्तिक असूं, आकाशाच्या पायापाशीं बसल्यावर कोठल्या तरी अबोध भक्तिभावानं आपलं मन भरून जातं आणि हात छातीवर जुळून येतात.

नक्षत्रांचं वर्णन देवांचीं मंदिरं म्हणून एका लेखकानं केलं आहे. ज्या देवांचं चरित्र आपण पुराणांतून वाचतों, कथाकीर्तनांतून ऐकतों, त्या सहस्रावधि देवांचीं हीं मंदिरें आहेत असं म्हटल्यास हरकत नाहीं. हे पुराणांतरींचे देव पुष्कळसे माणसासारखेच आहेत. माणसांचे गुणदुर्गुण त्यांच्या ठिकाणीं भरपूर असतात. माणसाच्या विकारवासनादि वृत्ति त्यांच्याहि जीवनांत नवरसात्मक खेळ करीत असतात. माणसांसारखे त्यांचेहि पाय चिखलांत रुतलेले आहेत असं वाटतं. त्यांचं देवपण आहे तें खरोखर त्यांच्या अमानुष सामर्थ्यामध्यें व अमरतेमध्यें. देवांना अमर हें नांव देणाऱ्यांनीं त्यांचं अमरता

हें लक्षणच विशेष मानलेलं असावं. कविकल्पनेनं या देवांना ग्रहताऱ्यांचीं घरं बहाल केलीं हें योग्यच आहे. शहराबाहेरच्या माळावर श्रीमतांचीं मोकळी-चाकळीं व डौलदार निवासस्थानं असावींत, त्याप्रमाणें पृथ्वीपासून खूप दूरवर हे देव आपलीं नीलधवल मंदिरें बांधून वास्तव्य करीत आहेत ही कल्पना कांहीं वावगी नाहीं. परंतु या देवांच्या पलीकडे जो देव आहे, देव या संज्ञेनं नव्हे तर परमेश्वर या संज्ञेनंच ज्याच्या स्वरूपाची कल्पना यथार्थतेनं व्यक्त होते त्याच्यासाठीं मात्र नक्षत्रांचीं मंदिरं थोटकीं पडतील. त्या देवासाठीं— आपण तो मानला तर-अनादि, अनंत व असीम अशा आकाशाचंच घर कल्पावं लागेल.

परंतु हेंहि आकाशाचं नित्यस्वरूप नव्हे. अशा गंभीर वा उग्र स्वरूपांत तें सतत आपल्यासमोर उभं राहतं असं मुळींच नाहीं. एखाद्या वर्षाकालीन रात्रीं, मुलांना घाबरविण्यासाठीं डोक्यावर घुंगट घेऊन बसलेल्या बागुलबोवाप्रमाणें तें विनोदी वाटतं; तर अश्विनाच्या चांदण्या रात्रीं तें पुरुरव्याला भेटावयास आलेल्या उर्वशीप्रमाणें अद्वितीय सौंदर्यानं प्रफुल्ल व सुगंधित झालं आहे असा भास होतो. आजचं आकाश उद्या नाहीं आणि उद्याचं परवा नाहीं. सौंदर्याच्या व भावनेच्या नवीन नवीन पाकळ्या त्या नंदनवनांत सतत फुलत असतात. आणि म्हणूनच आकाशाच्या संगतींत फिरावयास जाणं हा अेक अपार आनंदाचा सोहळा आहे.

● ● ●

# रद्दींतील रत्नें....

मध्यरात्रीनंतरच्या अेकांतांत मी असा दिवा जाळीत मेजाशीं बसलों आणि माझी नजर सहज खाली असलेल्या रद्दी कागदांच्या टोपलीकडे गेली कीं अद्यापहि मला त्या तीन मांजरांच्या पिलांची आठवण होते. मांजर या प्राण्याविषयीं माझ्या अंत:करणांत प्रेमभावना दुथडी भरुन वाहात असते असं मुळींच नाहीं. मांजरावर प्रेम करणें खरोखरी कठिणच आहे. जगांत असूनहि जगाच्या बाहेर राहणाऱ्या स्थितप्रज्ञाप्रमाणें, या प्राण्याची वृत्ति इतकी तटस्थ व तुटकपणाची असते कीं अगदीं नि:स्वार्थ आणि आदर्श प्रेमाचे प्रयोग फार तर त्याच्यावर करतां येतील. मांजरांचा संचार दिवाणखान्यापासून स्वयंपाकघरापर्यंत सर्वत्र असतो. परंतु अेखाद्या घरीं शंभर फेऱ्या मारूनहि त्या घराविषयीं अथवा त्यांतील रहिवाशांसंबंधीं त्याच्या मनांत कांहीं आत्मीयता उत्पन्न झाली आहे असें दिसत नाहीं. अेकशेंअेकाव्या फेरींत देखील तें झडती घ्यायला आलेल्या फौजदाराप्रमाणें साशंक, शोधक आणि निष्प्रेम नजरेनें घरांत हिंडत असतें !

रात्रीं अपरात्रींच्या नीरवतेंत आणि निर्जनांत रस्त्यावर भटकणारीं मांजरें पाहून तर कसेसेंच वाटतें. सर्वत्र सामसूम झाल्यावर तुम्ही खिडकी उघडून पाहिलें आणि बाहेरच्या अंधुक चांदण्यांत, कोणताहि आवाज न करतां, अेका कौलारावरून दुसऱ्या कौलारावर प्रवास करणारें मांजर तुमच्या दृष्टीस पडलें, तर कोठल्या तरी पिशाचसृष्टीचा हा प्रतिनिधी कांहीं अशुभ, अमंगल कार्य करण्यासाठी जगांत अवतीर्ण झाला आहे अशी कल्पना तुमच्या मनांत आल्याशिवाय राहायची नाहीं. पण मोठीं मांजरें वेगळीं आणि छोटीं मांजरें वेगळीं. त्यांच्यांतील तफावत केवळ कांहीं वर्षांची नसते तर जमीन

अस्मानाची असते. मी सांगत होतों तें अशा छोट्या मांजरांच्या पिलांबद्दल.

कित्येक वर्षांपूर्वीची हकीकत आहे ही –

अशीच मध्यरात्र होऊन गेली होती. नव्हे, उत्तररात्रीसहि प्रारंभ होऊन गेला होता. मी एका वृत्तपत्राच्या कचेरींत, छतांतून लोंबणाऱ्या अेकाकी दिव्याच्या संगतींत बसलों होतों. मेजावर असलेल्या टेलीफोनचा रिसीव्हर मीं उचलला आणि रॉयटरच्या कचेरीकडे चौकशी केली, "कांहीं नवीन बातमी आली आहे का ?"

रॉयटरच्या कचेरींतील त्या जागत्या जिवानें प्रथमतः अेक मोठी जांभई आणि नंतर नकार दिला. दैनिक वृत्तपत्राच्या कार्यालयांत रात्रींच्या वेळीं, चहूंकडून येणाऱ्या वार्ता हस्ताच्या पावसासारख्या धूमधडाक्यानें बरसत असतात. बातम्या निर्माण करणारे लोक त्या निर्माण करुन झोपीं गेलेले असतात, आणि त्या छापण्याचें कार्य जाग्या राहिलेल्या लोकांना करावें लागतें. त्यांतहि तें दिवस लढाईचे होते. तीन खंडांत चाललेल्या घनघोर संग्रामाचे रंगीबेरंगी वृत्तान्त, ब्राउन पेपरनें आच्छादिलेल्या माझ्या त्या अैसपैस टेबलावर येऊन पडत होते. ते वीराग्रणी तिकडे जितक्या आवेशानें आपल्या शत्रूंवर तुटून पडत होते, तितक्याच आवेशानें व गतीनें मी समोर साचणाऱ्या त्या पातळ झुळझुळीत कागदांचा समाचार घेत होतों. लिहिण्याचा वेग वाढूं लागला कीं, लेखणीला स्वतःची स्वतंत्र अशी गति प्राप्त होते आणि आपलें नियंत्रण न जुमानतां, उतारावर घरंगळणाऱ्या चक्राप्रमाणें ती पुढें धावूं लागते. शेवटीं सर्व कागदांचा फन्ना उडाला आणि रक्तानें माखलेली तरवार हातांत घेऊन शिपायानें नव्या शत्रूचा शोध घ्यावा,त्याप्रमाणें मीं माझें पेन तसेंच उघडें ठेवून रॉयटरच्या कचेरींत वरीलप्रमाणें विचारणा केली. तेथून नकार येतांच माझा आतांपर्यंतचा सर्व आवेश अकदम विझून गेला. लिहिलेले कागद मी कंपॉझिटरच्या हवालीं केले, लेखणी दूर ठेवली, आणि टेबलाखाली दडपलेले पाय टेबलावर आणून खुर्चीच्या पाठीवर मान टाकली.

दोन अडीचचा सुमार होता. झोपलेल्या जगाला आपली चाहूल लागूं न देतां अेक तारीख काळोखांत निघून गेली आणि दुसरीनें चोवीस तासांच्या स्वामित्वासाठीं जगाचा ताबा घेतला होता. खोलीतील अेकांतावर, कांचेच्या

गोल घरांत बंदिस्त असलेली ती विद्युत् ज्योत भरभरीत प्रकाश पसरण्याचें आपलें कार्य निःशब्दतेनें करीत होती. 'प्रीत पतंगाची खरी' हें सुभाषित खरें करणारे कांहीं किडेकीटक, आपल्यालाहि पंख आहेत या दिमाखांत त्या तेजाभोंवतीं फिरत होते, ती काबीज करण्याचा प्रयत्न करीत होते, व अखेरीं कोठेंतरी मरून पडत होते. समोरच्या भिंतीवर असलेलें एक मोठें गोलाकार घड्याळ कृपणाच्या निष्ठेनें प्रत्येक क्षणाचें नाणें मोजीत आणि वाजवीत बसलें होतें. त्याचें तें कंटाळवाणें संगीत आतांपर्यंत मला ऐकूंच आलें नव्हतें. आतां त्याची प्रत्येक टकटक माझ्या कानावर, नव्हे, माझ्या अवघ्या जीवनावर छन्नीनें आघात करून त्याचीं वारीक वारीक शकलें काढीत आहे असें मला वाटलें. कां कोणास ठाऊक, कोठली तरी अबोध भीति आपले विस्तीर्ण,काजळी पंख पसरवून माझ्या मनावर उतरूं लागली.

आपण जागें आहोंत, जेव्हां जागे नसायला पाहिजे तेव्हां जागे आहोंत या गोष्टीची मला एकाएकीं तीव्र जाणीव झाली. त्या जाणिवेंतूनच ही भीति ही अस्वस्थता निर्माण झाली असेल का ? सृष्टीक्रमाच्या अपार सामर्थ्या-विरूद्ध मी अेकाकीपणानें- निदान त्या खोलीच्या चतुःसीमेंत तरी – प्रतिकार करीत उभा होतों. जगाच्या विराट् व्यवहारांतील कित्येक महत्वाच्या घडामोडी अंधाराच्या आश्रयानें होतात हें खरें. 'या निशा सर्वभूतानाम्' हें सुभाषितहि मला चांगलें माहीत होतें. परंतु हें सारें अपवादात्मकच समजावयाचें. रात्र आपला निळा जांभळा शेला जगावर वत्सलतेनें पसरते तो परि-श्रमाच्या पापण्या मिटाव्यात म्हणून, जागृतीची संवेदना स्वप्नांच्या मुलायम सृष्टींत विलीन व्हावी, म्हणून !

मी खुर्चीवरून उठलों आणि खिडकीपाशीं जाऊन बाहेर पाहूं लागलों, परंतु बाहेरचा देखावा कांहीं मनाला आल्हाद देणारा नव्हता. दिवसभर असंख्य पायांखालीं तुडवले गेलेले रस्ते आतां एकाकी व उजाड झाले होते. घरांनीं किनारलेले त्यांचे रुंद, पांढुरके पट्टे, सार्वजनिक दवाखान्यांत पडलेल्या रोग्यांसारखे दिसत होते आणि अधेमधें उंच लोहस्तंभावर प्रकाशणारे दिवे दवाखान्यांतील डॉक्टरांप्रमाणें किंवा परिचारिकांप्रमाणें त्या रूग्णांची विचार-पूस करीत होते. अर्धवट काळोखांत आणि अर्धवट प्रकाशांत असलेल्या उंच

इमारती कबरस्तानांतील लहानमोठ्या थडग्यांसारख्या भासत होत्या आणि काळोखाचा प्रचंड, जुनाट वृक्ष त्या थडग्यांवर आपल्या पर्णसंभाराची छाया ओतीत मागच्या बाजूस उभा होता. तें दृश्य पाहून माझ्या मनाची अस्वस्थता अधिक वाढली मात्र. जीवनाच्या किनाऱ्यापासून आपली नौका वादळी लाटांवर दूरदूर ओढली जात आहे असें मला वाटलें.

आणि तेवढ्यांत मला त्या मांजरांच्या पिलांची आठवण झाली. टेबला-जवळ कोपऱ्यांत असलेल्या रद्दीच्या टोपलींत एका मांजरीनें आपलीं तीन पिलें दोन दिवसांपूर्वीं आणून ठेवलीं होतीं. त्या पिलांचा समाचार घेण्याचें स्मरण मला आतांपर्यंत झालें नव्हतें. मी धावतच पुन्हां खुर्चीवर येऊन बसलों आणि ती टोपली जवळ ओढून आंतील मंडळींकडे पाहूं लागलों. पिंजलेल्या कापसाच्या तीन चिमुकल्या राशी एकमेकांवर टाकून द्याव्या त्याप्रमाणें तीं पिलें त्या छोट्या टोपलींत परस्परांच्या अंगावर स्वच्छंदपणें पडलीं होतीं. एकाचे पाय दुसऱ्याच्या गळ्याभोंवती आणि दुसऱ्याची शेपूट तिसऱ्याच्या पायाभोंवती ! शाळिग्रामावर ठेवलेल्या फुलाप्रमाणें अेखादें झोपेच्या तंद्रींत वरून कोसळे आणि नंतर दोघांच्या पोटांत घुसण्याची आटापीट करीत त्यांनाहि आपल्याप्रमाणें जागे करी. जाग येतांच ते तीनहि गोजीरवाणे जीव आपल्या हिरव्या डोळ्यांनीं माझ्याकडे चौकसपणानें पाहूं लागत. तूं मित्र आहेस कीं शत्रू आहेस, हाच प्रश्न जणूं त्यांच्या सहा डोळ्यांतून बाहेर पडत होता. शेवटीं, तूं मित्र अैस कीं शत्रू अैस, आम्ही मात्र तुझे मित्रच आहोंत, हें मला कळविण्यासाठींच कीं काय, त्यांतील एक टोपलींतून उडी मारुन बाहेर आलें आणि माझ्या पायाभोंवती घोटाळूं लागलें. पायाशीं त्रिलगणारी ती रेशमाची रास मीं उचलून घेतली आणि टेबलावरील युद्धाच्या तारांवर तिची स्थापना केली. आपल्या साहसी बांधवानें मिळविलेलें हें यश पाहून टोपलींत राहिलेल्या दोन पिलांना धीर आला आणि तींहि बाहेर पडलीं. मीं त्यांनाहि मेजावर स्थानापन्न केलें. त्यांच्या मोहक, मनोहर दंगलीला प्रारंभ झाला. प्रत्येक वस्तूवर आपला चिमुकला पंजा मारायची त्यांना केवढी हौस ! टेलिफोनची तार थोडीशी हालवली कीं पाठीची कमान करून पंजा मारण्यासाठीं कोणी तरी पवित्रा घेतलाच. आपल्या खेळकरपणानें त्यांनीं टेबलावरील प्रत्येक निर्जीव

वस्तंत जिवन्तपणा आणला. गुबगुबीत उंदराप्रमाणें दिसणारी टाचण्यांची उशी, कागद, टिपकागद, टांक, दौत– प्रत्येक वस्तु त्यांच्या क्रीडासक्तीला साहाय्य करूं लागली. स्वतःच्या सावलीवर देखील तीं मोठ्या आवेशानें टिपण घेत आणि तीं धरण्याचा प्रयत्न करीत. यशापयशाची कांहींच चिकित्सा वा चिंता नव्हती. एखादें पिलूं आपल्या उद्योगांत पराभूत झालें कीं मेजावर अस्ताव्यस्त पडून, सर्कशीतील विदूपकाप्रमाणें आपण हें मुद्दामच केलें अशा आविर्भावानें माझ्याकडे व आपल्या भावंडांकडे गमतीनें टक लावून पाहायचें. पाहतां पाहतां पुन्हा एकदम उशी घ्यायचें आणि अंकाः बांधवाच्या पाठीवर वा टेलीफोनच्या रिसीव्हरवर स्वार व्हावयाचें. विचकणें, धावणें, पंजा मारणें, कमान करणें, टिपण टाकणें, एकमेकांशीं मस्ती करणें, पांचूसारख्या चमकदार हिरव्या डोळ्यांनीं टकमका पाहाणें, वगैरे विविध उद्योगांत काळ अक्षरशः मांजराच्या पावलांनीं निघून जात होता. जीवनानंदाच्या वेलीवरती उमललेलीं तीं तीन टपोरीं फुलें होतीं. जीवितासंबंधींच्या गाढ आसक्तीचा व उत्साहाचा परिमळ तीं सभोंवार उधळत होतीं. त्यांच्या सहवासांत माझ्या मनांतील अस्वस्थता पार विरघळून गेली. अचेतन व उदासीन वाटलेलें खोलींतील वातावरण चैतन्यानें व आनंदानें ओथंबून गेलें.

घड्याळांत तीनचे ठोके पडले आणि टेलीफोनची घंटी खणखणूं लागली. त्या अनपेक्षित आवाजानें ते तीन शिलेदार बावरले आणि पटापट टेबलावरून खालीं उड्या मारून क्षणार्धांत त्यांनीं पुन्हां टोपलीचा आश्रय घेतला.

मीं त्यांच्याकडे एकवार पाहिलें आणि रिसीव्हर उचलला,

"हॅलो, बाजारभाव घ्या–" रॉयटरच्या कचेरींतील जागता जीव म्हणाला. मी पेन उचललें आणि साऱ्या बाजारपेठा आपल्याच मालकीच्या आहेत अशा उत्साहानें कानावर पडणारे भाव टिपून घेऊं लागलों.

• • •

# अनंताची ट्रॅजेडी....

एखादा दिवस असा उजाडतो कीं, त्या दिवशी आपण करायचं ठरवतों एक आणि लोक आपल्याला करायला लावतात दुसरंच कांहीं तरी! संकल्प आणि सिद्धि यांमध्यें परमेश्वराची इच्छा उभी असते, असं गडकऱ्यांचं एक सुभाषित आहे. संकल्पाच्या मार्गांत जी जी गोष्ट आडवी येईल ती परमेश्वरी इच्छेचं मूर्त स्वरूपच होय असं मानायचं असल्यास हें सुभाषित पत्करायला हरकत नाहीं. पण ही परमेश्वरी इच्छा कित्येक वेळां असं विलक्षण रूप धारण करते कीं --

परंतु काय घडलं तेंच सांगतों. आज सकाळीं न्हाणीघरांमध्यें दांत घासत असतां मला काव्यासाठीं एक अत्यंत श्रेष्ठ, अत्यंत विशाल, अत्यंत सनातन आणि एकंदरीनं अशा सहस्रावधि अत्यंतांचीं रास ओतली तरी ज्याचा अंत लागावयाचा नाहीं असा विषय सुचला. त्या विषयावरील माझं काव्य पुरं झालं असतं तर त्याला कोणतीं विशेषणं लागलीं असतीं हें सांगतां येणार नाहीं. पण स्वतंत्रपणें तो विषय फार मोठा होता आणि दांत घासतां घासतां माझ्या मनावर त्याचा जो बोजा पडला होता तोहि फार जबरदस्त होता यांत शंका नाहीं. अनंत हाच तो विषय होता!

या अपार विश्वोद्योगाच्या मुळाशीं असलेलं अनादि अनंत असं परमतत्त्व -- ( ज्याला सोयीसाठीं तूर्त अनंत हें तीन अक्षरी नांव द्यावयाचं ) आणि आर्यन कंपनीनं तयार केलेला रुपया सव्वारुपयाचा टूथब्रश यांचा परस्परांशीं कांहीं घनिष्ट संबंध असेल हें संभवत नाहीं. तसा कांहीं संबंध आहे असा माझा दावा नाहीं. म्हणजे असं कीं त्या अनंत तत्त्वानं निर्माण केलेल्या विश्वाच्या पसाऱ्यांतच आर्यन टूथब्रशची जागा आहे हें

निर्विवाद. परंतु त्या परमशक्तीचा साक्षात्कार व्हावा असं कांहीं आध्यात्मिक बळ टूथब्रशमध्यें नाहीं हें मात्र निश्चित.

आणि तरीहि हा विषय कोठून आला ? या प्रश्नाचं नेमकं उत्तर शोधून काढणं कठिण आहे. कदाचित् रोजच्या मानानं आज लवकर उठलों म्हणून वाटणाऱ्या उल्हासाचा तो परिणाम असेल. कदाचित् न्हाणीघराच्या जाळींतून आंतील ओलाव्यावर झिरपणाऱ्या कोमल उन्हाचीहि ती कारवाई असेल. कदाचित् पहांटेच्या काळोखांत संज्ञाप्रवाहांतून बाहेर पडलेल्या एखाद्या स्वप्नाशींहि त्याचा संबंध असेल. कारण कोणतंहि असो. दंतशोधनाचा उद्योग चालू असतां अकस्मात् हा गहन आणि गूढ विषय मला सुचला आणि त्यानं माझ्या मनांत मोठं काहूर माजवलं एवढं खरं. त्या काहुराच्या ओघांत वाहात आलेल्या दोन तीन ओळी माझ्या सभोंवार रुमझुमू लागल्या.--

अगणित नक्षत्रांच्या नयनी
काय पाहिलें तुवां अनंता,
किती पाहिलें तुवां--

एखाद्या अंधाऱ्या कोठडींत गॅसची बत्ती लागावी त्याप्रमाणें या तीन ओळींनीं माझं मस्तक व्यापून टाकलं अव्यक्तांत असलेले त्या चरणांचे इतर भाईबंद आपण केव्हां एकदां शोधून काढतों व हें कधीं नवत सुचलेलं उदात्त काव्य पुरं करतों असं मला होऊन गेलं.

चहापानादि गोष्टी कशा तरी उरकून मी मोठ्या उत्साहानं माझ्या मेजाशीं येऊन बसलों. कागदांची शोधाशोध केली व सुदैवानें ते लवकर सापडलेहि ! नंतर पंधरा वीस मिनिटं पेनच्या शोधांत गेलीं व शेवटीं तो शोध फलदायी झाला नाहीं हें खरं; परंतु वाईटांतून बरं निघतं या न्यायानं पेन शोधीत असतां अनपेक्षितपणें एक पेन्सिल सापडली. 'तरी हरकत नाहीं' असं मनाशीं म्हणून, मोठ्या विषयाला साजेलशा गंभीरपणानं मी लिहायला बसलों. कागद पेन्सिलीचा हा विषय सकृद्दर्शनी वाटतो तितका सामान्य नाहीं. पुष्कळदां असं होतं कीं, स्फूर्ति आपल्या अंतःकरणाच्या दाराशीं धडका मारीत उभी असते आणि तिच्या स्वागतासाठीं कागद पेन्सिलीसारख्या

साधनांची जमवाजमव करतां करतां इतका वेळ निघून जातो कीं दारा–वरच्या धडका अखेरीं बंद पडतात. असेहि अनुभव मला कित्येकदां आले आहेत, आणि हा उद्योग करणाऱ्या इतरांनाहि बहुधा आले असावेत. हा प्रत्यय मोठा मनोरंजक असतो.

त्याचं असं होतं——

आपल्याला कांहीं तरी वाङमयांत चिरस्थायी होणारं एखादं कथा-नक सुचतं आणि 'क्षणांत नाहींसा होणारा हा दिव्य भास' कागदावर बंदिस्त करण्यासाठीं आपण मोठ्या उल्हासानं टेबलाजवळ येऊन बसतों. थोडीशी शोधाशोध केल्यावर चुकून रद्दीच्या टोपलींत पडलेले कोरे कागद आपल्याला सापडतात व ते समोर घेऊन मनांतल्या मनांत सरस्वतीचं किंवा अन्य कोणाचं स्मरण करून टेबलावर पडलेलं फाउंटन पेन आपण उचलतों. पेन चालवूं लागल्यावर तें चालूं इच्छीत नाहीं हें आपल्या लक्षांत येतं. नवीन पेन एवढ्यांत बिघडलं ? आपण निफाकडे एकदां बारकाईनं बघतों आणि त्याच्या नाजूक स्वरूपाची तमा न बाळगतां तें शक्य तेवढं दाबून पुन्हां कागदावर लिहिण्याचा यत्न करतों. कागदावर बिनशाईच्या ओर–खड्याशिवाय दुसरं कांहींच उमटत नाहीं. बहुधा शाई उतरत नाहीं असं दिसतं. आपण पेन प्रथमतः हलक्या हातानं आणि नंतर जोरजोरानं झटकूं लागतों. त्यांतुन बाहेर पडणारे शाईचे शितोडे आपल्या कपड्यावर, टेबला-वर, समोरच्या कागदांवर आणि आदल्याच दिवशीं बाजारांतून खरेदी केलेल्या दोन कोऱ्या करकरीत पुस्तकांवर पडतात. एवढं रणकंदन होऊन कागदावर पेन चालत नाहीं तें नाहींच ! दोन चार अक्षरं जेमतेम उम-टल्यावर पुन्हा त्याची असहकाराची चळवळ चालू होते. आपण संतापानं धुसमुसूं लागतों. अमृताचं दान करतांना शुक्राचार्य झारीच्या तोटींत बसला, तसा कोण दुरात्मा या पेनमध्यें बसला आहे ? पेनच्या आंतर्रचनेसंबंधींचं आपलं ज्ञान फार माफक असतं. पण कांहीं तरी करून तो चालता केला पाहिजे म्हणून तो आपण खोलतों. नंतर आपल्या लक्षांत येतं कीं पेनमध्यें कोणीहि शुक्राचार्य बसलेला नसून खुद्द अमृताचीच टंचाई आहे ! शाईची बाटलीहि रिकामी आहे आणि नवीन अद्याप आणलेली नाहीं हें ध्यानांत

घेऊन आपण पेन बाजूला ठेवतों आणि पेन्सिल शोधूं लागतों. आपल्या जवळ असलेला पेन्सिलींचा साठा आपल्याला सदैव अभिमान आणि आनंद वाटावा असाच असतो. त्यांत जपानी पेन्सिली असतात, ( अलिकडे बाजारांत नवीन दिसूं लागल्या म्हणून ) जर्मन पेन्सिली असतात, ( फार दिवसांनीं बाजारांत नवीन दिसूं लागल्या म्हणून ) इंग्लिश पेन्सिली असतात, ( इंग्लिश माल सर्वांत सचोटीचा म्हणून ) अमेरिकन असतात ( त्यांच्या आकर्षक बाह्यांगाचं आकर्षण वाटलं म्हणून ), आणि देशीहि असतात– ( पुष्कळ दुकानांत दुसऱ्या मिळत नाहींत म्हणून ). आपण कपाट उघडून पेन्सिली पाहूं लागतों. दुर्दैव असं कीं, जिथें किमान पाऊण डझन पेन्सिली असायला हव्यात तेथें मद्रासी पेन्सिलीचा एक टोक मोडलेला तुकडा, रणांगणांत घायाळ होऊन पडलेल्या एकाकी वीरासारखा पडलेला आढळतो. चोराच्या हातची लंगोटी या न्यायानं आपण तो तुकडा घेतों. टोंक मोडलेलं असल्यामुळें हा तुकडा छिलावा कसा, हा नंतरचा प्रश्न. हा प्रश्न तर फारच उग्र स्वरूप धारण करतो. पेन्सिल तासायचं छोटं यंत्र कोणी तरी जवळपासच्या बालकानं धोंडा घालून मोडलेलं असतं. नंतर आपण चाकूचा शोध घेण्यासाठीं घरांतील एका खोलींतून दुसरींत व दुसरींतून तिसरींत ( घराचा विस्तार याहून अधिक नसतो ) याप्रमाणें तावातावानं संचार करूं लागतों. सुमारें तासभर चाललेल्या या संशोधनांत पुस्तकांचीं शेल्फं, कपड्यांच्या ट्रंका, भांड्यांचीं फडताळं, अडगळींतील पेट्या वगैरे सारं कांहीं पाहून होतं आणि घराला नवीन बिऱ्हाड आणल्याची कळा येते. आतांपर्यंत रागाच्या तंद्रींत आपण कुणाशींहि कांहींहि बोलत नाहीं. पण शेवटचं कपाट रिकामं व अस्ताव्यस्त केल्यावर आपण नाईलाजानं कुणाला तरी विचारतों, "चाकू दिसला का कुठें ? " आपल्याला अशी माहिती कळतें कीं, आपला चाकू माडीवरच्या बाबूनं आठ दिवसांपूर्वीं पतंग करण्यासाठीं नेला होता. आपण वर जाऊन बाबूचं दार ठोठावतों. बाबू प्रथमतः नाक पुशीत 'मला ठाऊक नाहीं ' म्हणून ठणकावून सांगतो. आणखी कांहीं प्रश्नोत्तरं झाल्यावर ' आंत पाहतों ' असं तो आश्वासन देतो. यानंतर पांच दहा मिनिटें धरणीकंप होत असल्याप्रमाणें आंत पडझडीचे विविध ध्वनी ऐकूं येतात. शेवटीं या सर्व ध्वनींना

गिळंकृत करणारा एक तार सप्तकांतला श्रेष्ठ ध्वनि स्वयंपाकघराच्या दिशेनें येतो; 'काय रे मेल्या, काय उलथापालथ चालवली आहेस?' हें आपल्याला उद्देशून आहे कीं काय, अशा कल्पनेनं आपण क्षणभर गांगरतों. तेवढ्यांत बाबूनं उलथापालथीचं प्रयोजन आपल्या माउलीला निवेदन केल्यामुळें ती समोर येऊन नम्रपणानं म्हणते, 'अहो, आमचे हे मुलखाचे विसरभोळे. त्या कोणत्याशा नाटकांत तें कोणतसं पात्र आहे ना, तस्से अगदीं. परवां हापिसांत कागद कापायला म्हणून घेऊन गेले तो पुन्हां परत आणलाच नाहीं. उद्यां आणायला सांगतें.' 'कशाला उद्यांची बात' हें गाणं गुणगुणत आपण जिना उतरून खालीं येतों. आपल्या क्रोधाचा पारा बेसुमार चढलेला असतो. तो खालीं उतरविण्यासाटीं कांहीं गाण्यासारखे प्रयोग केल्यावर चाकूचं कार्य ब्लेडहि करूं शकतें हें आपल्या लक्षांत येतं. आपण एक जुनी ब्लेड घेतों व तो मद्रासी तुकडा तासूं लागतों. ब्लेडचे चारपांच आवेशपूर्ण फटकारे मिळतांच वरच्या लाकडासकट एक इंचभर शिसं बाहेर येतं व दूर जाऊन पडतं! आपण आणखी रागानं उरलेली पेन्सिल तासूं लागतों. ब्लेड ही ईश्वरानं किंवा ब्लेड तयार करणाऱ्या कंपनीनं पेन्सिली तासण्यासाठीं केलेली नसते. त्यामुळें थोड्याच वेळांत ती एका बाजूला पेन्सिलीच्या लाकडांत आणि दुसऱ्या बाजूनें बोटांत, एकसमयावच्छेदेंकरून ( असे शब्द केव्हां तरी वापरलेच पाहिजेत ) घुसते. बोटांतून रक्त वाहूं लागतं. 'शाईनं लिहूं नका, रक्तानं लिहा' असं सांगणाऱ्या नेत्यांचा संदेश प्रत्यक्षांत उतरविण्याची ही संधि असते. पण आपण तिच्याकडे लक्ष देण्यासारख्या मनःस्थितींत नसतों. नळावर जाऊन आपण बोट धुऊन टाकतों आणि तरीसुद्धां रक्त थांबत नाहीं म्हणून चिंधी शोधण्यासाठीं पुन्हां घरभर फिरूं लागतों. शेवटीं बांधलेल्या बोटानं आपण टेबलापाशीं येऊन बसतों व टेबलावर पडलेले सर्व कागद पुन्हां रद्दीच्या टोपलींत टाकून देतों!

आज सुदैवानं वर सांगितल्याप्रमाणं कांहीं प्रकार झाला नाहीं, निदान तितक्या प्रमाणांत झाला नाहीं. अल्पावकाशांत सारी जमवाजमव झाली आणि मी अनंतासंबंधींची माझी भावना शब्दबद्ध करण्यासाठीं पेन्सिल उचलली.

परंतु दुर्दैव येतं तें एकाच मार्गानं नव्हे. यायचं असलं म्हणजे तें कोठली वाट शोधून काढील याचा नेम नाहीं. आज तें अगदीं राजरस्त्यानंच येऊन माझ्यासमोर उभं राहिलं. डोक्यांत आकार घेणारी दुसरी ओळ मी कागदावर लिहूं लागलों. तोंच एखादा बाँबस्फोट झाल्याप्रमाणें खोलीचा दरवाजा बाहेरून उघडला गेला. त्या स्फोटाच्या पाठोपाठ भास्करराव उर्फ आप्पासाहेब हिंगणघाटकर हे आंत प्रवेश करते झाले. मोडून पडलेल्या दाराच्या फळ्या त्यांच्या हातांत आहेत कीं काय, हें मीं बघितलं परंतु कांहीं मोडतोड करण्याचा आप्पासाहेबांचा उद्देश नव्हता. दरवाजा उघडण्याची त्यांची ती एक नेहमींची व सामान्य पद्धत होती. आप्पासाहेबांच्या बगलेमध्यें एक बारदानाची पिशवी होती. ही पिशवी संकटांनीं भरलेली आहे हें मीं ओळखलं. आतां आपत्ति आलीच आहे तर तिचा थोडा आदर-सत्कार करून तिला लवकर घालवून द्यावी अशा विचारानं, मीं 'या' म्हणून आप्पासाहेबांना नमस्कार केला.

आप्पासाहेब हिंगणघाटकर गंभीर चेहरा करून जवळ असलेल्या आरामखुर्चीवर बसले.

"काय आज कुणीकडे?" मीं विचारलं.

"इकडेच."

"अरे वा! काय विशेष?"

हिंगणघाटकरांनीं बगलेंतील पिशवी हातांत घेतली व तिच्यांतील खतावणीच्या पिवळसर कागदांचीं चार पांच भेंडोळीं वर काढलीं.

"गेल्या पंधरा दिवसांतलं हें उत्पादन. उत्पादन वाढवा असा नेहरूंचा संदेश आहे ना?" आपण कांहीं तरी लोकविलक्षण विनोद केला अशा आविर्भावानं आप्पासाहेबांनीं एक मजलेदार हास्य केलं.

"छान, छान!" मी अगतिकपणें उद्गारलों आणि आप्पासाहेबांचीं तीं भेंडोळीं माझ्या टेबलावर जरा बाजूला ठेवलीं.

हिंगणघाटकरांसंबंधीं येथें दोन शब्द सांगणं आवश्यक आहे. हिंगणघाटकर हे आमच्या गांवांतील एका बऱ्यापैकीं लाकूड कोळशाच्या वखारीचे मालक. मॉमच्या 'मून अँन्ड सिक्स पेन्स्' मधील दलालाला एक दिवस

अचानक चित्रकलेचा साक्षात्कार होतो, त्याप्रमाणें हिंगणघाटकरांनाहि वयाची चाळीशी उलटून गेल्यावर आपल्या ठिकाणीं असलेल्या काव्यप्रतिभेचा अचानक शोध लागला होता. त्यांनीं त्या चित्रकाराप्रमाणें आपल्या धंद्याचा त्याग केला नाहीं, करणं जरूरहि नव्हतं. वखारींत वेळ पुष्कळ आणि कामाचं स्वरूपहि बरंचसं आरामशीर. त्यामुळें त्यांना काव्य करायला वेळ भरपूर होता. बाल वॉशिंग्टन उत्साहानं आपली कुऱ्हाड प्रत्येक झाडावर चालवून पाहात होता, त्याप्रमाणें ते प्रत्येक लहानमोठ्या विषयावर कविता करूं लागले. बोरीचं लाकूड आणि बाभळीचं लाकूड यांच्यांतील संवादापासून सीता-द्रौपदीच्या स्वयंवरापर्यंत अनेक विषयांवरती त्यांची लेखणी लीलेनें चालत असे. पैशाचा तुटवडा नसल्यामुळें आपल्या निवडक कवितांचा संग्रहहि काढण्याचा विचार त्याच्या डोक्यांत घोळत होता. एक जाणकार आणि मर्मग्राही रसिक म्हणून त्यांचं माझ्यावर प्रेम होतं. आपलं सर्व काव्यलेखन ते कटाक्षानं मला वाचून गाऊन दाखवीत. व्यापारांतील आणि व्यवहारांतील पारंगततेमुळें, तुम्ही कांहींहि बोललांत तरी अखेरीं आपल्याला हवा तो अभिप्राय तुमच्याकडून काढून घेण्याचं सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें तें कधींच असंतुष्ट होत नसत. आजहि तसंच झालं.

मीं त्यांचे कागद मेजावर ठेवले व म्हणालों, "बऱ्याच दिसतात. जरा सावकाशीनं वाचल्या पाहिजेत."

"छे, छे? सात आठच आहेत. शुभस्य शीघ्रम् !"

"पण आतां जरा—"

"तुम्हांला कंटाळा आला असेल वाचायचा तर मी म्हणून दाखवितों. पांचदहा मिनिटांचं काम—आणा—"

माझ्या हो- नाहींची प्रतीक्षा न करतां हिंगणघाटकरांनीं कवितांचे कागद घेतले आणि खुर्चीवर प्रवचनाची बैठक घालून ते एकेका कवितेचं साभिनय व सटीक गायन करूं लागले. हा कार्यक्रम आटोपायला अर्धा पाऊण तास लागला. नंतर कागद पुन्हा पिशवींत ठेवून त्यांनीं विचारलं,

"कशा आहेत ?"

"तशा ठीक आहेत. पण—"

"पण काय? मला स्पष्ट मत हवं. फुकाची प्रशंसा नको."

"भाषा जरा ओबडधोबड व बरीच अशुद्ध वाटली."

"तशी कांहीं ठिकाणीं मुद्दामच वापरली आहे. पण एरव्ही तर सुंदर आहे ना?"

"होय—"

"कांहीं ठिकाणीं तर भापेला मोठा रंग चढला आहे, नाहीं?"

"होय—"

"चार जागीं तर प्रासांची मोठी लयलूट आहे. अशी भाषा तुमच्या गडकऱ्यांनीं तरी लिहिली का?"

"नाहीं!"

"बरं. हें भाषेचं झालं. पण मुख्य गाभा, म्हणजे आंतलं काव्य कसं आहे?—"

"तसं बरं आहे पण—"

"पण काय?"

"फार साध्या आणि गद्य गोष्टीच सर्वत्र सांगितलेल्या दिसतात."

"बरोबर!" हिंगणघाटकर उत्साहानें उद्गारले, "तुम्हीं अगदीं नेमकं मर्मावर बोट ठेवलं.—केशवसुतांनींच म्हटलं आहे ना, साध्याहि विषयांत आशय कधीं—पण खुद्द त्यांना तरी इतके साधे विषय कधीं सुचले होते का?"

"नाहीं!"

"म्हणजे आम्हीं गडकरी—केशवसुतांवरहि ताण केली म्हणायची!" हिंगणघाटकर थोड्या विनोदानं, थोड्या गंभीरतेनं म्हणाले.

या धर्तीवर आणखी अर्धा तास चर्चा झाल्यावर हिंगणघाटकर हे गडकरी केशवसुतादि कवींच्या रांगेतून पुढें सरकले आणि ज्ञानेश्वर, भवभूति, कालिदासप्रभृति महान् साहित्य-श्रेष्ठींच्या पंक्तीला जाऊन बसले. एवढं झाल्यावर पूर्णतः संतुष्ट व तृप्त होऊन ते आपल्या काव्यासह अदृश्य झाले.

दार बन्द करून मी पुन्हां अनंताकडे वळलों. पहिल्या ओळी कागदावर लिहून झाल्याच होत्या. डोक्यांत आकार घेऊं लागलेली पुढची ओळ मी कागदावर लिहूं लागलों—

अगणित नक्षत्रांच्या नयनीं
काय पाहिलें तुवां अनन्ता
किती पाहिलें तुवां
अपार तूं पण——

पण काय——हें अनन्तासंबंधींचं गहन रहस्य मी कागदावर उलगडण्याच्या प्रयत्नांत असतांच दारावरती पुन्हा धक्के बसूं लागले. पोस्टमन, परीट किंवा वृत्तपत्रविक्रेता यांपैकीं कोणी तरी आलें असेल अशा आशेनें मीं दार उघडलें. दारामध्यें शामराव आपली छत्री बन्दुकीसारखी खांद्यावर धरून उभे होते. महिन्यापन्धरा दिवसांनीं कधीं नव्हत ते उगवणारे हे गृहस्थ नेमके याच वेळीं अवतरले होते.

शामरावांचा व माझा परिचय तसा मर्यादित स्वरूपाचा होता. परंतु शामरावांना जाण्यायेण्यासाठीं विशेष परिचयाची आवश्यकता नसे. त्यांना बोलायलाहि फारसं लागत नव्हतं. त्यांचा भर होता तो वाचनावर. वाचतां वाचतां ते कांहीं तारा केल्याप्रमाणें त्रोटक बोलत असत. शामरावांचं आगमन होणार आहे अशी मला यत्किंचित् कल्पना असती तर मीं माझ्या खोलींतील सारीं वृत्तपत्रं व पुस्तकं कोठेंतरी अडगळींत नेऊन टाकलीं असतीं. पण व्हायचं तें चुकत नाहीं हेंच खरं!

मला नमस्कार करून शामराव एखाद्या मेणाच्या मूक चित्रासारखे आंत आले आणि आणि इतरत्र कोठेंहि लक्ष न देतां सरळ स्टुलाकडे जाऊन त्यावर पडलेलं वृत्तपत्र चाळूं लागले.

मीं म्हटलं, "शामराव, फार जुनीं असतील तीं!"

"आजचं कुठं आहे?"

"कुठं गेलं कुणास ठाऊक. कुणीं तरी नेलं असेल बहुधा."

"छे छे! हें काय–तारीख– बारा सप्टेंबर."

शामरावांना वृत्तपत्र वाचण्यापासून परावृत्त करण्याचा माझा सर्व प्रयत्न असफल झाला. शामराव वर्तमानपत्र घेऊन माझ्या समोरच्या खुर्चीवर बसले. त्यांनीं टोपी काढून टेबलावर ठेवली. आंतल्या खिशांतून चष्मा काढला. धोतराच्या पदरानं तो वारंवार पुसला आणि अशा रीतीनं सर्व

सिद्धता झाल्यावर ते एकाग्र चित्तानं वृत्तपत्र वाचूं लागले. त्यांच्या त्या निर्विकार चेहेऱ्याकडे, हातांतील पत्राकडे आणि माझ्या अनंताच्या छातीवर एखाद्या स्टीम रोलरप्रमाणें येऊन पडलेल्या त्या उंच काळ्या टोपीकडे आळीपाळीनं पाहात मी स्वस्थ बसलों. तुमच्या घराचं सार्वजनिक वाचनालय करणारी ही मंडळी तुम्हांला जितकं अस्वस्थ व अशांत करतात तितकं इतर कुणीकरूं शकणार नाहीं. तुमचं कांहीं अस्तित्वच त्यांना मंजूर नसतं. अमुक अमुक गृहस्थाकडे वृत्तपत्रं व पुस्तकं मिळतात, एवढीच नोंद त्यांच्या कीर्दखतावणींत तुमच्या नांवापुढें झालेली असते. ही मंडळी आपल्यासमोर, आपल्या अस्तित्वाची दखल न घेतां, एकतानतेनं वाचूं लागली म्हणजे स्वतःच्या घरांत असूनहि दुसऱ्याच्या घरांत जाऊन बसल्यासारखा संकोच आपल्याला वाटूं लागतो !

शामरावांनीं वृत्तपत्राचं पहिलं पान पाहिल्यावर पुन्हा एकदा चष्मा पुसला व ते दुसरं पान उघडून अग्रलेख वाचूं लागले. टिळक-परांजप्यांसारख्या थोरांनीं घालून दिलेली ही चार-पांच स्तंभी अग्रलेखपरंपरा खरोखर इष्ट आहे काय, तिचे फायदे किती व तोटे किती, याचा मी बसल्या बसल्या (इतर कांहीं करणं शक्य नसल्याने) मनांत ऊहापोह करूं लागलों. सर्व अग्रलेख वाचून झाल्यावर शामरावांनीं चष्म्याच्या भिंगांतून माझ्याकडे एक तिरपा दृष्टिक्षेप केला. ते उद्‌गारले, "सुवेझचं भवितव्य ठीक दिसत नाहीं !"

'सुवेझपेक्षां माझ्या अनंताचं भवितव्य महादारुण आहे,' मी मनांतल्या मनांत म्हणालों.

"तुम्हांला काय वाटतं—?" शामरावांनीं विचारलं.

"कशाबद्दल ?"

या प्रकरणांतून तिसरं महायुद्ध सुरू होईल काय ?"

मला वाटलं, शामरावांना खरोखरच या प्रश्नासंबंधींचा माझा विस्तृत अभिप्राय माहीत करून घेण्याची इच्छा आहे. मी खाकरून व आवाज साफ करून 'सुवेझ व तिसरें महायुद्ध' या विषयावर कांहीं विद्वत्तापूर्ण विचार मांडूं लागलों. परंतु पांच-सात वाक्यं उच्चारल्यानंतर, शामराव हे सुवेझ

कालव्यांतून क्रिकेट–फुटबॉलच्या क्षेत्रामध्यें प्रविष्ट झालेले आहेत हें माझ्या लक्षांत आलं. वृत्तपत्राच्या शेवटच्या पानावरून त्यांची नजर संचार करीत होती. मीं माझं भाषण थांबवलं. शामरावांच्या तेंहि लक्षांत आलं नाहीं. दहापंधरा मिनिटांनीं पुन्हां पहिल्या पानाकडे वळून ते एकदम उद्‌गारले, "मूर्ख लेकाचा!"

"कोण?" मीं साहजिकच विचारणा केली.

"हा अब्दुल हमीद!"

"कोण तो?"

"पूर्व बंगालमधला."

"काय केलं त्यानं?"

"कांहींऽतरी बोलतो झालं!"

एवढा खुलासा पुरा आहे असं मानून शामरावांनीं हातांतील दैनिक खालीं टाकलं आणि स्टुलावरील एक साप्ताहिक उचललं. येणेंप्रमाणें सुमारें एका तासाचा विध्वंस केल्यावर शामराव एक दैनिक, दोन साप्ताहिकं व दोन पुस्तकं एवढं साहित्य (अर्थात् माझ्याकडील) बगलेला मारून निघून गेले.

शामराव दरवाजांतून पुरते मावळायच्या आंतच दाराच्या उंबऱ्यावर रामरावांचा उदय झाला. रामराव म्हणजे 'भावबंधनां'तील धुंडीराज आणि 'प्रेमसंन्यासां'तील गोकुळ या दोघांच्या मिश्रणांतून सिद्ध झालेली अलौकिक चीज. सकाळीं उठून सात वाजतां ते जे बोलायला सुरुवात करीत ते थेट रात्रीं झोपेंतसुद्धां बरेच वेळ बोलत राहात! (ही माहिती त्यांच्या मंडळीकडून लोकांना कळे.) धावण्याप्रमाणें बोलण्याच्या बाबतींतहि जर एखादी मॅरॅथॉन शर्यत असती तर रामरावांनीं ती बोलतां बोलतां लीलेनं जिंकली असती. वाक्‌शक्तीच्या जोडीला विसरभोळेपणाचं वरदान असल्यामुळें त्यांना विषयांचा तुटवडा कधींच पडत नसे. एकच गोष्ट त्यांच्याकडून प्रत्येक श्रोत्याला किमान पन्नास वेळां तरी ऐकायला मिळे. बोलून बोलून ते सभोंवारच्या सर्व समाजाची त्रेधातिरपीट उडवीत असत हें खरं; पण मनुष्य तसा मुळांत सज्जन व प्रेमळ असल्यामुळं सहसा कुणीहि त्यांचं मन दुखवीत नसे.

रामराव खालीं तक्क्याला टेकून बसले व सावकाशपणें विडीचं बंडल काढून विडी पेटवूं लागले.

"काय रामराव, काय विशेष बातमी ?" मीं विचारलं.

रामरावांच्या आणि आमच्या संबंधांत, ते आल्याबरोबर हा ठराविक प्रश्न आम्हीं विचारावा असा अलिखित करार झाल्यासारखाच होता.

"बातमी ना ? फारच आनंदाची आहे !"

"अरे वा ! म्हणजे आपल्या–"

श्रोत्यांची उत्सुकता वाढवावी कशी हें रामरावांना चांगलें अवगत होतं. पेटतां पेटतां विझून गेलेली विडी त्यांनीं अेखाद्या गूढ, चिंतनीय वस्तूप्रमाणें क्षणभर समोर धरली व तिच्या पेटण्याचं वा न पेटण्याचं रहस्य उमगून घेण्याचा यत्न केला. नंतर हळूच पेटी काढून त्यांनीं पुन्हा विडी पेटविली. हा समारंभ आटोपल्यावर ते माझ्याकडे वळले.

"त्या दीक्षिताच्या चंदूला बँकेंत नोकरी लागली !" ते नाकातोंडांतून धूर काढीत उत्साहानं म्हणाले.

जी बातमी अन्य कोणाला तरी सांगावयास हवी होती ती ते चुकून मला सांगत आहेत हें मीं ओळखलं. कारण चंदू दीक्षित हें नांव मीं आजवरच्या आयुष्यांत कधींहि ऐकलं नव्हतं. मीं सहजच विचारलं, "हा चंदू दीक्षित कोण ?"

हा प्रश्न विचारण्यांत आपण केवढी भयंकर चूक केली हें माझ्या क्षणार्धांत लक्षांत आलं. पण होऊं नये ती गोष्ट होऊन गेली होती. आतां पुढील आपत्तीला निमूटपणानं तोंड देण्यावांचून गत्यंतर नव्हतं. पुढील ४०–५० मिनिटं स्वतः चंदू दीक्षित, त्याचे वडील, त्याच्या बहिणी, त्याची आई, मावशी, आत्या, काका, मामा, आजोबा, पणजोबा वगैरे सर्व संबंधितांची इत्थंभूत हकीगत, एखाद्या धबधब्याच्या धारेप्रमाणें माझ्या कानांवर अखंड धडधडत होती. अनन्तावर काव्य लिहिण्याऐवजीं दीक्षितघराण्याचा इतिहास लिहिण्यास मी आतां अधिक पात्र झालों. ज्या विषयाचा माझ्या मनानं कांहीं वेळापूर्वीं ध्यास घेतला होता तो किती अर्थशून्य आणि लेखनाच्या

दृष्टीनें अयोग्य आहे हें माझ्या लक्षांत आलं. चरकांतून निघालेल्या उसाच्या चिपटाचाप्रमाणें तो विषय माझ्यासमोर निर्जीव आणि रसहीन होऊन पडला. रामरावांचं दीक्षितकुलासंबंधींचं भाषण चालू असतांच मी तो अनन्ताचा कागद समोर ओढला व अर्धवट राहिलेली तिसरी ओळ पुरी केली.

काय पाहिलें तुवां अनन्ता
किती पाहिलें तुवां
अपार तूं– पण तूझीहि झाली
आज अखेरीं हवा

वरीलप्रमाणें ओळ पुरी करून तिच्याखालीं मीं एक नक्षीदार सामाप्ति-चिन्ह काढलं आणि नंतर त्या कागदाची होडी करून ती कोणातरी मुलाला देण्यासाठीं बाजूला ठेवून दिली. नंतर मी निर्विकल्पपणें रामरावांकडे वळलों आणि त्यांना विचारलं, "चंदूचे आजोबा फडणीस होते कीं मामलेदार?—"

◆ ◆ ◆

महाविद्यालय

# एक होता राजा....

रवींद्रनाथांचा अेक कथासंग्रह सहज चाळीत असतां, त्यांतील अेका गोष्टीवर 'अेक होता राजा' हें शीर्षक मला आढळून आलें. लहानपणींचा अेखादा जिवलग दोस्त अचानक आगगाडीमध्यें भेटावा तसें तो मथळा पाहून मला वाटलें. 'अेक होता राजा' या ठराविक परंतु रोमहर्षक प्रास्ताविकानें सुरू होणाऱ्या अनेक कथांच्या अंधुक आठवणी माझ्या मनाभोंवतीं गर्दी करूं लागल्या. माणसाकडून वाचल्या जाणाऱ्या (किंवा अैकल्या जाणाऱ्या) वाङमयानुसार त्याच्या जीवनाचा आराखडा काढायचा झाल्यास पहिला कालखंड चिऊकाऊच्या गोष्टींचा, दुसरा राजाराणींच्या कथांचा, तिसरा कादंबरी–काव्यांचा आणि चवथा तत्त्वज्ञानात्मक ग्रथांचा असतो, असें म्हणावयास हरकत नाहीं. चिऊकाऊच्या गोष्टी नाटकांतील प्रारंभींच्या वाक्यांप्रमाणें बहुधा स्मृतींतून विरून जातात. पशूपक्ष्यांच्या संवादांत गुंतलेलें मुलाचें मन जेव्हां राजाराणीच्या अैश्वर्यशाली राज्यांत प्रवेश करतें तेव्हां त्याच्या कल्पनेचा लखलखीत पिसारा पूर्णत: उघडतो आणि अतिमानवी घटनांतून प्रकट होणारा मानवी भावनांचा विलास पाहून तें प्रथमत:च चकित होतें. या कथांसंबंधींच्या आठवणी मनांत सदैव लुकलुकत राहतात त्याचें कारण हेंच असावें. साहित्याच्या रसमय सृष्टीचें पहिलें दर्शन असतें तें.

अेक होता राजा --

मोठा मजेदार असायचा तो राजा. कोणत्याहि गोष्टींत असला तरी त्याला किमान दोन लग्न करण्याचें जन्मसिद्ध व्यसन. विवाहसंस्थेचें साम्य वेढा पडलेल्या किल्ल्यासारखें असतें असें अेका पाश्चिमात्य लेखकाचें वचन आहे. म्हणजे जे बाहेर असतात, त्यांना आंत जावेंसें वाटतें; आणि जे आंत असतात त्यांना बाहेर यावेंसें वाटतें. या सुभाषितानुसार अेकदां लग्न करून

अेकाच वेळीं संसारांत आणि पश्चात्तापांत पडणारा मनुष्य पुन्हा त्या गोष्टीचा विचार करणार नाहीं. परंतु प्राचीन काळांतील राजांचें तत्त्वज्ञान वेगळें असे. विवाहाच्या होमकुंडाकडे अशा धास्तावलेल्या दृष्टीनें ते सहसा पाहत नसत. अधिकस्य अधिकम् फलम् या न्यायानें, ते बहुधा अेका लग्नसमारंभाच्या व्यापांतून मुक्त होतांच दुसऱ्या लग्नाच्या तयारीला लागत. राजवाड्याच्या विस्तारामुळें घरांत असलेल्या गृहिणींचें अस्तित्व ध्यानांत ठेवण्याची त्यांना आवश्यकता नसेल, किंवा कलेसाठीं कला त्याप्रमाणें विवाहासाठीं विवाह या सिद्धांतावर त्यांची निष्ठा असेल. कारण कोणतेंहि असो, कोणत्याहि स्त्री-बरोबर यज्ञकुंडाभोंवतीं सात पावलें फिरायला ते नेहमी अेका पायावर तयार असत अेवढें मात्र खरें.

या राजाची आणखी मौज अशी कीं, तो विवाह दोन स्त्रियांशीं करी, पण त्याचें प्रेम मात्र अेकाच स्त्रीवर नेहमीं असायचें. One thing at a time या धोरणानुसार त्याचा प्रेमाचा व्यवहार चालत असे. दोन ( किंवा अधिक ) लग्नें केल्यावर दोन्ही राण्यांशीं सुखानें संसार करायला वस्तुत: काय हरकत असावी ? शेंदीडशें रुपये पगार असलेला तो कांहीं रेव्हेन्यू कचेरींतला कारकून नव्हता. दोन बायकांसाठीं दोन वेगळे वैभवशाली महाल बांधून तो दोघींनाहि सुखासंतोषांत ठेवू शकला असता. विद्येप्रमाणें प्रेमाचें दानहि अनेकांना खरोखरीं करतां येतें. आणि विद्येप्रमाणेंच मोकळ्या हातानें दान करूनहि त्याचें मुळांतलें मुद्दल कमी होण्याचा संभव नसतो. प्रेम हें अेक-निष्ठ असावें किंवा असतें, हा अेकोणिसाव्या शतकांत जन्माला आलेला (आणि तोहि पाश्चिमात्य देशांमध्यें) सिद्धान्त पूर्वीच्या लोकांना फारसा संमत नव्हता. प्रेमाच्या प्रकरणीं अशी कृपणता त्यांनी कधीं मान्य केली नाहीं. परंतु आटपाट नगरांतील हा राजा याहि बाबतींत मोठा तऱ्हेवाअीक असे. विवाह अनेकींशीं लावीन, परंतु प्रेम मात्र अेकीवरच करीन अशी त्याची प्रतिज्ञा असे.

याचा अपरिहार्य परिणाम असा होई कीं, अेक राणी त्याची आवडती बने व दुसरी ओघानेंच नावडती बने. नावडतीचा नंतर भयानक छळ होई. राजाचीं राणी असूनहि तिला अेखाद्या मोलकरणीप्रमाणें राहावें आणि राबावें लागे. कोंबडा आरवतांच तिला आपलीं चवाळीं व कांबळीं गुंडाळून उभें राहणें

भाग पडत असे. घरांतलीं सारीं कामें ( आणि तें राजाचें घर ! ) करूनहि मांध्यान्हाच्या वेळीं तिच्यापुढे शिळया भाकरींचे पापुद्रे येऊन पडत. आणि तेहि अश्रूबरोबर गिळतांना आपल्या उन्मत्त सवतीचे शब्दप्रहार तिला सहन करावे लागत. एकंदरींत ही नावडती बायको म्हणजे करुण रसाची व सद्गुणांची साक्षात् मूर्तीच असे. परंतु नावडती असूनहि व एवढा छळ सोसूनहि तिला अपत्य झाल्याशिवाय मात्र रहात नसे. ही दैवाची (व राजाचीहि ) कृपा. हें अपत्य बहुधा मुलगी असे. ज्या वयांत बाहुलीभातुकलीचा खेळ खेळायचा, मातापित्यांचीं अंगें मलीन करून त्यांना कालिदासाच्या म्हणण्यानुसार धन्य करायचें, किंवा आरडाओरड व दंगामस्ती करून आसपासच्या लोकांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडायचें, त्याच कोंवळया वयांत ही चिमुकली राजकन्या रानावनांत जाऊन लाकूडफाटा गोळा करीत सांबाच्या देवळांत किंवा ओढयाच्या कांठीं बसून आसवें गाळीं आणि —

अशा प्रकारें अत्यंत कारुण्यपूर्ण असा या गोष्टींचा आरंभ होऊन अखेरीं सर्वस्वी आनंददायक असा त्यांचा समारोप होई. लाकूडफाटा गोळा करणाऱ्या राजकुमारीचा, आपल्या बापाहूनहि बलाढच अशा एखाद्या राजाच्या पुत्राशीं विवाह लागे; किंवा शिवपार्वतीच्या कृपेनें तिला स्वतंत्रतः एखाद्या सुवर्णपुरीची प्राप्ति होई. नावडत्या राणीचा मनस्वी छळ कारणारा तो राजाहि पुढें पश्चात्तापानें पावन होत असे. याचा क्रमप्राप्त परिणाम म्हणजे नावडत्या राणीचें रूपांतर आवडत्या राणींत होई. आणि आयुष्यभर नानापरीचा छळ सोसणाऱ्या त्या माउलीला शेवटीं ईश्वराच्या दयाळूपणाची साक्ष पटे. राजा हा एका वेळीं एकाच राणीवर प्रेम करूं शकत असल्यानें पूर्वीची आवडती आतां नावडती होई. तिचा यथाशक्य छळ करीत तें राजकुटुंब सुखानें कालक्रमणा करूं लागे आणि अशा रीतीनें गोष्टींतील सज्जनांच्या दृष्टीनें तरी सारें कांहीं शुभ आणि सुखदायक होई.

सध्यां सज्जन आणि दुर्जन या शब्दांमध्यें मला फारसा अर्थ वाटत नाहीं. माणसांचें असें ठोकळेबाज वर्णन वा वर्गीकरण करणें हें केवळ बुद्धिमांद्याचें लक्षण होय, असें मला वाटतें. इतकेंच नव्हे तर माझ्या आंतरिक राज्यामध्यें सज्जन म्हटल्या जाणाऱ्या लोकांपेक्षां दुर्जन म्हटल्या जाणाऱ्या लोकांनाच

अधिक भाव असावा, अशी शंकाहि मला केव्हां केव्हां येते. चार सज्जन अेकत्र बसून गैरहजर असलेल्या पांचव्या दुर्जनाची ( दुर्जनांबाबत ही अेक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ते बहुधा गैरहजर असतात, ) नालस्ती करूं लागले म्हणजे त्या अनुपस्थिताचें वकीलपत्र घेण्याचा मोह मला अनावर होतो. आणि माझ्या वकिली सामर्थ्याविषयीं मी साशंक नसतों, तर या मोहाला मी नेहमींच बळी पडत आलों असतों.

आज तशा कथा अैकल्या किंवा वाचल्या तर त्या नव्या नावडत्या राणीचें व तिच्या अपत्यांचें पुढें काय झालें, त्यांच्याहि गोष्टीची 'अेक होता राजा'– येथपासून पुन्हा तशीच सुरवात व तशीच घडण होणार नाहीं का, अशी शंका वाटते. अेकच गाडी मुंबईकडे कलकत्ता मेल आणि आणि कलकत्त्याकडे मुंबई मेल म्हणून ओळखली जाते. त्याप्रमाणें जागा बदलल्यावर दुष्टांचे सुष्ट आणि सुष्टांचे दुष्ट होत नसतील का ? पण ही सारी वर्तमानकाळाची कहाणी झाली. ज्या काळांत आटपाट नगरांतील राजाराणींच्या सुरस व चमत्कारिक गोष्टी मी अैकत असें, तेव्हां मी निश्चितपणें सुजनांचा सांगाती होतों. भोजनाचा कार्यक्रम आटोपून हिवाळ्यांतील रात्रीं धगधगणाऱ्या शेगडीच्या भोंवतालीं, किंवा उन्हाळ्याच्या रात्रीं गच्चीवरील निशिगंधाजवळ, इतरांसमवेत बसून, झोपेचें व जांभयाचें निर्धारानें निवारण करीत आजीच्या रसगर्भ वाणींतून मी जेव्हां या कथांचें अेकताननेनें श्रवण करीत असे तेव्हां शंभर टक्के सुजनतेचा मी कैवारी होतों. काळाच्या किनाऱ्यानें मनुष्य पुढें चालला कीं, केवळ कॅलेंडरावरील पानें बदलतात असें नाहीं; सारेंच बदलत जातें. रोज रात्रीं झोपणारा मनुष्य बिछान्यांत मरतो आणि उठणारा मनुष्य नव्या परिस्थितींत वेगळ्या जगांत जन्माला येतो. मागें वळून पाहिलें म्हणजे माझें मलाच नवल वाटतें. चांगुलपणा, औदार्य, पराक्रम, नीतिमत्ता, देव, धर्म, इत्यादि संबंधींच्या त्या घनाकार निष्ठा, त्या करवतकाठी समजुती कोठें मावळल्या ? बारीकसारीक श्रद्धांचीं तीं सुरक्षित संगमरवरी मदिरें आतां दूर, खूप दूर गेलेलीं आहेत. आतां पायवाट सरपटत आहे ती शंका कुशंकाच्या काटेरी जाळ्यांतून, अश्रद्धेच्या भयाण जंगलांतून. हें कदाचित् बरोबर होत असेल, पण बरें होत आहे कीं नाहीं कोणास ठाऊक ! ● ● ●

# वात्सल्य....

फार दिवसांनी—म्हणजे खरोखर सुमारे चार वर्षांनीं—मी माझ्या अेका जुन्या मित्राला भेटायला गेलों होतों. भेटायला गेलों—तोहि सहज म्हणून नव्हे. त्याच्याशीं एका महत्त्वाच्या कामाबद्दल मला बोलायचें होतें. कार्य निकडीचें होतें आणि वेळ थोडा होता. मित्राकडील काम अर्ध्या—पाऊण तासांत आटोपून मला तावडतोब रेलतळावर जाऊन आगगाडी गाठायची होती.

मनगटावरील घड्याळावर नजर ठेवून मी टॅक्सी केली आणि मित्राच्या घरीं जाऊन दाखल झालों.

दिवस रविवारचा आणि वेळ दुपारची असल्यामुळें माझा मित्र घरींच होता.

दार उघडून मीं दिवाणखान्यांत प्रवेश करतांच, एकाच आशयाच्या परंतु विविध ठिकाणांहून उद्‌भवलेल्या तीनचार प्रश्नांनीं माझें स्वागत केलें.

"अरे वा! कधीं आलास रे?"— आरामखुर्चीच्या बाजूनें.

"ओ हो! आज अगदीं अचानक उगवलांत?"—स्वयंपाक घराच्या दाराजवळून.

"कोण—आपला हा—आलाय् वाटतं?"— दिवाणखान्यांतील एका कोपऱ्यामधून.

मीं पुन्हा एकदा घड्याळ्याकडे पाहिलें आणि सर्वांच्या प्रश्नांना सस्मित मुद्रेनें यथोचित उत्तरें दिलीं.

नंतर मी माझ्या मित्राजवळ जाऊन बसलों आणि शक्य तितक्या गंभीर व व्यावहारिक स्वरांत म्हणालों,

"हें बघ, तुझ्याशीं एका महत्त्वाच्या कामाबद्दल बोलण्यासाठीं आलों आहें मी! त्याचं असं आहे कीं–"

"चहा आणूं ना?" मित्राच्या सौभाग्यवतीनें विचारणा केली.

"खरोखरीच विचारीत असाल तर नको म्हणून माझं उत्तर आहे." मी म्हणालों. "मी आतांच घेऊन आलों. शिवाय जरा लौकरच जायचं आहे मला!"

"लेका! तीनचार वर्षांनीं आलास अन्–" आरामखुर्ची म्हणाली.

"कांहींतरीच तुमचं! चहाला किती वेळ लागतो असा!"– स्वयं-पाकघराचें दार उद्‌गारलें.

"तूं तरी खूप आहेस! जा आण ग चहा, आणि खायलाहि आण कांहीं तरी–" दिवाणखान्याच्या वृद्ध कोपऱ्यानें हुकूम सोडला.

चहा लौकर येईल अशा समजुतीनें मीं या सार्वत्रिक आग्रहापुढें मान तुकवली आणि पुन्हां अेकदा सस्मित मुद्रा करून माझी अनुमति असल्याचें जाहीर केलें.

अेवढें झाल्यावर मी मित्राकडे पुन्हा वळलों आणि सांगूं लागलों–

"तर त्याचं असं आहे कीं–"

तेवढ्यांत बाहेरचें दार धाडकन् उघडून अेक सातआठ वर्षांची मुलगी धावतपळत आंत आली आणि अेकदम आपली गति थांबवून माझ्या चेहऱ्या-कडे टक लावीत म्हणाली,

"आजी, हे कोण ग?"

"अग, हा आपला हा!" कोपऱ्यांत बसलेल्या आजीनें संदिग्ध खुलासा केला.

"तूं ओळखत नाहींस का याला? वेडी रे वेडी!" माझा मित्र म्हणाला.

ओळख पाहूं कोण तें!" आंतील दरवाजांतून डोकावणाऱ्या मित्र-पत्नीनें सांगितलें.

अेक हात कमरेवर ठेवून आणि दुसऱ्याचें अेक बोट तोंडांत घालून ती बालिका माझ्यासमोर उभी राहिली आणि शांतपणें विचार करूं लागली.

मला वाटलें, राणीच्या बागेंत अेखाद्या अपरिचित जनावरासमोर उभें राहून हा पाणघोडा, गेंडा, कीं जिराफ याचा निर्णय करतांना तिचा मुद्राविर्भाव साधारण असाच दिसला असेल.

ती माझ्याकडे पाहात होती आणि इतर सारेजण तिच्याकडे पाहात होते. कांहीं क्षण अशा भीषण शांततेंत गेल्यावर मीं माझें ( तिच्या निरीक्षणासाठीं अविचल ठेवलेलें ) तोंड बाजूला वळवलें व म्हटलें,

" तिचा कांहीं दोष नाहीं त्यांत, इतक्या दिवसांनीं येतों आहें मी ! ती तरी कशी ओळखणार ?"

" अग वेडे, हा आपला–! तुझा काका ! " मित्रानें माझ्या शब्दांचा आधार घेअून माझें नांव सांगितलें.

मुलीला कांहींच कौतुक वाटलें नाहीं. इतक्या ताणाताणीच्या परिस्थितीमधून अितका क्षुद्र निष्कर्ष निघालेला पाहून ती निराश झाली. हा कोणी सर्कशींतला विदूषक, खेळणीं किंवा रिबिनी विकणारा दुकानदार, निदान अेखाद्या प्राथमिक शाळेचा हेडमास्तर निघेल, अशी तिची कल्पना होती. तिनें शांतपणें तोंडांतील बोट काढलें आणि खालीं मान घालून ती आंतील घराकडे जाऊं लागली.

" कार्टे, चाललीस कुठें ?" कोपऱ्यांत बसलेल्या आजीनें दरडावून विचारलें.

" मग काय करूं ;" मुलगी उद्‌गारली.

" तुझं नांव सांग त्याला–"

" माझं नांव रंजना !"

" सगळं नांव सांग !" आजी गरजल्या.

रंजना माझ्याजवळ आली व तिनें (मला चांगलें माहीत असलेलें ) आपल्या बापाचें नांव व आडनांव सांगितलें.

" मोठी चुणचुणीत आहे मुलगी ! कितवींत आहेस ग तूं रंजना ?" मीं कर्तव्यबुद्धीनें विचारलें.

" तिसरींत गेली आहे आतां !" मित्रानें परस्पर उत्तर दिलें.

" पांचवा नंबर आला होता तिचा !"

" बरे वा ! " मी म्हणालों व नंतर प्रथमतः मुलीकडे, मग तिच्या पित्याकडे, मग पित्याच्या आईकडे व थोडेसें स्वयंपाकघराच्या दाराकडेहि ( पुन्हा एकदा सस्मित मुद्रेनें ) बघितलें. तिसऱ्या यत्तेंत पांचवा नंबर संपादन करण्याबाबत ज्यांच्याकडे प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें सर्व श्रेय होतें त्याचें याप्रमाणें निःशब्द अभिनंदन करून मी पुन्हा माझ्या मित्राकडे वळलों व म्हणालों,

" तर मी काय म्हणत होतों.– "

" दादा माझा पेला दाखवूं" ? माझें भाषण पहिल्या क्रियापदाजवळ कातरून मुलीनें विचारलें.

" दाखव, दाखव ! "

" तुम्हीच काढून द्या. कपाटांत आहे. "

मित्र उठला आणि त्यानें एका कपाटांत पांचदहा मिनिटें शोधाधोध करून एक छोटा पेटा बाहेर काढला. तो माझ्या हातांत देऊन तो म्हणाला,

" आमच्या बिवट्याला बक्षीस दिला हेडमास्तरांनीं ! "

" म्हणजे तुझा धाकटा छोकरा वाटतं ? "

" तो अजून शाळेंत जात नाहीं. "

" मग–बिवट्या ? "

मित्र मोठ्यानें हंसला व उद्‌गारला " तूं तरी अगदीं हा ओहेस ! अरे, आमच्या रंजूलाच आम्ही बिवट्या म्हणतों. बरं, पेला तर बघ – "

मीं पेला हातांत घेतला व 'वाहवा–सुंदर ' असें कांहीं पुटपुटत पेला खालीवर बारकाईनें पाहिला. दुकानांत खरेदी करणाऱ्या गिऱ्हाईकाप्रमाणें टिचक्या मारून दोन जागीं वाजवूनहि बघितला. खरें म्हणजे, त्या तक–लादी, निकामी पेल्यांत पाहण्यासारखें कांहीं नव्हतें आणि असलें तर तें कसें पाहायचें हें मला ठाऊक नव्हतें.

" वा सुंदर ! " मी समारोपादाखल म्हणालों.

" कशाबद्दल मिळाला हें नाहीं विचारलंस ? " मित्रानें विचारणा केली.

" कशाबद्दल ? " मीं नाइलाजानें विचारलें.

" माझ्या बाबाचं हस्ताक्षर फार चांगलं– "

" हो हो, मला आठवतंय्! त्यांचीं कांहीं पत्रं मीं पाहिलीं होतीं मागें! " मी आजीकडे ( अर्थात् सस्मित मुद्रेनें ) पाहात उद्गारलों. बाबांच्या कीर्तीची पावती आजीकडे पोहोंचती करावी हें व्यवहाराला धरून होतें.

मित्र पुन्हां मोठमोठ्यानें हसूं लागला. तो म्हणाला,

" अरे बाबा म्हणजे आमचा बिबट्या, म्हणजे आमची ही रंजू! तू तरी––"

सामुदायिक हास्याचा समारंभ पार पडल्यावर मित्रानें सांगितलें,

" रंजूच्या हस्ताक्षरावर स्वतः हेडमास्तर फार खूष झाले. त्यांनीं स्पेशल बक्षीस दिलं हें! रंजू, तुझं अक्षर दाखव बघूं काकाला. तुझी निबंधाची वही आण. "

माझ्या कामाचा विषय थोडा बाजूस सारणें जरूर होतें. मी कौतुकयुक्त नजरेनें रंजूच्या वहीं– शोधनाचा मागोवा घेऊं लागलों. रंजूला वही सांपडेना तेव्हां मित्र उठला नि त्याच्या मातोश्रीहि उठल्या. तिघांनीं मिळून बरीच शोधाशोध व उलथापालथ केल्यावर शेवटीं वही सांपडली. मित्रानें एक पान उघडून वही मजजवळ दिली.

"हें––पहा."

" वा ! फारच रेखीव आहे ! "

रंजूसंबंधीं मीं एक ठरवून टाकलंय् !

" काय तें ? "

" तिला एस्. एस्. सी. नंतर जे. जे. मध्यें घालायचं ! चांगली चित्रकार होईल ती ! "

" नको रे बाबा ! " आजी नापसंती दर्शवून आवेशानें म्हणाल्या. " तिला आपली डॉक्टर कर. ती तरट्यांची चंपी नाहीं का डॉक्टरीण झाली ! अगदीं मठ्ठ होती लहानपणीं. ही तर इतकी हुशार आहे––"

" पण आई, तिचा स्वाभाविक कल कोणत्या गोष्टीकडे आहे हें पाहिलं पाहिजे ना ? " मित्र उत्तरला.

" डॉक्टरकीचीहि तिला खूप आवड आहे. त्या आपटयाच्या दवाखान्याजवळ नेहमी तर खेळत असते. --"

" ती डॉक्टर होईल, प्रोफेसर होईल, राजकारणांत पडली तर मंत्रीदेखील होईल. " मित्र आत्मविश्वासानें उत्तरला. पण तिला खरी गोडी आहे ती चित्रकलेंत. फार सुन्दर चित्र काढते तो. बाबा, तुझा तो पोपट दाखव पाहूं--"

" तिथेंच आहे टेबलावर. "

त्यानंतर पोपटाचा शोध सुरू झाला. सुमारे आठदहा मिनिटांनीं तो यशस्वी झाल्यावर मित्रानें माझ्या हातांत एक कागदाचा कपटा दिला. त्यावरती कांहीं तरी आकृति चितारलेली होती व तींत हिरवे, तांबडे, काळे रंग मनस्वीपणें चितारले होते.

" वाहवा ! छान ! "

कागद उलटा धरला आहेस ! "

' मीं कागद फिरवला.

हं. खरोखरच सुन्दर ! आश्चर्य आहे. तिसरींतल्या मुलीनं इतका सुन्दर पोपट काढावा हें ! "

पोपटप्रशस्तीचा कार्यक्रम बराच वेळ चालला. मित्रानें पोपट काढणें ह मोर वा बदक काढण्याहून मूलत: कसें अवघड आहे हें मला विस्तारानें समजावून दिलें. आजींनीं आपल्या गत आयुष्यांत येऊन गेलेल्या विविध पोपटांचा वृत्तांत सांगितला. मी अधूनमधून हो--अर्थात्--वाहवा--सुंदर इत्यादि शब्दांचीं त्रोटक विरामचिन्हें त्यांच्या भाषणांत घालीत होतों.

पोपटप्रशस्ती शेवटीं नि:सत्व व बेचव होण्याच्या बेतांत आली असतां मित्राची सौभाग्यवती चहाचें तबक घेऊन आंत प्रविष्ट झाली. गाडींतून उतरून फलाटावर खाणेंपिणें उरकावें त्याप्रमाणें मीं लगबगीनें चहाचा व इतर खाद्य पदार्थांचा कसाबसा समाचार घेतला व बशी दूर ठेवून मित्राला म्हटलें.

हें पहा. आता वेळ अगदीं थोडा आहे. मी जो आतां तुझ्याकडे आलों, तो एका विशेष कामासाठीं --"

तेवढ्यांत आंतील दरवाजांतून एक तीनचार वर्षांचा मुलगा लाडूचा तुकडा खात बाहेर आला. माझ्याकडे लक्ष जातांच त्यानें क्षणभर डोळे विस्फारले व नंतर तो एकदम मोठ्यानें रडूं लागला. बैठकीची सारी खोली त्या पल्लेदार रडण्यानें ओसंडून वाहूं लागली. आपल्या दर्शनाचा मुलाच्या संस्कारक्षम मनावर एवढा दारूण परिणाम होतो हें पाहून मीहि भांबावून गेलों.

मूल कां रडतें हें शोधून काढण्यासाठीं सर्वांनीं त्या रडण्याचा भेद करून पलीकडे जाऊं शकेल अशा आवाजांत विचारपूस सुरू केली.

"काय रे कार्टर्या, काय झालंय असा गळा काढायला? "– आजी.

"माझ्या बबड्याला कोणी---?" मित्रपत्नी.

"शऱ्या, काय झालं बाळ ?" मित्र.

'कड् कड् कड् ! ठण् ठण् ठण्!' रंजनाकृत टवलाचा व थाळीचा आवाज.

मीहि या चौकशींत सामील होऊन 'काय झालं' म्हणून अधूनमधून पृच्छा करीत होतों. परंतु माझ्या त्या बोलण्यानें त्या बालकाच्या रडण्याचा वेग आणि आवेग अधिक वाढे मात्र. शेवटीं आजीबाईंना रडण्याचें रहस्य उमगलें. वृद्धांचा अनुभव कधीं वाया जात नाहीं. त्या मोठ्यानें हंसत उद्गारल्या—

"अरे बरोबर! शऱ्याला वाटलं कीं हा पोरधऱ्याच आला आहे आपल्याला पकडायला !"

"पोरधऱ्या ?" मित्रानें विचारलें.

"अरे बाबा, परवां ते म्युनिसिपालिटीचे लोक डी. डी. टी. मारायला आले होते नां ? त्यांतला एक याच्यासारखाच दिसत होता. शऱ्यानं हट्ट धरला होता कांहीं. तर रंजीनं सांगितलं कीं हा पोरधऱ्या आलाय् तुला पकडायला म्हणून. अशी धास्ती घेतली होती शऱ्यानं त्याची !"

आजींनी हा खुलासा केल्यावर मी पोरधऱ्या नाहीं हें शऱ्याला पटवून देण्याचे नानाविध प्रयत्न सुरू झाले.

"पोरधऱ्या नाहीं हा शरू, काका आहे !"— मित्र.

"वेडा ! असे असतात का पोरधरे ? हा काका किती छान आहे!" —आजी.

"इश्! कांहीं तरीच मेल्याचं !"— मित्रपत्नी.

"अय्या ! हे आपले काका आहेत बबड्या. त्यांनीं तुला खाऊं आण-लाय् बघ!"—रंजना.

"दे रे आमच्या शरूला खाऊ !"—आजी.

"बाव्, काकांना म्हणावं खाऊ द्या!"—मित्र.

"शऱ्या, ये, खाऊ घे काकाजवळून" काका शरूला खाऊ द्या!"— रंजना.

खाऊची कथा केवळ बाळाला बनविण्यासाठीं आणि सर्वस्वी काल्प-निक होती यांत शंका नाहीं. मी खिशांतून खाऊचा पुडा काढावा अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. पण तरीसुद्धा, खाऊची ती सार्वत्रिक मागणी कानावर पडत असतां मी कांहींसा लज्जित होऊन गेलों हें मात्र खरें. शरू आपलें रडणें आवरून खाऊच्या अपेक्षेनें माझ्याकडे पाहूं लागल्यावर आपण खाऊ न आणण्यांत मोठा अपराध केला आहे असें मला वाटूं लागलें. माझा गोंधळ दडविण्यासाठीं मीहि इतरांबरोबर हसत होतों, पण धावदोऱ्याच्या टिपेप्रमाणें तें हास्य जागोजाग उसवत आहे याची मला जाणीव होती. सुदैवानें रंजूनें प्रसंगावधान राखून आंतून आणखी एक लाडू आणला व हें प्रकरण मिटवलें.

मी घड्याळाकडे पाहिलें.बहुधा तिकडे गाडीला सिग्नल पडला असावा. मी मित्राजवळ सरकलों आणि पुन्हा एकदा आरंभ केला,

"तर मी काय सांगत होतों, कीं—"

तेवढ्यांत मित्रपत्नी म्हणाली, शरू, काकाला गाणं म्हणून दाखव!'

"अरे, हा शऱ्या मोठा गवई आहे ! रेडिओची गाणीं बरोबर उच-लतो! शऱ्या म्हण तें —गन:स्याम सुन्दला श्लीधला अलुनोदय ज्याला—म्हण—" मित्र.

"म्हण बाळ, म्हण घनश्याम सुंदला—" आजी.

"म्हण बबड्या म्हण घन:श्याम—" रंजना.

दोनतीन मिनिटांत शरूशिवाय (आणि अर्थात् माझ्याशिवाय) खोली-मधील सर्व माणसें होनाजी बाळाची ती प्रसिद्ध भूपाळी आपापल्या मगदुरा-

नुसार गाऊं लागलीं. हें सर्व अर्थात शरूला स्फुरण येण्यासाठीं होतें, पण शरूबाळ या गोंगाटाकडे लक्ष न देतां स्थितप्रज्ञासारखा कोपऱ्यांत गेला व तेथें पडलेल्या पादत्राणांशीं खेळूं लागला.

अखेरीं आजींनी शरूला उचललें आणि माझ्यासमोर आणून उभें केलें.

" म्हणतोस कीं नाहीं मेल्या ! नाहीं तर आज माझ्याबरोबर देवळांत नेणार नाहीं. तिथें तो नगारा वाजवायचा आहे ना तुला ?"

" हो–" शरू उत्तरला.

" मग म्हण पाहूं घनःशाम सुन्दला–"

ही मात्रा बरोबर लागू पडली. नगारा वाजविण्याचें आकर्षण फार मोठें होतें. शरू गाऊं लागला. अिकडे माझ्या छातींत गाडी धडधडत होती आणि तिकडे शरूची भूपाळी, रंजनेनें धरलेल्या तालावर, अितर तिघानीं केलेल्या शाब्दिक व संगीत दुरुस्त्या वेळोवळीं समाविष्ट करीत, संथपणें पुढें चालली होती.

" वा वा ! फारच मधूर ! गाणें संपल्यावर मी म्हणालों.

" शऱ्या अेस्. अेस्. सी. झाला कीं–" मित्र म्हणाला, " त्याला लखनौच्या संगीतकॉलेजांत पाठविणार आहे मी. ववड्या तुला राष्ट्रपतिपदक पाहिजे ना ?"

" मला बदक पाहिजे !" शरूनें खुलासा केला.

तेवढ्यांत आंतील घरांतून रडण्याचा आवाज आला. मित्रपत्नी त्वरेनें उठली आणि दोन मिनिटांत दुपट्यामध्यें असलेलें अेक छोटें बालक घेऊन ती बाहेर आली.

ती दरवाजांत दिसतांच मी ताडकन् उठलों व सर्वांना नमस्कार करून म्हणालों, " बरंय् नमस्कार ! गाडीला दहा मिनिटंच राहिलीं आहेत.

" अच्छा !" मित्र म्हणाला, " रंजे, टाटा कर ! शरू, टाटा कर ! कर– टा–टा–टा !"

● ● ●

# एखादी बातमी....

सकाळच्या दैनिकांत ती बातमी मीं वाचली तेव्हां माझं मन कांहीं वेळ उगाचच भांबावून गेलें. उगाचच म्हणण्याचें कारण असें कीं, बातमी छापणाऱ्याच्या दृष्टीनें तिचें महत्त्व फार मर्यादित होतें. ती वाचून कोणीं अस्वस्थ व्हावें अशी त्यांची अपेक्षा नव्हती किंवा कोणी अस्वस्थ होईल अशी त्यांची कल्पनाहि नव्हती, म्हणजे नसावी. घराप्रमाणें वर्तमानपत्रांतहि कांहीं अडगळ साठवायच्या जागा असतात. लांबरुंद झगझगीत मथळे मिरविणारें वृत्तपत्राचें पहिलें पान हें दिवाणखान्यासारखें असतें. युद्धाच्या रम्य वार्ता, रेल्वेचे वा विमानांचे भीषण अपघात, राज्यकर्त्या पुरुषांची प्रासंगिक वक्तव्यें इत्यादि संभावित मंडळींनाच या दिवाणखान्यांत डामडौलानें बसतां येते. याच्या जवळपास म्हणजे बहुधा पाठच्याच पानावर रेडियोचे कार्यक्रम, किरकोळ जाहिराती, स्थानिक घडामोडी, पोलीस कोर्ट-वार्ता वगैरे क्षुद्र स्वरूपाचा मजकूर अडगळीसारखा अस्ताव्यस्तपणानें रचलेला असतो. या पसाऱ्यामध्येंच प्रस्तुत बातमी, डोक्यावर एक छोटासा मथळा घेऊन दाटीवाटीनें बसलेली मला आढळली. खरोखर, या बातमीचें महत्त्व इतकें मर्यादित आहे का? मला स्वतःला, निदान त्यावेळीं तरी तसें वाटलें नाहीं. सचिवालयांतून बाहेर पडणाऱ्या दिमाखदार अहवालांपेक्षां आणि राज्यकर्त्यांच्या मखमली भाषणांपेक्षा, आपण कोठल्या तळावर आलों आहोंत याचें चित्र ही छोटी बातमी अधिक यथार्थपणानें आपल्या डोळ्यासमोर उभी करीत आहे असें मला वाटलें.

बातमी होती पोलीस आणि कोर्ट या सदरांतील एका खटल्याच्या निकालासंबंधीं. मुंबईच्या पायपथावरील एका जागेसाठीं दोन माणसांत तंटा झाला होता. दोघांनाहि ती जागा रात्रीच्या विश्रांतीसाठीं हवी होती. प्रकरण हातघाईवर आलें आणि पहाटच्या काळोखांत जाग्या असलेल्या माण-

सानें झोपीं गेलेल्या माणसाचा खून केला. आपल्या जागेवरून आरोपीनें आपल्या प्रतिस्पर्ध्यास कायमचें उठवून दिलें. या उद्योगांत त्याच्या स्वतःच्या जागेची निश्चित व कायम तरतूद झाली असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. गुन्ह्याच्या वेळीं आरोपी स्थितप्रज्ञाच्या मानसिक अवस्थेंत नव्हता हें न्यायाधिशानें लक्षांत घेतलें आणि त्याला फासावर पाठविण्याऐवजीं जन्मठेपेची शिक्षा फर्मावली. या शिक्षेनें त्याची मोठी सोय झाली हें मला वाटतं निर्विवाद आहे. संशयाचा, वकिलाच्या वाक्पाटवाचा अथवा न्यायाधिशाच्या अनवधानाचा फायदा त्याला मिळून तो सुटला असता तर ? तर त्याला त्या किंवा तशाच दुसऱ्या एखाद्या जागेसाठीं पुन्हा तंटा करावा लागला असतां, पुनश्च प्रकरण हातघाईवर आलें असतें आणि आरोपी जरा तापट डोक्याचा असल्यानें तंट्याचें पर्यवसान पुन्हां एकदां खुनांत झालें असतें. पुन्हां सुटला असतां तर पुन्हा खून झाला असतां आणि हें चक्र असेंच फिरतें राहून पोलीस, वकील, न्यायाधीश वगैरेंना काम पुरविण्याची नैतिक ( अथवा अनैतिक ) जबाबदारी अंगावर घेणाऱ्या जमातींत तो कायमचा विलीन झाला असता !

पण यापेक्षा, म्हणजे झालें नाहीं त्यापेक्षा जें झालें तें फार चांगलें आहे. तुरुंगाचा अनुभव मला नाहीं, पण तुरुंगांत प्रत्येक माणसाला ठराविक जागा झोंपण्यासाठीं देण्यांत येतें हें गृहीत धरायला पाहिजे. झोंपण्याच्या जागेसाठीं तुरुंगांत कधीं मारामारी, खून झाल्याचें माझ्या तरी ऐकिवांत नाहीं. सक्त मजुरीचा कैदी म्हणून आरोपीला दिवसभर राबावें लागत असेल यांत शंका नाहीं. पण मुंबईच्या पायपथावर झोंपण्यापूर्वीं तितकेच श्रम त्याला करावे लागत असतील. तेव्हां याबाबतींत त्याच्यासंबंधीं करुण रस निर्माण करायचें अजिबात कारण नाहीं ! उलटपक्षीं तुरुंगाबाहेरची सक्तमजुरी तुरुंगांतल्या सक्तमजुरीपेक्षा जास्त त्रासाची व कमी फायद्याची असणेंहि संभवनीय आहे. तुरुंगांतल्या श्रमानंतर भलेबुरे भाकरीचे दोन घास आणि झोंपण्याची जागा या गोष्टी निश्चित मिळण्याची सोय असते. निदान आरोपीनें केलेला गुन्हा लक्षांत घेतला म्हणजे दुसऱ्या गोष्टीचें त्याला विशेष महत्त्व वाटत होतें आणि त्याबाबतींत तरी तो निश्चित झाला असेल— असें वाटतें. खरोखर, तुरुंग म्हणतात तितका वाईट नाहीं हें अशा प्रसंगीं कळून येतें.

माझ्या गांवानजीक असलेल्या तुरूंगाच्या उंच दगडी भिंती कधीं आगगाडींतून जातांना पाहिल्या म्हणजे माझ्या अंगावर बारीक काटा येऊन जातो. पण हा आपल्या अज्ञानाचा खरोखर परिणाम होय. या भिंतीवरती विजेच्या जिवंत तारा दिसतात. या तारांतून त्यांना स्पर्श करणाऱ्याचें मरणच विजेच्या रूपानें वाहात असतें ! रास्त दरवाजांचा उपयोग करण्याऐवजीं जो या भिंती ओलांडून मुक्त होण्याचा प्रयत्न करील तो नुसतां मुक्त न होतां जीवनमुक्त होईल, बाहेरच्या जगांत येण्याअैवजीं जगाच्याच बाहेर जाईल ! अशा रीतीनें प्रत्यक्ष यमराजाकडे ज्याची रखवाली सोपवली आहे त्या तुरुंगाबद्दल प्रारंभीं आस्था वाटणें जरा कठिणच आहे. पण थोडा विचार केल्यावर कळून येतें कीं, तुरुंग कांहीं इतका वाईट नाहीं. इतका भयंकर नाहीं. जगांतल्या हमरस्त्यांवर ज्यांना झोंपायला जागा मिळत नाहीं अशा अनेक माणसांना तो आस्थेनें उराशीं कवटाळून ठेवतो. दरिद्री आईप्रमाणें दोन खराब घांस का होईना, पण ते नेमानें त्यांच्या तोंडांत घालतो. मध्यंतरी एका गुन्हेगाराची हकीगत माझ्या वाचनांत आली होती. मोठी शिक्षा भोगून तो बाहेर आला होता. बापाच्या छत्राला बालवयांत मुकलेल्या मुलासारखी त्याची आवस्था झाली. त्यानें पुन्हा एक छोटा गुन्हा केला आणि तो पोलिसांच्या अगदी डोळयासमोर करण्याचें चातुर्यहि त्यानें दाखविलें. हें चातुर्य त्यानें दाखविलें नसतें तर नित्याप्रमाणें पोलीस तपास सुरू झाला असतां आणि त्याच्या अंतापर्यंत कदाचित् चालू राहिला असता. कदाचित् दुसऱ्याच कोणाचें भाग्य उजाडलें असतें, पण ती खबरदारी घेतल्यानें तो पुन्हा सूज्ञपणानें प्रथमतः कोर्टांत व नंतर तुरुंगांत गेला. 'साहेब, बाहेर राहणें कठिण आहे' असें त्यानें आपलआ जबानींत न्यायाधिशांस सांगितलें. तेव्हां तुरुंग संपूर्णतः व सर्वांनाच वाईट आहे असें नेहमीच्या समजुतीनें म्हणून जाणें म्हणजे त्या संस्थेला अन्याय करणें होय. सध्याच्या युगांत तुरुंग ही खरोखर एक अत्यंत उपकारक धर्मशील व मायाळू संस्था आहे. जेथें सहस्रावधि लोकांना झोपण्यासाठीं चार हात लांबीची जागा मिळत नाहीं, ती मिळविण्यासाठीं त्यांना जीव द्यावे लागतात व घ्यावे लाग-

तात, जेथें माणसाच्या जीवापेक्षा भाकरीच्या तुकड्याची बाजारी किंमत अधिक आहे, तेथें कारागृहाला खरोखरीं पवित्र अशा देवालयाची थोरवी यावयास हवी.

तेव्हां बारकाईनें पाहतां, या अेकंदर प्रकरणांत कोणाचेंच अहित झालें नाहीं असें दिसून येतें. जो मारला गेला तो सुखानें नंदनवनांतील अेखाद्या कल्पवृक्षाच्या तळाशीं लोळत पडला असेल. स्वर्गाहून कोणत्या अन्य ठिकाणीं त्याची रवानगी झाली असेल तर तेथील निवासहि तो जेथून आला तेथल्यापेक्षा त्यास अधिक सुखावह वाटत असला पाहिजे. ज्यानें मारलें त्याच्याहि जन्माची तरतूद झाली. पोलिसांना काम मिळालें, न्यायाधीशांना औदार्य दाखविण्याची संधि मिळाली, वृत्तपत्रांना एक बातमी मिळाली, आणि माझ्यासारख्या वाचकांना ती वाचून तिच्यावर हा काथ्याकूट करतां आला. ही सारी विचारपरंपरा ध्यानांत आल्यावर, प्रस्तुत बातमी वाचून आपलें मन थोडावेळ अस्वस्थ झालें याचेंच मला आतां नवल वाटत आहे.

• • •

REFBK-0009299

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
नुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि ....................

ग्रंथ संग्रहालय ठाणे
९२४९